अध्याय विसावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॐ नमो सद्गुरु चित्समुद्रा । मुक्तमोतियांचा तुजमाजीं थारा । ज्ञानवैराग्य-शुक्तिद्वारा । सभाग्य नरा तूं देशी ॥ १ ॥ तुझी खोली अमर्याद । माजीं चिद्रत्नें अतिविविध । देखोनि निजप्रबोधचांद । भरतें अगाध तुज दाटे ॥ २ ॥ उलथल्या स्वानंदभरत्यासी । गुरुआज्ञामर्यादा नुल्लंघिसी । स्वानंदलहरी चढोवढीसीं । तुजमाजीं अहर्निशीं उसळती ॥ ३ ॥ ब्रह्मविद्या महाबंदर । तेथ निजभक्ती हें तारूं थोर । त्यासी वागविता तूं कर्णधार । प्रेमाचें साचार चढविशी शीड ॥ ४ ॥ तेथ भक्त संत सज्ञान नर । स्वयें पावविशी परपार । त्यांची मागुती येरझार । सत्य साचार खुंटली ॥ ५ ॥ एक लावूनि कासेसी । भवसागरीं वागविशी । बुडण्याचें भय त्यासी । महाकल्पेंसीं बाधीना ॥ ६ ॥ एक बुडाले भक्तिसमरसीं । तें घातले शेषशयनापाशीं । एक बैसविले अढळतेसी । ते ब्रह्मादिकांसी न ढळती ॥ ७ ॥ तुझ्या सागरत्वाची परी । विजातीय तिळभरी । राहों नेदिसी भीतरीं । हे अगाध थोरी पैं तुझी ॥ ८ ॥ अत्यंत प्रळयीं जैं हा चढे । तैं संसार हें नांवहि बुडे । वैकुंठकैलासावरता चढे । मागेंपुढें हाचि हा ॥ ९ ॥ ऐशिया सद्गुरुसमुद्रोदकीं । एकाएकपणें हरीतकी । भीतरीं पडतां आवश्यकीं । अंगीकारी कीं जनार्दन ॥ १० ॥ तो जनार्दन स्वयें देखा । एकादशाची करी टीका । तेणें अभंगीं घालूनि एका । कवित्व लोकां ऐकवी ॥ ११ ॥ जनार्दना आवडे एक । तो मी एका भेटतांचि देख । निजात्मभावें पडिलें ऐक्य । आपुलें निजसुख बोलवी ॥ १२ ॥ निजसुखाची कथा । त्यासी आपण होय श्रोता । मग अर्थाच्या यथार्थतां । समाधानता देतसे ॥ १३ ॥ यापरी गा जनार्दनें ।

चैतन्यसागर सद्गुरूला नमस्कार असो. तुझ्या पोटांत मुक्तरूपी मोत्यांना आश्रय मिळतो. ज्ञान-वैराग्यरूपी शिंपीच्या द्वारां तूंच तीं भाग्यवान् लोकांना देतोस. १ तुझी खोली अमर्याद आहे. त्यांत अनेक ज्ञानरत्नें आहेत. आत्मज्ञानरूपी चंद्राला पाहून तुला जोराची भरती येते. २ शुद्ध आनंदाच्या भरतीच्या लाटा उसळल्या तरी तूं गुरूच्या आज्ञारूपी मर्यादेचें केव्हांहि उल्लंघन करीत नाहींस. स्वानंदाच्या लाटा तुझ्यामध्यें चढा-ओढीनें रात्रंदिवस उसळत असतात. ३ ब्रह्मविद्या हें मोठें थोरलें बंदर आहे. तेथें आत्मभक्ति-नावांचें मोठें जहाज आहे. त्याला चालविणारा नावाडी तूं आहेस. तूं प्रेमाचें शीड उभारितोस ४ व ज्ञानी भक्तांना तूं स्वतः परतीराला नेऊन पोंचवितोस. त्यामुळें त्याची परत येण्याजाण्याची कायमची दगदग चुकते. ५ तूं कोणाला कासेला लावून भवसागरांतच ठेवितोस. पण त्याला प्रलयकाळींहि बुडण्याची भीति नसते. ६ जे कोणी भक्तिसमरसांत बुडलेले असतात, त्यांना तूं शेषशायी जवळ ठेवितोस. कोणाला अढळपद देतोस, त्यांना तेथून ब्रह्मादिकहि ढळवूं शकत नाहींत. ७ तुझ्या सागरत्वाचा प्रकार असा आहे कीं, तूं अंतःकरणांत तिळभरहि भिन्नभाव राहूं देत नाहींस. अशी तुझी अगाध थोरवी आहे. ८ महाप्रलयकाळीं जेव्हां हा समुद्र क्षोभतो, तेव्हां संसार हें नांवहि बुडून जातें. तो वैकुंठ व कैलास यांच्यावर चढतो व मागें-पुढें हाच हा होतो. ९ अशा या सद्गुरुरूपी महासागराच्या जलांत एकनाथ एकाएकीं दीन होऊन पडला असतां जनार्दनस्वामीनें त्याचा स्वीकार केला. १० त्याच जनार्दनानें या अकराव्या स्कंधावर टीका करून एकनाथाच्या नांवें कवित्व रचून तें लोकांना ऐकविलें. जनार्दनाला एकाची आवड आहे. तेव्हां मी एका (एकनाथ) त्यास भेटतांच दोघांचें आत्मभावानें ऐक्य झालें व त्यानें आपला आत्मानुभव मजकडून बोलविला. १२ ती आत्मसुखाची कथा ऐकण्यास तो स्वतःच श्रोता झाला. म्हणून त्याच्या अर्थाची यथार्थता समाधान देते. १३ याप्रमाणें जनार्दनानें

एकादश मऱ्हाटा करणें । नव्हे माझें युक्तीचें बोलणें । हें स्वयें सज्ञानें जाणिजेल ॥ १४ ॥ त्या एकादशाची गतकथा । एकुणिसावा संपतां । गुणदोषांची कांहीं वार्ता । उद्धवासी तत्त्वतां सांगीतली ॥ १५ ॥ गुणदोष जो देखणें । तोचि महादोष जाणणें । गुणदोष स्वयें न देखणें । तो गुण म्यां श्रीकृष्णें मानिजे ॥ १६ ॥ हें ऐकोनि देवाचें उत्तर । उद्धव चमत्कारला थोर । काय गुणदोषांचा विचार । घरोघर लोकीं केला ॥ १७ ॥ तुम्हींच वेदमुखें आपण । प्रकटिलें गुणदोषलक्षण । तें तुमचें वेदवचन । केवीं अमान्य करावें ॥ १८ ॥ ऐसें विधिनिषेधलक्षण । विचारितां तें वेदवचन । कां पां निषेधी श्रीकृष्ण । उद्धव तो प्रश्न स्वयें पुसे ॥ १९ ॥ विसावे अध्यायीं निरूपण । सांगावया गुणदोषलक्षण । भक्ति ज्ञान कर्म जाण । तिन्ही अधिकार भिन्न सांगेन ॥ २० ॥ उद्धव म्हणे हे श्रीकृष्ण । तूं वेदरूपें आपण । बोलिलासी दोषगुण । तें परम प्रमाण आम्ही मानूं ॥ २१ ॥ हा विधि हा निषेध । हें दाविताहे तुझा वेद । तो वेदानुवाद विशद । ऐक प्रसिद्ध सांगेन ॥ २२ ॥

उ० उ०–विधिश्च प्रतिषेधश्च निगमो हीश्वरस्य ते । अवेक्षतेऽरविन्दाक्ष गुणदोषं च कर्मणाम् ॥ १ ॥

कमलनयना श्रीकृष्णा । विधिनिषेधलक्षणा । दाखवीतसे दोषगुणां । तुझी वेदाज्ञा प्रसिद्ध ॥ २३ ॥ तुझिया वेदाचे वेदविधि । गुणदोषीं जडली बुद्धी । ते मी सांगेन प्रसिद्धीं । कृपानिधी अवधारीं ॥ २४ ॥

हा अकरावा स्कंध सोप्या मराठींत सांगितला. हे कांहीं माझ्या युक्तीचे बोल नाहींत. विद्वान् लोक हें सहजच ओळखतील. १४ या एकादश स्कंधाच्या मागील कथेचा संदर्भ असा आहे–एकोणिसाव्या अध्यायाच्या शेवटीं श्रीकृष्णानें गुण-दोषांसंबंधीं कांहीं प्रकार सांगितला. १५ त्यांतील 'गुण-दोष पहाणें हाच महादोष आहे. गुण-दोष न पहाणें हा मोठा गुण आहे, असें मी श्रीकृष्ण मानितों' १६ हें देवाचें वचन ऐकून उद्धवाच्या मनाला मोठा चमत्कार वाटला व तो म्हणाला कीं, हा गुण-दोषांचा विचार लोकांनीं घरोघर बसून केला कीं काय! १७ तुम्हींच वेदमुखानें गुण-दोषांचें लक्षण सांगितलेंत, तें तुमचें वेदवचन आम्हीं अमान्य कसें करावें! १८ विधि-निषेधाचें जें लक्षण आहे, तें वेदवचनच आहे, असें असतां श्रीकृष्ण त्याचा निषेध कां करीत आहे! हाच प्रश्न उद्धवानें स्वतः विचारिला असतां १९ श्रीकृष्ण या विसाव्या अध्यायांत गुण-दोषलक्षण सांगण्याकरितां भक्ति, आणि कर्म या तिहींचे भिन्न-भिन्न अधिकार सांगत आहे. २० उद्धव म्हणाला कीं, हे श्रीकृष्णा! तूं स्वतःच वेदरूपानें गुणदोषांचें विवेचन केलें आहेस. तें आम्हीं परम प्रमाण समजतों, २१ तुझा वेद हा विधि व हा निषेध असें स्पष्ट दाखवीत आहे. तोच वेदानुवाद विशद करून सांगतों, ऐक. २२.

[या विसाव्या अध्यायांत अधिकारभेदानें गुण-दोषव्यवस्थेसाठीं भक्तियोग, ज्ञानयोग व कर्मयोग असें योगत्रय सांगितलें आहे.]

––गताध्यायाच्या शेवटीं 'गुण-दोषदृष्टि हाच दोष व गुण-दोष दृष्टिराहित्य हाच गुण' असें जें सांगितलें आहे, त्यावर उद्धव पुढील पांच श्लोकांनीं आक्षेप घेतो––

उद्धवः उवाच–उद्धव म्हणाला, अरविंदाक्ष–हे कमलनयना! विधिः च प्रतिषेधः च ते ईश्वरस्य निगमः हि–विधि व प्रतिषेध हा तुज ईश्वराचा निगम म्ह० आज्ञारूप वेद आहे. सः च कर्मणां गुण-दोषं च अवेक्षते–आणि तो वेद विधेय आणि निषेध्य कर्मांचे पुण्य-पापफलरूप गुण-दोष पहातो. १.

उद्धव म्हणाला––हे कमलनयना श्रीकृष्णा! विहित पुण्यकर्मांचें आचरण व निषिद्ध पापकर्मांचा त्याग करण्याविषयीं तुझी वेदाज्ञा प्रसिद्ध आहे. ती गुण-दोष स्पष्ट दाखविते. २३ तुझ्या वेदांतील विधीमुळें गुण-दोषांमध्यें आमची बुद्धि जडली आहे. हे कृपासागरा! तेंच मी स्पष्ट करून सांगतों, ऐक. २४.

वर्णाश्रमविकल्पं च प्रतिलोमानुलोमजम् । द्रव्यदेशवयःकालान् स्वर्गं नरकमेव च ॥ २ ॥

तुझी जे गा वेदवाणी । उघडी गुणदोषांची खाणी । अधममध्यमोत्तम मांडणी । वर्णाश्रमपणीं भेद दावी ॥ २५ ॥ द्रव्य विहित अविहित । हेंही वेद असे दावित । देश पुनीत अपुनीत । काळही दावीत सुष्ठुदुष्टत्वें ॥ २६ ॥ पूर्ववयीं चित्त निश्चित । तारुण्यें तेंचि कामासक्त । वार्धकीं तें अतिकुश्चित । तेवीं शुद्धीं उपजवित गुणदोष वेद ॥ २७ ॥ तुझाचि गा वेद देख । सूचिताहे स्वर्ग नरक । तेणें कर्माचें आवश्यक । साधक बाधक तो दावी ॥ २८ ॥ वर्णाश्रमांमाजीं गुज । प्रतिलोमानुलोमज । ऐसा नाना भेदभोज । वेदेंची सहज नाचविजे ॥ २९ ॥ उत्तम वर्णाजे जे नारी । हीन वर्णाचा गर्भधरी । तिची संतती संसारीं । अभिधान धरी प्रतिलोमज ॥ ३० ॥ तेचि संतती प्रसिद्ध । सूत वैदेह मागध । ऐशिया नामाचें जें पद । तें जाण शुद्ध प्रतिलोमज ॥ ३१ ॥ हीन वर्णाची जे नारी । उत्तम पुरुषाचा गर्भ धरी । ते अनुलोमज संसारीं । शास्त्रकारीं बोलिजे ॥ ३२ ॥ अंबष्ठ आणि मूर्धावसिक्त । प्रवृत्त कायस्थ आणि सारस्वत । इत्यादि नांवें जे वर्तत । ते जाण समस्त अनुलोमज ॥ ३३ ॥ ऐसे नाना भेदप्रकार । अविधिविधीचा विचार । वेद प्रकाशितो साचार । गुणदोषां माहेर वेदू तुझा ॥ ३४ ॥

गुणदोषभिदादृष्टिमन्तरेण वचस्तव । निःश्रेयसं कथं नृणां निषेधविधिलक्षणम् ॥ ३ ॥

वर्णाश्रमविकल्पं च प्रतिलोमानुलोमजं (अवेक्षते)—उत्तमाधमभावानें कर्माधिकारी व आश्रम यांचा गुण-दोष पहातो, तसेंच प्रतिलोमज व अनुलोमज गुण-दोष पहातो. [उत्तम वर्णाच्या स्त्रियांमध्यें हीनवर्णाच्या पुरुषांपासून झालेले ते सूत-वैदेहकादि ते प्रतिलोमज; उत्तम वर्णाच्या पुरुषांपासून हीनवर्णाच्या स्त्रियांच्या ठिकाणीं उत्पन्न झालेले मूर्धावसिक्त, अंबष्ठादि हे अनुलोमज, त्यांतील प्रतिलोमज असंत व अनुलोमज संत हे गुण-दोष पहातो.] द्रव्यदेशवयः कालान् स्वर्गं नरकं एव च—द्रव्य, देश, वय, काल यांतील कर्मयोग्यता व कर्मांची अयोग्यता यांच्या योगानें तत्फलरूपानें स्वर्ग व नरक यांना गुण-दोषरूपच पहातो. [हें पुढच्या अध्यायांत सविस्तर सांगितलें आहे.] २.

अरे बाबा ! तुझी वेदवाणीच मुळीं गुण-दोषांची खाण आहे. तिनेंच उत्तम, मध्यम, अधम असे विभाग करून वर्णाश्रमांतील भेद दाखविला आहे. २५ योग्य व अयोग्य द्रव्य; पवित्र व अपवित्र देश; शुभ व अशुभ काल हें सुद्धां वेदानें दाखवून दिलें आहे. २६ बालवयांत चित्त स्थिर नसतें. तारुण्यांत तें विषयासक्त होतें. वृद्धत्वांत तें कुश्चित होतें त्याचप्रमाणें शुद्धामध्येंहि वेदच गुण-दोष उपजवितो. २७ देवा ! तुझाच वेद स्वर्ग आणि नरक दाखवितो बरें ! व तोच त्यांसाठीं साधक-बाधक आवश्यक कर्में सांगतो. २८ वर्णाश्रमांतील प्रतिलोमज व अनुलोमज असा भेदभाव वेदानेंच करून ठेविला आहे. २९ उच्चवर्णाच्या स्त्रीला हीन वर्णाच्या पुरुषापासून झालेली संतति लौकिकांत प्रतिलोमज म्हटली जाते. ३० सूत, वैदेह, मागध हीं प्रतिलोमज प्रजेचीं प्रसिद्ध नांवें आहेत. ३१ हीन वर्णाच्या स्त्रीला वरिष्ठ वर्णांतील पुरुषापासून झालेल्या संततीला शास्त्रकारांनीं अनुलोमज म्हटलें आहे. ३२ अंबष्ठ, मूर्धावसिक्त, प्रवृत्त, कायस्थ, सारस्वत इत्यादि ज्या जाती आहेत ती सर्व अनुलोमज प्रजा जाणावी. ३३ असे नानाप्रकारचे भेद विधि, व अविधि, यांचा विचार वेदानें केला आहे. हे देवा ! तुझा वेद म्हणजे गुण-दोषांचें माहेरघरच आहे. ३४.

—तथापि प्रस्तुत प्रकरणाशीं त्याचा काय संबंध ! असें भगवान् म्हणेल म्हणून उद्धव म्हणतो—

गुण-दोषभिदादृष्टिं अन्तरेण निषेधविधिलक्षणं तव वचः कथं—गुण व दोष या भेददृष्टीवांचून विधि-निषेधरूप तुझें वेदवचन कसें संभवतें ! नृणां निःश्रेयसं कथं—व तुझ्या वचनावांचून मनुष्यांना निःश्रेयसप्राप्ति कशी होणार ! [कारण त्यांतहि ' आत्म्याचें श्रवण-मननादि करावें ' इत्यादि साधनविधि व ' अनात्मबोधक पुष्कळ शब्दांचें चिंतन करूं नये ' इत्यादि निषेध यांची आवश्यकता आहे, असा याचा भावार्थ. किंवा गुण-दोषभेददृष्टीवांचून व विधिनिषेधलक्षण तुझ्या वचनावांचून पुरुषाचें निःश्रेयस कसें होईल, असा याचा भावार्थ. किंवा गुण-दोषभेददृष्टीवांचून तुझें विधि-निषेधरूप वचनहि ' तत्त्वमस्यादि ' वाक्याप्रमाणें निःश्रेयसपर कसें होईल ! कारण सर्व वेदांनीं निःश्रेयसपरत्व स्वीकारलेलें आहे, असा याचा भावार्थ.] ३.

हे गुण आणि हे दोष। उभयतां वैर लावी देख। तुझा वेद गा आवश्यक। होय प्रकाशक गुण-दोषां ॥ ३५ ॥ वैर लावूनि वेदवाणी। वाढवी गुणदोषमांडणी। तेथ मोक्ष पाविजे प्राणी। वेदवचनीं घडे केवीं ॥ ३६ ॥ राउळ बोलिले आपण। जे न देखावे दोषगुण। तूंचि म्हणसी वेद प्रमाण। तैं दोषगुण देखावे ॥ ३७ ॥ एवं ऐकतां तुझें वचन। उभयतां आली नागवण। वेद प्रमाण कीं अप्रमाण। हें समूळ जाण कळेना ॥ ३८ ॥ तुझ्या वचना विश्वासावें। तैं गुणदोषां न देखावें। तुझें वेदवचन मानावें। तैं देखावें गुणदोषां ॥ ३९ ॥ ऐसे तुझेनि बोलें जाण। संशयीं पडले सज्ञान। मा इतर साधारण जन। त्यांची कथा कोण ये ठायीं ॥ ४० ॥ आशंका ॥ माझें वचन वेदवचन। दोनी एक-रूपें म्हणशी प्रमाण। तरी गुणदोषदर्शन। कां पां विलक्षण परस्परें ॥ ४१ ॥ माझें वेदाचें विधान। नव्हतां वेदार्थाचें ज्ञान। म्हणशी मोक्ष न घडे जाण। वेद प्रमाण या हेतू ॥ ४२ ॥ त्या मोक्षामाजीं काय कठिण। सकळ कर्मे सांडितां जाण। घरा मोक्ष ये आपण। सहजचि जाण न प्रार्थितां ॥ ४३ ॥ म्हणसी वेदार्थ न कळतां। कर्म करितां कां त्यागितां। कदा मोक्ष न ये हाता। जाण तत्त्वतां निश्चित ॥ ४४ ॥ भासला दोराचा सर्प थोर। तेथ जपतां नाना मंत्रभार। करितां वाजंत्र्यांचा गजर। मारितां तिळभर ढळेना ॥ ४५ ॥ तो सादरें निरक्षिता जाण। होय त्या सर्पाचें निरसन। तेवीं निर्धारितां वेदवचन। भवभय जाण निरसे ॥ ४६ ॥ भवभयाची निर्मुक्तता। त्या नांव जाण मोक्ष तत्त्वतां। तो वेदार्थावीण हातां। न ये सर्वथा आणिकें ॥ ४७ ॥ वेदविधान न करितां। कर्म त्यागिलें उद्धतता। तेणें निजमोक्ष न ये हाता। परी पाखंडता अंगीं वाजे ॥ ४८ ॥ विधानोक्त जो कर्मत्यागू। करूनि संन्यास घेतल्या सांगू। तैं म्हणसी न पडे वेदपांगू। हाही व्यंगू विचारू ॥ ४९ ॥ श्रवणांग

हे गुण आणि हे दोष असें स्पष्ट दाखवून तुझा वेद त्या दोहोंचें वैर उत्पन्न करितो व गुण-दोष उघड करितो. ३५ वेदवाणी वैर लावून गुण-दोषभाव वाढविते. तेव्हां त्या वेदवचनानें प्राणी मोक्षाला प्राप्त होईल, हें कसें घडेल ! ३६ गुण-दोष पाहूं नयेत असें देव स्वतःच सांगत आहे व गुण-दोष पहावे हें वेदवचन प्रमाण मानावें असें तूंच म्हणतोस. ३७ तेव्हां तुझें वचन ऐकून दोन्ही प्रकारें मोठा गोंधळ उडाला आहे. वेद प्रमाण कीं, अप्रमाण हेंच मुळीं कळत नाहीं. ३८ तुझ्या शब्दावर विश्वास ठेवावा तर गुण-दोषांकडे लक्ष देतां येत नाहीं. बरें तुझें वेदवचन जर प्रमाण मानावें तर गुण-दोष अवश्य पहावे लागतात. ३९ तुझ्या अशा वचनामुळें मोठाले पंडितहि जर संशयांत पडतात, तर मग इतर सामान्य जनाची काय कथा ! ४० (आशंका) 'माझें बोलणें व वेदवचन हीं दोन्हीं एकरूप असून प्रमाण आहेत.' असें जर म्हणशील तर गुण-दोष दाखविणें हें तरी परस्पर विरुद्ध नव्हे का ? वेदाचें विधान हें माझेंच आहे. यास्तव वेदार्थाचें ज्ञान झाल्यावांचून मोक्ष मिळत नाहीं, म्हणून वेदप्रमाण आहे, ४२ असें जर म्हणशील तर मोक्ष तरी इतका काय अवघड आहे ! सर्व कर्मे सोडिलीं असतां मोक्ष न बोलावितां आपणच सहज घरीं चालत येतो. वेदाचा अर्थ न कळतां कर्म करण्यानें किंवा कर्म टाकिल्यानें मोक्ष केव्हांहि हातीं येत नाहीं, हें तूं निश्चित समज, ४४ असें जर म्हणशील तर एका जाड दोरीवर सर्पाचा भास झाला तर तेथें मोठमोठ्या मंत्रांचा जप केला किंवा वाजंत्र्यांचा कडकडाट केला, किंवा त्याला खूप बडविला तरी तो कांहीं आपल्या जागेवरून रेसभरहि हालत नाहीं. ४५ पण क्षणभर लक्षपूर्वक त्याच्याकडे पाहिलें कीं, तो सर्प नसून दोर आहे, याची जशी खात्री पटते, त्याचप्रमाणें वेदवचनाचा विचारपूर्वक निश्चय केला असतां तत्काल संसारभयाचें निरसन होतें. ४६ संसारभयाचा नाश होणें यालाच मोक्ष असें म्हणतात. तो मोक्ष वेदाचा अर्थ जाणल्यावांचून प्राप्त होत नाहीं. ४७ वेदविधानाकडे लक्ष न देतां केवळ उन्मत्तपणानें कर्माचा त्याग केल्यास मोक्ष तर मिळत नाहीं, पण उलट पाखांडीपणा पदरीं येतो. ४८ यास्तव वेदविधानाप्रमाणेंच कर्मत्याग करून यथाशास्त्र संन्यासग्रहण केल्यास वेद-प्रमाणास बाध येणार नाहीं, असें जर म्हणावें तर तेंहि गौणच आहे. ४९ कारण गुरुवाक्य

संन्यासग्रहण । तेथही असे विधिविधान । गुरुमहावाक्यें जें श्रवण । तोही जाण वेदार्थ ॥ ५० ॥ आशंका ॥ करितां देवपितरांचें यजन । ते होऊनियां प्रसन्न । मोक्ष देती आपण । तेंही वेदेंवीण घडेना ॥ ५१ ॥ स्वाहाकारें तृप्त सुर । स्वधाकारें तृप्त पितर । वेदविनियोगेंवीण सुरपितर । प्रसन्नाकार कदा नव्हती ॥ ५२ ॥

पितृदेवमनुष्याणां वेदश्चक्षुस्तवेश्वर । श्रेयस्त्वनुपलब्धेऽर्थे साध्यसाधनयोरपि ॥ ४ ॥

नाथिलेंचि चराचर । देव मनुष्य आणि पितर । वेदें प्रकाशूनि साचार । पूज्यत्वें थोर प्रतिपादी ॥ ५३ ॥ त्याहीमाजीं अतिविषम । उत्तम मध्यम आणि अधम । हे त्रिविध भेदसभ्रम । वेद उपक्रम करूनि दावी ॥ ५४ ॥ यापरी गुणदोषलक्षण । तुवांचि वाढविले आपण । या नांव म्हणसी मोक्ष-साधन । तरी कां गुणदोष निवारिसी ॥ ५५ ॥ ऐशिया निरूपणघडामोडी । तुझेनि बोलें पडे आडी । तेणें गुणदोषांची परवडी । बाधा रोकडी अंगीं वाजे ॥ ५६ ॥ अवघा संसार काल्पनिक । तेथ एक स्वर्ग एक नरक । हा मोक्ष हा अतिबंधक । येणें वेदवादें लोक भ्रमविले तुवां ॥ ५७ ॥ पूर्वीं पुरुषाचे पोटीं । नव्हती गुणदोषांची गोठी । तुझ्या वेदानुवादपरिपाटीं । गुणदोषीं दृष्टी दृढ झाली ॥ ५८ ॥ एवं तुझेनि बोलें जाण । लोकांसी आली नागवण । भोगावया नरक दारुण । भ्रामक जाण वेदोक्ति तुझी ॥ ५९ ॥

गुणदोषभिदादृष्टिर्निगमात्ते न हि स्वतः । निगमेनापवादश्च भिदाया इति ह भ्रमः ॥ ५ ॥

श्रवणानें संन्यास घेणें यालाहि वेदाचा विधि आहेच. ५० (आशंका) बरें, देव-पितरांचें यज्ञ-तर्पण केलें असतां ते प्रसन्न होऊन आपण होऊन मोक्ष देतात, असें जर म्हणशील तर तेंहि वेदावांचून घडत नाहीं. ५१ कारण स्वाहाकारानें देव तृप्त होतात व स्वधाकारानें पितर तृप्त होतात. तेव्हां वेदवचनावांचून देव व पितर केव्हांहि प्रसन्न होत नाहींत. ५२.

—'अहोपण, सर्वज्ञ पितर व देव विधिनिषेधांना प्रत्यक्षच पाहून मनुष्याला सांगतील' अशी आशंका घेऊन उद्धव म्हणतो—

ईश्वर—हे ईश्वरा ! तव वेदः पितृदेवमनुष्याणां अनुपलब्धे अर्थे साध्यसाधनयोः अपि श्रेयः चक्षुः—त्वद्वाक्यरूप वेदच पितर-देव-मनुष्यांच्या अज्ञात अर्थाविषयीं म्ह० मोक्ष व स्वर्ग यांविषयीं त्याचप्रमाणें हें यांचें साध्य व हें यांचें साधन यांविषयीं श्रेष्ठ प्रमाण आहे. [तस्मात् गुण-दोषदृष्टीच्या अभावीं निःश्रेयस संभवत नाहीं.] ४.

मिथ्या असलेलें हें सर्व चराचर जगत्, देव, मनुष्य व पितर या सर्वांना वेदानेंच प्रकाशित केलें आहे व पूज्यत्वानें त्यांची थोरवी प्रतिपादन केली आहे. ५३ त्यांतहि परस्परविरुद्ध उत्तम, मध्यम व अधम असे तीन प्रकारचे भेद वेदानें करून ठेविले आहेत. ५४ याप्रमाणें तूं स्वतःच गुण-दोषांचें लक्षण वाढवून त्यांस 'मोक्षसाधन' असें नांव दिलेंस. मग आतां त्या गुण-दोषांचें निवारण कां करितोस ! ५५ तुझ्या अशा या धरसोडीच्या भाषणानें तुझ्याच बोलण्याविषयीं संशय उत्पन्न होतो व या गुण-दोषांच्या प्रकारानें मनाला त्रास होऊं लागतो. ५६ हा सगळा संसार केवळ काल्पनिक असतांना, त्यांत एक स्वर्ग, एक नरक, हा बंध, हा मोक्ष, या वेदवादानें तूंच लोकांना भ्रमांत टाकिलेंस. ५७ वेदकालाच्या पूर्वीं गुण-दोषांची वार्ता आदिपुरुषाच्या मनांतहि नव्हती. पण तुझ्या वेदवचनाच्या परंपरेनें लोकांची गुण-दोषदृष्टि दृढ झाली. ५८ अशा प्रकारें तुझ्या वचनानें लोक नागवले आहेत; त्यांना दारुण नरक भोगण्यास लागणारी तुझी ही भ्रामक वेदोक्तीच आहे. ५९.

—'शिवाय शास्त्रानेंच भेददृष्टीचें विधान केलें आहे, तेव्हां तेंच त्याची निवृत्ति कशी करील' असें उद्धव म्हणतो—

गुण-दोषभिदादृष्टिः ते निगमात् हि न स्वतः—गुण व दोष ही भेददृष्टि त्वदाज्ञारूप वेदावरूनच होते, ती स्वतः होत नाहीं. च निगमेन भिदायाः अपवादः इति ह भ्रमः—आणि त्या वेदानेंच भेददृष्टीचा अपवाद, हा खरोखर स्पष्ट भ्रम आहे, वास्तव तूं त्याची निवृत्ति कर. ५.

एवं नानागुणदोषदृष्टीं । तुझेनि वेदें वाढविली सृष्टी । स्वतां पुरुषाचे पोटीं । गुणदोषदृष्टी असेना ॥ ६० ॥ तुझ्या वेदानुवादविस्तरें । गुणदोष झाले खरे । ते तुझेनिही बलात्कारें । चित्ताबाहेरें न निघती ॥ ६१ ॥ अनादि वेद प्रमाण । हें तुझें मुख्य वेदवचन । आतां न देखावे दोषगुण । हें नवें वचन मानेना ॥ ६२ ॥ पहिले प्रकाशिले दोषगुण । आतां निवारावया काय कारण । हें न कळतां संपूर्ण । भ्रमित मन होतसे ॥ ६३ ॥ या भ्रमाची भ्रमनिवृत्ती । कृपेनें करावी कृपामूर्ती । ऐकोनि उद्धवाची वचनोक्ती । काय श्रीपति बोलिला ॥ ६४ ॥ ऐकोनि उद्धवाची विनंती । योगत्रयांची उपपत्ती । अधिकारभेदें वेदार्थप्राप्ती । स्वयें श्रीपति सांगत ॥ ६५ ॥

श्रीभगवानुवाच–योगास्त्रयो मया प्रोक्ता नृणां श्रेयोविधित्सया ।
ज्ञानं कर्म च भक्तिश्च नोपायोऽन्योऽस्ति कुत्रचित् ॥ ६ ॥

तेथ मेघगंभीरा वाणी । गर्जोनि बोले शार्ङ्गपाणी । माझे परम कृपेवांचूनी । माझी वेदवाणी कळेना ॥ ६६ ॥ वेदशास्त्रार्थें अतिसंपन्न । जरी झाले अतिसज्ञान । परी माझ्या अनुग्रहेंवीण । माझा वेदार्थ जाण कळेना ॥ ६७ ॥ ब्रह्मा चहूं मुखीं वेद पढे । त्यासीही वेदार्थाचें चोखडें । वर्म नातुडेचि धडफुडें । मा इतर बापुडे ते किती ॥ ६८ ॥ ब्रह्मा वेदार्थ आकळिता । तैं शंखासुर वेद कां नेता । ब्रह्मा वेदार्थीं लीन होता । तैं नाभिलाषिता सरस्वती ॥ ६९ ॥ माझा वेदाचा वेद निर्धार । तुज मी

सारांश, वेदानेंच अनेक गुण-दोषांच्या दृष्टीनें ही सृष्टि वाढविली आहे. मूळ आदिपुरुषाच्या मनांत गुण-दोषांची कल्पनाहि नव्हती. ६० तुझ्या वेदाज्ञेनेंच गुण-दोष दृढ झाले आहेत. ते तूं आतां काढून टाकण्याची कितीहि पराकाष्ठा केलीस तरी चित्ताबाहेर निघणार नाहींत. ६१ 'वेद अनादि असल्यामुळें ते प्रमाण आहेत' हें तुझें मुख्य वेदवचन आहे. तेव्हां आतां त्याच्या विरुद्ध 'गुण-दोष पाहूं नयेत' हें तुझें नवें वचन मनाला पटत नाहीं. ६२ पहिल्यानें सगळे गुण-दोष उघड करून दाखविलेस; तेव्हां आतां त्याचें निवारण करण्याचें काय कारण! हे न कळल्यामुळें चित्त भ्रमांत पडलें आहे. ६३ तरी हे कृपामूर्ते श्रीकृष्णा! या माझ्या भ्रमाची कृपा करून निवृत्ति करावी. उद्धवाचें हें भाषण ऐकून श्रीकृष्ण काय म्हणाले, तें ऐका. ६४ उद्धवाची विनंति ऐकून श्रीकृष्ण कर्मयोग, भक्तियोग व ज्ञानयोग या तीन योगांची उपपत्ति व अधिकारभेदाप्रमाणें वेदार्थप्राप्ति सांगत आहे. ६५.

—विषय जरी एकच असला तरी अधिकारिभेदानें अविरोध सांगण्यासाठीं भगवान् प्रथम योगत्रय सांगतात—

श्रीभग॰उवाच–श्रीभगवान् म्हणाले–नृणां श्रेयोविधित्सया मया ज्ञानं कर्म च भक्तिः च इति त्रयः योगः प्रोक्तः–मनुष्यांचें निःश्रेयस करण्याच्या इच्छेनें, त्याचें परम हित व्हावें म्हणून मी ज्ञान-कर्म-भक्ति असे तीन योग सांगितले आहेत. (योग म्ह॰ उपाय. ब्रह्मकांड, कर्मकांड व देवताकांड या तीन कांडांनीं ज्ञान, कर्म व भक्ति हे तीन उपाय सांगितले आहेत. येथील कर्म हें निष्काम कर्म समजावें. श्रेयोविधित्सया म्ह॰ मोक्षसाधनेच्छेनें) अन्यः उपायः कुत्रचित् न अस्ति–मोक्षाचा काम्यकर्मादि दुसरा कोणताहि उपाय कोठेंच सांगितलेला नाहीं. [पुढील अध्यायांत 'य एतान्॰' इत्यादि श्लोकानें हेंच अधिक स्पष्ट करतील.] ६.

श्रीकृष्ण मेघगर्जनेसारख्या गंभीर वाणीनें गर्जना करून म्हणाला कीं, माझ्या परम कृपेवांचून वेदाचा अर्थ केव्हांहि कळत नाहीं. ६६ वेद-शास्त्रानें संपन्न असे मोठे पंडित जरी झाले, तरी त्यांस माझ्या प्रसादावांचून वेदाचा खरा अर्थ कळत नाहीं. ६७ ब्रह्मदेवानें चार मुखानें वेदाध्यायन केलें, तरी त्यालाहि वेदाचें यथार्थ ज्ञान झालें नाहीं, मग इतर बिचाऱ्या सामान्य जनाची काय कथा! ६८ ब्रह्मदेवाला जर वेदाचा संभाळ करितां आला असता तर शंखासुरानें वेद कसे नेले असते! ब्रह्मदेवाचें जर वेदार्थाशीं तादात्म्य झालें असतें, तर त्यानें सरस्वतीचा अभिलाष कां धरिला असता! ६९ उद्धवा! मी आतां माझ्या वेदाचा निश्चय तुला

सांगेन साचार । ऐक उद्धवा सादर । वेदविचार तो ऐसा । ॥ ७० ॥ माझ्या वेदासी नाहीं बहु बंड । वृथा न बोले उदंड । ज्ञान भक्ति कर्मकांड । वेद त्रिकांड नेमस्त ॥ ७१ ॥ माझिया वेदांची उक्ती । या तिहीं योगांतें प्रतिपादिती । यावेगळी उपायस्थिती । नाहीं निश्चितीं उद्धवा ॥ ७२ ॥ कोण ते तीनी योग । कैसे अधिकाराचे भाग । तेही पुससी जरी चांग । तरी ऐक सांग सांगेन ॥ ७३ ॥

निर्विण्णानां ज्ञानयोगो न्यासिनामिह कर्मसु । तेष्वनिर्विण्णचित्तानां कर्मयोगस्तु कामिनाम् ॥ ७ ॥

जे कां ब्रह्मभुवनपर्यंत । साचार जीवींहूनि विरक्त । जे विधिपूर्वक संकल्पयुक्त । कर्म त्यागित संन्यासी ॥ ७४ ॥ ऐशिया अधिकाऱ्यांकारणें । म्यां ज्ञानयोग प्रकट करणें । जे कां निजज्ञान साधणें । मज पावणें सायुज्यता ॥ ७५ ॥ आतां जे कां केवळ अविरक्त । विषयालागीं कामासक्त । त्यांलागीं म्यां प्रस्तुत । कर्मयोग येथ प्रकाशिला ॥ ७६ ॥ उंच नीच अधिकारी देख । दोनी सांगीतले सविशेख आतां तिसरा अधिकारी अतिचोख । अलोलिक अवधारीं ॥ ७७ ॥

यदृच्छया मत्कथादौ जातश्रद्धस्तु यः पुमान् । न निर्विण्णो नातिसक्तो भक्तियोगोऽस्य सिद्धिदः ॥ ८ ॥

हरिकथा अवघेचि ऐकती । परी माझी श्रद्धा नुपजे चित्तीं । कोणा एका अभिनवगती । श्रद्धा-उत्पत्ती श्रवणेंचि होय ॥ ७८ ॥ आईक श्रद्धेचें लक्षण । जें जें करी कथाश्रवण । तें हृदयीं वाढे अनु-

---

सांगतों, नीट लक्ष देऊन ऐक. वेदाचा विचार असा आहे. ७० माझ्या वेदाला व्यर्थ बडबड करणें ठाऊक नाहीं. वेदानें ज्ञान, भक्ति आणि कर्म हीं तीन कांडेंच फक्त सांगितलीं आहेत. ७१ माझी वेदवाणी या तीन योगांचेंच प्रतिपादन करिते. म्हणून हे उद्धवा ! त्यावांचून दुसरा उपायच नाहीं. हें खात्रीनें समज. ७२ ते तीन योग कोणते ! त्याच्या अधिकाराचे विभाग कसे केले आहेत ! हें विचारीत असशील तर तेंहि सविस्तर सांगतों, ऐक. ७३.

—भगवान् पुढील दोन श्लोकांनीं त्या तीन योगांतील अधिकारिभेद सांगतात—

इह कर्मसु निर्विण्णानां न्यासिनां ज्ञानयोगः–त्या तीन योगांतील कर्मफलाविषयीं दुःखबुद्धीनें विरक्त झालेले व त्यामुळेंच साधनभूत कर्माचा त्याग करणारे जे संन्यासी त्यांना ज्ञानयोग सिद्धि देणारा आहे, तेषु अनिर्विण्णचित्तानां कामिनां तु कर्मयोगः–परंतु कर्माविषयीं व त्यांच्या फलाविषयीं दुःखबुद्धीनें विरक्त न होतां त्याची इच्छा करणाऱ्या अविरक्तांना कर्मयोग सिद्धि देणारा आहे. ७.

जे ब्रह्मलोकापर्यंत सर्व भोगांविषयीं अंतःकरणापासून विरक्त असतात, जे विधियुक्त संकल्पानें संन्यास घेऊन कर्मांचा त्याग करितात ७४ अशा अधिकाऱ्यासाठीं मी ज्ञानयोग प्रकट केला. त्यायोगें त्यांस आत्मज्ञान होऊन सायुज्य मुक्ति मिळते. ७५ आतां जे केवळ अविरक्त असतात, त्यांची विषयांत आसक्ति असते. त्यांच्यासाठीं मीं कर्मयोग प्रकट केला आहे. ७६ याप्रमाणें श्रेष्ठ व कनिष्ठ हे दोन अधिकारी तुला पूर्णपणें सांगितले. आतां तिसरा अलौकिक व उत्कृष्ट अधिकारी सांगतों, तो ऐक.७७.

यदृच्छया तु मत्कथादौ जातश्रद्धः यः पुमान् न निर्विण्णः न् अतिसक्तः अस्य भक्तियोगः सिद्धिदः–परंतु कांहीं भाग्योदयानें माझ्या कथाश्रवणादिकांविषयीं ज्याच्या मनांत श्रद्धा उत्पन्न झाली आहे; असा जो पुरुष कर्मफलाविषयीं अति विरक्तहि नसतो व अति आसक्तहि नसतो त्याला भक्तियोग सिद्धि देणारा आहे. काम्यकर्मामध्यें प्रवृत्त होणाऱ्या पुरुषाला पूर्णपणें विधि-निषेधाधिकार असतो, असें पुढच्या अध्यायांत सांगतील. निष्काम कर्मयोगाच्या अधिकारानें विधि–निषेध यथाशक्ति पाळावे व तेहि ज्ञानयोग व भक्तियोग यांचा अधिकार प्राप्त होईपर्यंतच. तो प्राप्त झाल्यावर विधि–निषेध अत्यंत अल्प प्रमाणांत पाळावे; पण सिद्धांना विधि-निषेध मुळींच नाहींत. ८.

सगळे हरिकथा ऐकतात, पण त्यांच्या मनांत मजविषयीं श्रद्धा उत्पन्न होत नाहीं. एखाद्याच्या मनांत विलक्षण दैवयोगानें श्रवणानेंच श्रद्धा उत्पन्न होते. ७८ आतां श्रद्धेचें लक्षण ऐक. माझा भक्त जें जें ऐकतो, त्याचें तो हृदयांत

संधान । सप्रेम मन उल्हासे ।। ७९ ।। नवल कथेची आवडी । दाटती हरिखाचिया कोडी । हृदयीं स्वानंदाची उभवी गुढी । एवढी गोडी श्रवणार्थी ।। ८० ।। विषयांचें दोषदर्शन । मुख्यत्वें बाधक स्त्री आणि धन । आवरावीं रसना शिश्न । हे आठवण अहर्निशीं ।। ८१ ।। घायीं आडकलें फळें । तें पानपेना उपचरबळें । तेवीं विषयदोष भोगमेळें । कदाकाळें शमेना ।। ८२ ।। येतां देखोनियां मरण । स्वयें होय कंपायमान । तेवीं विषयभोग दारुण । देखोनि आपण चळीं कांपे ।। ८३ ।। एवं विषयीं दोषदर्शन । सर्वदा देखे आपण । परी त्यागालागीं जाण । सामर्थ्य पूर्ण आथिना ।। ८४ ।। सेवकीं राजा बंदीं धरिला । तया स्त्रीचंदनादि भोग दीधला । परी तो त्यासी विषप्राय जाहला । भोगीं उबगला अगत्यतां ।। ८५ ।। एवं भोगितां त्या भोगासी । नित्य पाहे निजनिर्गमासी । तेवीं भोगितां हा विषयासी । अहर्निशीं अनुतापी ।। ८६ ।। यापरी जो नव्हे विषयासक्त । ना निधडा जो नव्हे विरक्त । यालागीं माझा भक्तिपंथ । मी बोलिलों निश्चित वेदवाक्यें ।। ८७ ।। येहीकरितां माझी भक्ती । माझ्या स्वरूपीं लागे प्रीती । सहजें होय विषयविरक्ती । एवं सिद्धिदाती भक्ति हे माझी ।। ८८ ।। मी वेदोक्त बोलिलों आपण । तेही त्रिविध योग संपूर्ण । ज्ञान कर्म उपासन । वेदोक्त लक्षणविभागें ।। ८९ ।। तेथ कोण देखे दोषगुण । कोणासी दोहींचें अदर्शन । मध्यम भागे वर्ते कोण । तेंही लक्षण अवधारीं ।। ९० ।। जो आसक्त विषयांवरी । तो कर्ममार्गीचा अधिकारी । त्यासी गुणदोषांहातीं नाहीं उरी । हें सांगेल श्रीहरी पुढिलें अध्यायीं ।। ९१ ।। जो कां विरक्त ज्ञानाधिकारी । तो गुणदोषांहूनि बाहेरी । तो पाहतां अवघे संसारीं । न देखे तिळभरी गुणदोष ।। ९२ ।। जग अवघें ब्रह्मपूर्ण । तेथ कैंचे दोषगुण । ऐसे जे ज्ञानसंपन्न । त्यां गुणदोष असेना ।। ९३ ।। अतिआसक्त ना विरक्त । ऐसे कां जे माझे भक्त । ते पूर्वी

चिंतन करीत असतो. त्यामुळें त्याचें मन प्रेमानें उल्हसित होतें. ७९ कथेची आवड मोठी विचित्र खरी. त्यामुळें मनाला आनंदाचें भरतें येतें. अंतःकरणांत आत्मानंदाची गुढी उभारते. इतकी त्याला श्रवणाची गोडी लागते. ८० विषयांच्या दोषदर्शनाला मुख्यत्वेंकरून द्रव्य व दारा हीं बाधक असतात. यास्तव त्यांत आसक्त होणारीं इंद्रियें रात्रंदिवस स्वाधीन ठेवावीं. ८१ बाणादिकांचें पातें अंगांत रुतलें व योग्य उपचार जरी केले तरी तें जसें व्याकुळ करितें, त्याप्रमाणेंच विषयोपभोग घेतल्यानें त्या विषयांतील दोष कधींहि नष्ट होत नाहींत. ८२ मरण येतेंसें दिसतांच प्राणी जसा थरथरां कापूं लागतो तसा हा भक्त विषयोपभोगांना पाहून चळचळां कांपतो. ८३ सारांश, तो अशाप्रकारें विषयांमध्यें सर्वदा दोष पहात असतो; परंतु त्या विषयांचा त्याग करण्यास मात्र समर्थ नसतो. ८४ सेवकांनीं राजाला बांधून कैदेंत टाकिलें व तेथें त्याला स्त्री-चंदनादिकांचे विलास भोगावयास दिले तर त्याला ते विषतुल्य वाटतात. ८५ त्यांचा उपभोग घेण्याचा त्याला कंटाळा येतो व जरी तो ते विलास भोगीत असला तरी त्याचें सगळें लक्ष आपल्या सुटकेकडे जसें लागून रहातें, त्याप्रमाणें हा विषय भोगीत असतां रात्रंदिवस मनांत खिन्न असतो. ८६ असा जो विषयासक्तहि नाहीं व विरक्तहि नाहीं, धीरहि नाहीं, त्याच्यासाठीं मी माझा भक्तिमार्ग निश्चित वेदवचनानें बोललों आहें, ८७ त्यांनीं माझी भक्ति केली असतां त्याचें माझ्या स्वरूपावर प्रेम जडतें व त्यांस सहजच विषयविरक्ति येते. माझी भक्ति अशी सिद्धि देणारी आहे. ८८ मीं स्वतः जें कांहीं वेदांत सांगितलें तें हे तीन योगच होत. या तीन योगांमुळेंच वेदाचें ज्ञान, कर्म व उपासना असे तीन विभाग झाले आहेत. ८९ त्यांत कोणी गुण-दोष पहातात, कोणाला ते दोन्ही दिसत नाहींत. त्यांतील मध्यम मार्गानें कोण वागतो, त्याचें लक्षण मी तुला सांगतों, ऐक. ९० जो विषयांत आसक्त असतो तो कर्ममार्गाचा अधिकारी होय. त्याला गुण-दोष दिसत असतात, हें श्रीहरि पुढल्या अध्यायांत सांगणार आहे. ९१ जो विरक्त ज्ञानाधिकारी असतो तो गुण-दोषांच्या पलीकडे जातो. त्याला सगळ्या प्रपंचांत कोठें तिळभरहि गुण-दोष दिसत नाहींत. ९२ सगळें जगत् जर ब्रह्मानें पूर्णपणें भरलें आहे, तर तेथें गुण-दोष कोठचे ! असे जे ज्ञानसंपन्न असतात, त्यांना दोषदृष्टि नसते. ९३ अत्यंत आसक्तहि नाहींत व अगदीं विरक्तहि नाहींत असे

गुणदोष देखत । परी सांडित विवेकें ॥ ९४ ॥ भूतीं भूतात्मा मी परेश । तेथ देखों नये गुणदोष । ऐसे भजननिष्ठ राजहंस । ते गुणदोष सांडिती ॥ ९५ ॥ मी वेदार्थीं बोलिलों दोषगुण । ते दोष त्यागालागीं जाण । पराचे देखावे दोषगुण । हें वेदवचन असेना ॥ ९६ ॥ ऐसें करावें वेदार्थश्रवण । दोष त्यजूनि घ्यावा गुण । परी पुढिलांचे दोषगुण । सर्वथा आपण न देखावे ॥ ९७ ॥ जो ज्याचे गुणदोष पाहे । तो त्याचा पापविभागी होये । जो पुढिलांचे गुणदोष गाये । तो निरया जाये तेणें दोषे ॥ ९८ ॥ आतां कर्माचा अधिकारू । सांगताहे शारंगधरू । तो जाणोनियां विचारू । कर्मादरू करावा ॥ ९९ ॥

॥ तावत्कर्माणि कुर्वीत न निर्विद्येत यावता । मत्कथाश्रवणादौ वा श्रद्धा यावन्न जायते ॥ ९ ॥

तंवचि करावा कर्मादर । जंव विरक्ति नुपजे साचार । ठाकल्या विरक्तीचें घर । स्वर्गसंसार मळप्राय ॥ १०० ॥ हो कां वमिलिया मिष्टान्ना । परतोनि श्रद्धा न धरी रसना । तेवीं विषयभोगीं जाणा । साचार मना चिळशी उपजे ॥ १ ॥ तेथ कर्माची परिपाटी । समूळ खुंटली गा गोठी । कां दैवयोगें उल्हास पोटीं । माझ्या कथेचा उठी श्रवणादरू ॥ २ ॥ करितां माझी कथा श्रवण । प्रेमें वोसंडे अंतःकरण । विसरे देहगेहांची आठवण । तेथें प्रत्यवाय जाण बाधीना ॥ ३ ॥ जैसें माझे कथेचें श्रवण । तैसेंचि माझें हृदयीं स्मरण । तेथें प्रत्यवाय धरी चरण । येथून बोळवण माझी झाली ॥ ४ ॥ करितां मत्कथाश्रवण । लोपल्या कोटिकर्माचरण । प्रत्यवाय न बाधी जाण । हा प्रताप पूर्ण मत्कथेचा ॥ ५ ॥

—संमत श्लोक—

मत्कर्म कुर्वतां पुंसां कर्मलोपो भवेद्यदि । तत्कर्म तेषां कुर्वन्ति तिस्रः कोट्यो महर्षयः ॥ १ ॥

जे माझे भक्त असतात, ते अगोदर गुण-दोष पहातात. पण लगेच विवेकानें सोडून देतात. ९४ सर्व प्राणिमात्रांच्या देहांत रहाणारा अंतरात्मा मी ईश्वरच आहें. तेथें गुण-दोष केव्हांहि पाहूं नयेत, असे मानणारे जे भजननिष्ठ राजहंस (परमहंस) भक्त असतात, ते गुण-दोषांना सोडून देतात. ९५ मीं जे वेदांमध्यें गुणदोष सांगितले ते त्यांचा त्याग करण्यासाठीं सांगितले. दुसऱ्याचे गुणदोष पहावे, असें वेदवचन नाहीं. ९६ वेदाच्या अर्थाचें श्रवण अशा रीतीनें करावें कीं, दोष टाकून गुण ग्रहण करावे; परंतु दुसऱ्याचे गुण-दोष आपण केव्हाहि पाहूं नयेत. ९७ दुसऱ्याचे गुण-दोष पहाणारा त्याच्या पापाचा भागिदार होतो व दुसऱ्याच्या गुण-दोषांचें वर्णन करणारा त्या दोषानें नरकांत पडतो. ९८ आतां शारंगधर श्रीकृष्ण कर्माचा अधिकार सांगत आहे, तो ऐकून त्याप्रमाणें कर्माचा आदर करावा. ९९.

—या पुढील नऊ श्लोकांनीं कर्मयोगाची अवधि सांगतात—

यावता न निर्विद्येत – जोंवर कर्माविषयीं दुःखबुद्धीनें विरक्ति येत नाहीं, अथवा **यावत् मत्कथाश्रवणादौ श्रद्धा न जायते**—किंवा जोंवर माझ्या कथाश्रवणादिकांविषयीं श्रद्धा उत्पन्न झाली नाहीं, **तावत् कर्माणि कुर्वीत**—तोंवर कर्मे करावीं. ९.

जोंपर्यंत तीव्र विरक्ति उत्पन्न झाली नाहीं, तोंपर्यंतच कर्म करावें. विरक्तीचें घर सांपडलें कीं, स्वर्ग आणि संसार हे दोन्ही मलाप्रमाणें त्याज्य होतात. १०० जिभेला ज्याप्रमाणें ओकून टाकिलेल्या मिष्टान्नाची किळस येते, त्याप्रमाणें विषयोपभोगाची ज्याला किळस येते १ त्याच्यापाशीं कर्मांचा मार्ग समूळ खुंटतो व दैवयोगानें अंतःकरणांत उल्हास उत्पन्न होऊन माझ्या कथाश्रवणाविषयीं अत्यंत आदर वाटूं लागतो. २ माझी कथा ऐकत असतां अंतःकरण प्रेमानें भरून येतें. देह, गृह यांचा विसर पडतो आणि त्याला विधि-निषेधांचा ताप बाधत नाहीं. ३ जसें माझें कथा-श्रवण तसेंच अंतःकरणांत माझें स्मरण होऊं लागलें असतां 'आतां माझी येथून बोळवण झाली' असें समजून प्रत्यवाय त्याचे पाय धरितो. ४ माझी कथा ऐकिली असतां कोट्यवधि कर्मांचा लोप होतो. विधि-निषेध कधीं बाधत नाहींत. इतका माझ्या कथेचा प्रभाव आहे. १०५.

मदर्थ कर्म करणाऱ्या पुरुषांच्या विहित कर्मांचा जर लोप झाला तर त्यांचें तें कर्म तीन कोटि महर्षी करतात. १.

माझी करितां सप्रेम भक्ती । भक्तांचीं नित्यकर्मे राहती । तेतीस कोटी ऋषिमहंती । संपूर्ण करिती कर्मे त्यांचीं ॥ ६ ॥ एवढें मत्कथेचें महिमान । माझें करितां कीर्तन पूजन । तेथें प्रत्यवायाचें तोंड कोण । संमुख वदन दावूं न शके ॥ ७ ॥ हो कां पूर्ण विरक्त नर । कां माझे सेवेसी जो तत्पर । तेथ कर्म बापुडें किंकर । हें स्वयें श्रीधर बोलिला ॥ ८ ॥ कर्मे करितां स्वधर्मस्थितीं । उद्धवा आहे माझी प्राप्ती । ते मी सांगेन तुजप्रती । यथानिगुती अवधारीं ॥ ९ ॥

स्वधर्मस्थो यजन्यज्ञैरनाशीःकाम उद्धव । न याति स्वर्गनरकौ यद्यन्यन्न समाचरेत् ॥१० ॥

गृहस्थाश्रमीं स्वधर्मस्थिती । जरी विचरेना अन्यगती । तरी येथेंचि लाहे विरक्ती । सुनिश्चितीं उद्धवा ॥ ११० ॥ अन्यगतींचें विवरण । तें तूं म्हणशील कोण । ऐक त्याचेंही लक्षण । समूळ खूण सांगेन ॥ ११ ॥ परद्रव्य परदाररती । परापवादाची वदंती । ही नांव गा नारकी गती । जाण निश्चितीं निर्धारू ॥ १२ ॥ दिविभोगाचेनि श्रवणें । ज्याच्या मनाचें बैसे धरणें । कर्मे तदनुकूल करणें । तें स्वर्गा भोगणें अलोट ॥ १३ ॥ या जाण दोन्ही अन्यगती । यांतूनि काढूनियां वृत्ती । यज्ञादिकीं मज यजिती । नैराश्यस्थिति नित्यनैमित्यें ॥ १४ ॥ तैं न पडे स्वर्गीचें पेणें । न घडे नरकासी जाणें । येचि लोकीं विरक्त होणें । तेंचि बोलणें हरि बोले ॥ १५ ॥

अस्मिँल्लोके वर्तमानः स्वधर्मस्थोऽनघः शुचिः । ज्ञानं विशुद्धमाप्नोति मद्भक्तिं वा यदृच्छया ॥ ११ ॥

माझी सप्रेम भक्ति करीत असतां भक्तांचीं नित्य कर्मे रहातात. तीं सर्व कर्मे तेहतीस कोटि देव व ऋषि-महंत पूर्ण करितात. ६ एवढा माझ्या कथेचा महिमा आहे. माझें कीर्तन व पूजन केलें असतां विधि-निषेधांची काय महती ! समोर येऊन ते तोंडहि दाखवूं शकत नाहींत. ७ पुरुष जर पूर्ण विरक्त असला, किंवा माझ्या सेवेंत तत्पर असला तर सर्व कर्मे बिचारीं दीन किंकर होऊन रहातात, असें स्वतः श्रीकृष्णानीं सांगितलें. ८ उद्धवा ! स्वधर्मांत राहून कर्मे केलीं असतां माझी प्राप्ति होते; त्याविषयींहि मी तुला यथार्थपणें सांगतों, ऐक. १०९.

—कर्मयोगी ज्ञान व भक्ति या भूमिकांवर कसा आरूढ होतो, तें सांगतात—

उद्धव–हे उद्धवा ! स्वधर्मस्थः यज्ञैः यजन् अनाशीःकामः यदि अन्यत् न समाचरेत् (तर्हि) स्वर्ग-नरकौ न याति–स्वधर्मांत स्थिर असलेला, यज्ञांनीं देवाचें पूजन करणारा व फलाची इच्छा न करणारा पुरुष जर निषिद्ध कर्म न करील तर तो स्वर्ग व नरक यांस प्राप्त होणार नाहीं. [विहित कर्म न करणें व निषिद्धाचें आचरण करणें या दोन कारणांनीं नरकप्राप्ति होते, पण हा स्वधर्मस्थ असतो व निषिद्धाचा त्याग करितो, म्हणून नरकास जात नाहीं. याला फलाची इच्छा नसते, म्हणून स्वर्गालाहि जात नाहीं, असा याचा भावार्थ.] १०.

उद्धवा ! गृहस्थाश्रमांत स्वधर्मानुसार राहिले, त्याच्या विरुद्ध आचरण केलें नाहीं, तर त्या आश्रमांतच विरक्ति प्राप्त होते. ११० 'आतां विरुद्ध आचरण कसें ' म्हणून विचारशील तर त्याचेंहि सविस्तर लक्षण सांगतों, ऐक ! ११ परद्रव्य, परस्त्री यांचा अपहार व परनिंदा या गोष्टी नरकाला नेणाऱ्या आहेत, हें निश्चित जाण. १२ स्वर्गसुखाचें वर्णन ऐकतांच त्यासाठीं ज्याचें मन धरणें धरून बसतें, तो त्याला अनुकूल अशीं कर्मे करून अवश्य स्वर्ग मिळवितो. १३ या दोन्ही विपरीत गति आहेत. यांतून आपलें मन काढून यज्ञादिकांच्या योगानें माझें पूजन केलें किंवा स्वधर्माचरण करणारानें फलाशा सोडून नित्य-नैमित्तिक कर्मे केलीं १४ तर त्याला स्वर्गांतहि वस्ती करावी लागत नाहीं किंवा नरकहि प्राप्त होत नाहीं. तो याच लोकीं विरक्त होतो. त्याविषयींच आतां श्रीहरि सांगत आहे. ११५.

अस्मिन् लोके वर्तमानः स्वधर्मस्थः अनघः शुचिः विशुद्धं यदृच्छया मद्भक्तिं वा आप्नोति–याच मनुष्यदेहांत रहाणारा, स्वधर्मांत स्थित असलेला, निषिद्धाचा त्याग करणारा, त्यामुळेंच रागादि मलशून्य पुरुष विशुद्ध ज्ञानाला किंवा यदृच्छेनें माझ्या भक्तीला प्राप्त होतो. [येथील यदृच्छया या पदानें केवळ ज्ञानाहूनहि भक्तीची दुर्लभता व्यक्त केली आहे.] ११.

असतां ये लोकीं वर्तमान । ऐसें करितां स्वधर्माचरण । होय पुण्यपापांचें निर्दळण । निर्मळत्वें जाण तो अतिपवित्र ॥ १६ ॥ तेथ निरसोनि भववन । प्रकाशे माझें शुद्ध ज्ञान । कां सप्रेम माझें भजन । परा भक्ति जाण तो लाहे ॥ १७ ॥ जे भक्तीमाजीं मी आपण । सदा होय भक्ताअधीन । तेथ मोक्षासहित ज्ञान । येऊनि आपण पायां लागे ॥ १८ ॥ ऐक ज्ञानाचा परिपाक । संसारा नांव महादुःख । मोक्ष तो म्हणे परम सुख । मद्भक्त देख दोनी न मनी ॥ १९ ॥ सप्रेम करितां माझें भजन । नाठवे भवभयबंधन । तेथ मोक्षासी पुरे कोण । मद्भक्तां पूर्ण भक्तीचा उल्हास ॥ १२० ॥ ज्यातें म्हणती महादुःख । तें भक्तांसी भगवद्रूप देख । ज्यातें म्हणती परम सुख । तेंहि आवश्यक भगवंत ॥ २१ ॥ यापरी भक्त माझ्या भजनीं । विसरला सुखदुःखें दोनीं । मी एकू भगवंतूवांचूनी । आन त्रिभुवनीं देखेना ॥ २२ ॥ ऐशी माझी भक्ति पूर्ण । साधूनि आणितां न ये जाण । जैं मी भगवंत होय प्रसन्न । तैं यदृच्छा जाण हे भक्ति लाभे ॥ २३ ॥ मी कैसेनि होय प्रसन्न । ऐसें कल्पील तुझें मन । तेथ नरदेह गा कारण । माझें प्रसन्नपण व्हावया ॥ २४ ॥

स्वर्गिणोऽप्येतमिच्छन्ति लोकं निरयिणस्तथा । साधकं ज्ञानभक्तिभ्यामुभयं तदसाधकम् ॥ १२ ॥

ज्यांसी स्वर्गभोगाची थोर जोडी । जिहीं अमरत्वाची उभविली गुढी । जे पडले स्वर्गाचे बांदवडीं । ते वांछिती आवडीं नरदेहातें ॥ २५ ॥ नरकयातना महाथोर । जिहीं भोगिले भोग घोर । ते मनुष्यदेहातें नर । अतिसादर वांछिती ॥ २६ ॥ नरदेह परम पावन । जो भक्तिज्ञानाचें आयतन । जेणें साधे ब्रह्मज्ञान । तो धन्य धन्य नरदेह ॥ २७ ॥ जेणें नरदेहें जाण । निःशेष खुंटे जन्ममरण ।

इहलोकीं असेपर्यंत अशाप्रकारें धर्माचरण केलें असतां पुण्यपापांचा नाश होऊन तो पुरुष निर्मलपणानें अति पवित्र होतो. १६ त्याची प्रपंचबुद्धि नाहींशी होऊन माझें शुद्ध ज्ञान त्याला प्राप्त होतें; किंवा प्रेमानें माझें भजन करून तो माझ्या श्रेष्ठ भक्तीला प्राप्त होतो. १७ त्या भक्तीनें मी आपण होऊनच भक्ताच्या अधीन होतों आणि मग मोक्षासहित ज्ञान स्वतःच येऊन त्याच्या पायां पडतें. १८ असें ज्ञानाचें फल आहे. संसाराला महादुःख म्हणतात व मोक्ष म्हणजे परम सुख समजतात. पण माझा भक्त सुख व दुःख तीं दोन्हीं मानीत नाहीं. १९ प्रेमानें माझें भजन करीत असतां संसारभयाच्या बंधनाची आठवणहि होत नाहीं; मग तेथें मोक्षाला कोण विचारितो ! कारण माझ्या भक्तांस भक्तीचाच पूर्ण उल्हास असतो. १२० ज्याला महादुःख म्हणतात, तें माझ्या भक्ताला भगवद्रूपच दिसतें व ज्याला परम सुख म्हणतात तेंहि तो भगवत्स्वरूपच मानितो. २१ याप्रमाणें भक्त माझ्या भजनांत सुख व दुःख हीं दोन्हीं साफ विसरून जातो. तो सगळ्या त्रिभुवनांत मज भगवानावांचून दुसरें कांहीं पहात नाहीं. २२ अशी माझी पूर्ण भक्ति मोठ्या प्रयत्नानेंहि साध्य होत नाहीं. मी जेव्हां प्रसन्न होतों, तेव्हांच दैवयोगानें ती सहज लाभते. २३ ' मी कशानें प्रसन्न होतों ' अशी जर तुझ्या मनांत शंका आली असली तर ऐक. मी प्रसन्न होण्यास मनुष्यजन्मच कारण आहे. १२४.

—याप्रकारें नरदेह, ज्ञान व भक्ति यांचें साधन असल्यामुळें त्याची स्तुति करितात—

यथा निरयिणः तथा स्वर्गिणः अपि एतं लोकं इच्छन्ति—जसे नरक योनींतील जीव तसेच स्वर्गांतील जीवहि त्या मनुष्यशरीराची इच्छा करितात. कारण हें नरशरीर, **ज्ञानभक्तिभ्यां साधकं**—ज्ञान व भक्ति यांचें साधक आहे, पण, **तत् उभयं असाधकं**—स्वर्गी व नारकी शरीर त्याचें असाधक आहे. १२.

ज्यांस स्वर्गसुखाचा परम लाभ घडला आहे, ज्यांनीं अमरत्वाची पताका उभारिली आहे, जे स्वर्गाच्या बंदींत पडले आहेत ते जीव मनुष्यदेहाची इच्छा करितात. २५ किंवा ज्यांनीं घोर नरकयातना भोगिल्या आहेत, ज्यांनीं भयंकर भोग भोगिले आहेत ते प्राणी मोठ्या आदरानें मनुष्यजन्म इच्छितात. २७ मनुष्यजन्म अतिशय पवित्र आहे.

जेणें जीव पावे समाधान । स्वानंदघन स्वयें होय ॥ २८ ॥ ज्या नरदेहाचे संगतीं । होय अविद्येची निवृत्ती । लाभे भगवत्पदप्राप्ती । हे विख्यात ख्याती नरदेहीं ॥ २९ ॥ ज्या नरदेहाची प्राप्ती । प्राणिमात्र वांछिती । प्राणी बापुडे ते किती । स्वयें प्रजापती नरदेह वांछी ॥ १३० ॥ ऐसें नरदेहाचें श्रेष्ठपण । येथ साधे भक्तिज्ञान । परी भक्तिज्ञानास्तव जाण । मनुष्यपण साधेना ॥ ३१ ॥

न नरः स्वर्गतिं काङ्क्षेन्नारकीं वा विचक्षणः । नेमं लोकं च काङ्क्षेत देहावेशात्प्रमाद्यति ॥ १३ ॥

झालिया नरदेहाची प्राप्ती । अधर्में होय नरकगती । कां संचितां पुण्यसंपत्ती । तेणें स्वर्गप्राप्ती अनिवार ॥ ३२ ॥ स्वर्गें होय पुनरावृत्ती । नरकीं घोर दुःखप्राप्ती । सांडोनि देहाची प्रीती । नरदेहीं आसक्ती धरूं म्हणसी ॥ ३३ ॥ मनुष्य देहाची आवडी । तेचि देहबुद्धि रोकडी । जेथें कामक्रोधाची पडे उडी । प्रमाद कोडी क्षणक्षणां ॥ ३४ ॥ नरक स्वर्ग इहलोक । यांची प्रीती सांडूनि देख । साधावें गा आवश्यक । ज्ञान चोख का निजभक्ति ॥ ३५ ॥ ज्ञान साधावयालागीं जाण । कष्टावें न लगे गा आपण । सप्रेम करितां माझें भजन । दवडितां ज्ञान घर रिघे ॥ ३६ ॥ गव्हांची राशी जोडल्या हातीं । सकळ पक्वान्नें त्याचीं होती । तेवीं आतुडल्या माझी भक्ति । ज्ञानसंपत्ती घर रिघे ॥ ३७ ॥ द्रव्य झालिया आपुले हातीं । सकळ पदार्थ घरास येती । तेवीं जोडल्या माझी भक्ती । भक्तिमुक्ति होती दासी ॥ ३८ ॥ म्हणसी करितां भगवद्भक्ति । विघ्नें छळावया आड येती । मी सुदर्शन घेऊनि हातीं । राखे अहोराती निजभक्तां ॥ ३९ ॥ पक्ष्याचेनि नामोच्चारें । म्यां वेश्या

तो भक्तिज्ञानाचें घरच आहे. ज्या देहांत ब्रह्मज्ञान प्राप्त होतें, तो मनुष्यदेह धन्य धन्य होय. २६ त्या नरदेहांत जन्ममरणाचा निःशेष नाश होतो व जीवाला समाधान प्राप्त होऊन तो स्वतःच आनंदघन परमात्मा होतो. २८ ज्या नरदेहामुळें अज्ञानाची निवृत्ति होते, भगवत्पदाचा लाभ घडतो, त्या या नरदेहाची अशी मोठी प्रसिद्धि आहे. २९ सर्व जीव-जंतु या मनुष्यजन्माची इच्छा करितात, यांत आश्चर्य कसलें ! इतर प्राणी तर बापडे राहोतच; पण स्वतः ब्रह्मदेव मनुष्यजन्म इच्छीत असतो. ३० असा या नरदेहाचा श्रेष्ठ महिमा आहे. या देहांतच भक्ति व ज्ञान प्राप्त होतें; पण भक्ति व ज्ञान यांसाठीं मात्र मनुष्यजन्म प्राप्त होत नाहीं. १३१.

विचक्षणः नरः स्वर्गतिं नारकीं वा न काङ्क्षेत्—विद्वान् पुरुषानें स्वर्गप्राप्तीची किंवा नरकाच्या गतीची इच्छा करूं नये. किंवा स्वर्ग व नरक यांना कारण होणारीं विहित व निषिद्ध कर्में करूं नयेत. **इमं लोकं च न काङ्क्षेत्**—हा मनुष्यदेह अति श्रेष्ठ आहे म्हणून मीं पुनरपि मनुष्यच व्हावें, अशीहि त्यानें आकांक्षा करूं नये. कारण, **देहावेशात् प्रमाद्यति**—देहासक्तीमुळें स्वार्थाकडे त्याचें लक्ष रहात नाहीं. १३.

मनुष्यजन्म प्राप्त झाला असतां अधर्माचरणानें नरकांत पडावें लागतें किंवा पुण्यकर्मांचा संचय केलेला असला तर उत्कृष्ट स्वर्गाचा लाभ होतो. ३२ स्वर्ग प्राप्त झाला तरी पुनर्जन्म सुटत नाहीं आणि नरकांत भयंकर दुःख भोगावें लागतें. म्हणून इतर देहाची आसक्ति सोडून आम्ही नरदेहावरच प्रीति करूं, ३३ म्हणून म्हणशील तर मनुष्यजन्माची आवड हीच मुळीं देहबुद्धि आहे. त्यांत काम-क्रोध प्रबल होतात व क्षणोक्षणीं असंख्य दोष घडवितात. ३४ यास्तव स्वर्ग-नरक व इहलोक यांवरील प्रीति सोडून माझ्या भक्तीनें ज्ञान संपादन करावें. ३५ तें संपादन करण्यास कष्ट मुळींच करावे लागत नाहींत. माझें सप्रेम भजन करीत असतां ज्ञानाला घालविलें तरी तें घरांत शिरतें. ३६ गव्हाच्या राशी हस्तगत करणारास जशीं सगळीं पक्वान्नें मिळतात, त्याप्रमाणें माझी भक्ति संपादन करणाराच्या घरीं ज्ञानसंपत्ति चालून येते. ३७ हातांत द्रव्य असलें म्हणजे घरबसल्या सगळे पदार्थ मिळतात, त्याप्रमाणें माझी भक्ति संपादन केली कीं, भुक्ति व मुक्ति या दोघी दासी होऊन रहातात. ३८ माझी भगवद्भक्ति करीत असतां त्याच्या आड विघ्नें येऊन छळीत असतात, असें जर म्हणशील, तर मी हातांत सुदर्शन घेऊन रात्रंदिवस माझ्या भक्तांचें रक्षण करीत असतों. ३९ केवल पक्ष्याला शिकविण्यासाठीं ' रामनामाचा ' उच्चार करणाऱ्या वेश्येचाहि मीं उद्धार केला.

तारिली चमत्कारें । पाडूनि विघ्नाचें दातौरें । म्यां व्यभिचारी उद्धरिली ।। १४० ।। यालागीं नरदेह पावोन । जो करी माझें भजन । तोचि संसारीं धन्य धन्य । उद्धवा जाण त्रिशुद्धी ।। ४१ ।। भावें करितां माझे भक्तीसी । भाविक उद्धरीं मी हृषीकेशी । जे चढले ज्ञानाभिमानासी । ते म्यां यमासी निरविले ।। ४२ ।। साधितां माझी भक्ति कां ज्ञान । ज्यासी चढे ज्ञानाभिमान । तो म्या आपुलेनि हातें जाण । दीधला आंदण महादोषां ।। ४३ ।। उद्धवा तूं ऐसें म्हणशी । ते कां दीधले यमहातेशीं । तो जाचूनियां महादोषियांसी । ज्ञानाभिमानासी सांडवी ।। ४४ ।। यालागीं सांडूनि देहाभिमान । भावें करितां माझें भजन । पूर्वील साधु सज्ञान । नरदेहें जाण मज पावले ।। ४५ ।।

एतद्विद्वान्पुरा मृत्योरभावाय घटेत सः । अप्रमत्त इदं ज्ञात्वा मर्त्यमप्यर्थसिद्धिदम् ।। १४ ।।

केवळ अस्थि चर्म मूत्र मळ । पाहतां देहो अतिकश्मळ । परी ब्रह्म परिपूर्ण निश्चळ । हें निर्मळ फळ येणें साधे ।। ४६ ।। ऐसें नरदेहाचें कारण । जाणोनि पूर्वील सज्ञान । सांडोनियां देहाभिमान । ब्रह्मसमाधान पावले ।। ४७ ।। देह निंद्य म्हणोनि सांडावा । तरी एवढा लाभ हारवावा । वंद्य म्हणोनि प्रतिपाळावा । तैं नेईल रौरवा निश्चित ।। ४८ ।। देह सांडावा ना मांडावा । येणें परमार्थचि साधावा । तें सावधान ऐक उद्धवा । गुप्त निजठेवा सांगेन ।। ४९ ।। जेणें देहें वाढे भवभावो । तेणेंचि देहेंकरीं पहा वो । होय संसाराचा अभावो । अहंभावो सांडितां ।। १५० ।। सांडावया देहाभिमान । पूर्वील साधु सज्ञान । होऊनि नित्य सावधान । ब्रह्मसंपन्न मद्रूपें ।। ५१ ।। नरदेहें ब्रह्मप्राप्ती । ऐसें मानूनि निश्चितीं । म्हणसी विषय-भोगांचे अंतीं । ब्रह्मस्थिति साधीन ।। ५२ ।। ऐसें विश्वासतां आपण । रोकडी आली नागवण । देहासवें लागलें मरण । हरिहरां जाण टळेना ।। ५३ ।। एवं देहाचें अनिवार्य मरण । तें केव्हां येईल न कळे

विघ्नांचे दांत पाडून मीं जारिणी स्त्रीचाहि उद्धार केला. १४० म्हणून हे उद्धवा ! जो मनुष्यजन्माला येऊन माझें भजन करितो, तोच संसारांत धन्य धन्य होय, हें तूं अगदीं खरें समज. ४१ श्रद्धेनें माझी भक्ति केली असतां मी परमात्मा त्या भाविकभक्तांचा उद्धार करितों आणि जे ज्ञानाभिमानी असतात, त्यांना मी यमाच्या स्वाधीन करितों. ४२ माझी भक्ति किंवा माझें ज्ञान प्राप्त झाल्यावर ज्याला त्याचा अभिमान वाटूं लागतो, तो स्वतःला महादोषांच्या स्वाधीन करितो. ४३ उद्धवा ! यावर तूं जर असें म्हणशील कीं, त्यांना तूं यमाच्या हातीं कां देतोस ! (तर त्याचें उत्तर ऐक.) यम त्या महादोषी लोकांना छळून त्यांचा ज्ञानाभिमान घालवितो. ४४ म्हणून ज्ञानाभिमान टाकून, भक्तीनें माझें भजन करून, पूर्वीचे ज्ञानसंपन्न साधु मनुष्यजन्मानेंच मला प्राप्त झाले. १४५.

एतत् विद्वान् सः इदं अर्थसिद्धिं अपि मर्त्यं ज्ञात्वा अप्रमतः मृत्युः. पुरा अभावाय घटेत—हा देह पुरुषार्थ-साधक आहे असें जाणणाऱ्या पुरुषानें पुरुषार्थसिद्धि करून देणाराहि हा देह मर्त्य आहे असें जाणून व आळस सोडून मृत्यु येण्यापूर्वींच मोक्षासाठीं यत्न करावा. १४.

वस्तुतः देहाचा विचार केला तर तो केवळ अस्थि, चर्म, मळ, मूत्र, इत्यादि दुर्गंधयुक्त आहे. परंतु त्या देहानेंच परिपूर्ण, निर्मल, निश्चल असें ब्रह्म प्राप्त होतें. ४६ मनुष्यदेह धारण करण्याचें हें कारण जाणून पूर्वींच्या ज्ञानी भक्तांनीं देहाभिमान सोडून ब्रह्मसमाधान मिळविलें. ४७ देह अपवित्र आहे, म्हणून सोडावा तर एवढा मोठा लाभ घालवावा लागतो. बरें, त्याला पूज्य मानून ठेवावा तर तो निश्चयानें रौरव नरकांत नेतो. ४८ यास्तव देहाचा तिरस्कारहि करूं नये, किंवा त्याचा अत्यादरहि करूं नये. त्याच्या योगें परमार्थ साधावा. उद्धवा ! तो कसा साधावा तें गुप्त रहस्य मी तुला सांगतों, ऐक. ४९ जो देह संसारांत अत्यंत आसक्त होतो, तोच देह अहंभाव सुटला असतां संसाराचा अभाव मानूं लागतो. १५० पूर्वींचे ज्ञानी साधु देहाभिमान सोडण्याविषयीं सावध राहूनच मद्रूपाला प्राप्त झाले. ५१ 'मनुष्यजन्मांत जर ब्रह्मप्राप्ति होते, तर मग अगोदर विषयोपभोग घेऊन शेवटीं ब्रह्मस्वरूप साधावें' ५२ असें जर म्हणशील तर अशा पुढल्या आशेवर विश्वासून बसणारा खात्रीनें नागवला जातो. कारण मरण देहाच्या पाठीस लागलेलें असतें. तें हरि-हरांस चुकवितां येत नाहीं. ५३ देहाच्या मरणाचें कोणालाच निवारण

जाण । यालागीं पूर्वींच आपण । निजस्वार्थ जाण साधावा ॥ ५४ ॥ धरितां निजदेहाची गोडी । अवचितां आदळे यमधाडी । बुडे निजस्वार्थाची जोडी । तें निजनिवाडी हरि सांगे ॥ ५५ ॥

छिद्यमानं यमैरेतैः कृतनीडं वनस्पतिम् । खगः स्वकेतमुत्सृज्य क्षेमं याति ह्यलम्पटः ॥ १५ ॥

जेवीं कां वृक्षाचे अग्रीं नीड । पक्षी करूनि वसे अतिगूढ । तळीं त्याचि वृक्षाचें बूड । छेदिती सद्दढ निर्दय नर ॥ ५६ ॥ तें देखोनि वृक्षच्छेदन । पक्ष्यें सांडोनि गृहाभिमान । पळाल्या पाविजे कल्याण । राहतां मरण अचुक ॥ ५७ ॥ त्या वृक्षाचिया ऐसें जाण । देहासवें लागलें मरण । तेथें जीवासी राहतां जाण । दुःख दारुण अनिवार ॥ ५८ ॥

अहोरात्रैश्छिद्यमानं बुद्ध्वायुर्भयवेपथुः । मुक्तसङ्गः परं बुद्ध्वा निरीह उपशाम्यति ॥ १६ ॥

अहोरात्र आयुष्यभंग । कळिकाळाचा सवेग वेग । हा जाण नीच नवा रोग । अंगीं सांग लागला ॥ ५९ ॥ काळें काळ वयसा खातू । हा देखोनि आयुष्याचा घातू । जाणोनि नरदेहाचा पातू । होय अनासक्त देहगेहां ॥ १६० ॥ जाणोनि देहाचें क्षणिकपण । त्यागावया देहाभिमान । साधावया भक्तिज्ञान । अतिसावधान जो होय ॥ ६१ ॥ न सांडितां देहाभिमान । अंगीं आदळे जन्ममरण । तेणें भयें कंपायमान । वैराग्य पूर्ण स्वयें धरी ॥ ६२ ॥ वैराग्ययुक्त करितां भक्ती । होय देहाभिमानाची निवृत्ती । तैं घर रिघे ज्ञानसंपत्ती । पायां लागती मुक्ती चारी ॥ ६३ ॥ ऐशी झालिया निजात्मप्राप्ती ।

करितां येत नाहीं. तें कोणत्या वेळेला येईल याचा नेम नाहीं. यासाठीं अगोदरच आपला स्वार्थ साधून घ्यावा. ५४ कारण देहाची आवड धरून बसलें असतां यमाची धाड अकस्मात् येऊन पडते व आपला स्वार्थ अंतरतो. याचाच निर्णय आतां हरि सांगत आहे. १५५.

—अप्रमत्त व मुक्तसंग पुरुष सुखी होतो, याविषयीं दृष्टान्त—

एतैः यमैः छिद्यमानं कृतनीडं स्वकेतं वनस्पतिं उत्सृज्य अलंपटः खगः क्षेमं याति हि—या यमासारख्या **निर्दय** पुरुषांकडून तोडिल्या जाणाऱ्या, ज्यावर आपलें घरटें केलें आहे अशा, आश्रयभूत वनस्पतीला सोडून अनासक्त पक्षी **दुसऱ्या सुखावह वृक्षाकडे** जातो. १५.

एखाद्या वृक्षाच्या शिखरावर पक्ष्यानें आपलें घरटें बांधावें व त्यांत गुप्तपणानें रहात असावें, पण त्याच वृक्षाला कोणीं निर्दय पुरुषानें मुळासकट तोडूं लागावें. ५६ अशावेळीं तें वृक्षच्छेदन पाहूनच जर तो पक्षी आपल्या घरट्यावरील अभिमान सोडून तत्काल पळून जाईल, तर त्याचें कल्याण होईल, पण जर तेथेंच राहील तर नेमका मरण पावेल. ५७ या वृक्षाप्रमाणेंच देहाच्या मागें मरण लागलेलें आहे. यास्तव या देहांत राहिल्यानें जीवाला अनिवार व दारुण दुःख भोगावें लागतें. १५८.

—दार्ष्टांतिक सांगतात—

अहोरात्रैः छिद्यमानं आयुः बुद्ध्वा भयवेपथुः मुक्तसंगः परं बुद्ध्वा निरीहः उपशाम्यति—**अहोरात्रांकडून आपलें** आयुष्य क्षीण केलें जात आहे, असें **जाणून** भयानें ज्याच्या अंगाला कंप सुटला आहे, असा मुक्तसंग पुरुष परमतत्त्वाला **जाणून**, **सर्व** व्यापारशून्य होऊन शांत होतो. १६.

या देहाचें आयुष्य रात्रंदिवस क्षीण होत असतें, कळिकाळाचा वेग प्रचंड आहे. त्याच्या मागें हाच नित्य नवा रोग आपल्या अंगांसह लागलेला आहे. ५९ काळ क्षणोक्षणीं आयुष्याला खात असतो. या आयुष्याचा नाश व देहाचा पात पाहून देह व गृह यांविषयीं अनासक्त व्हावें, १६० देहाचें क्षणभंगुरत्व जाणून, जो देहाभिमान सोडण्यासाठीं व भक्तिज्ञान साधण्यासाठीं अतिशय सावध असतो, ६१ देहाभिमान सोडला नाहीं तर जन्म-मरण नेमकें गांठणार, या भीतीनें जो थरथरां कांपतो, तो आपण होऊनच पूर्ण वैराग्य धारण करितो. ६२ वैराग्ययुक्त भक्ति केली असतां देहाभिमान निवृत्त होतो, त्याच्या घरीं ज्ञानसंपत्ति चालून येते व चारी मुक्ति त्याच्या पायां पडतात. ६३ **अशा**

सहजेंचि राहे प्रवृत्ती । प्रवृत्तींसी होय निवृत्ती । संसाराची शांति स्वयें होय ॥ ६४ ॥ ऐसे नरदेहा येऊनि देख । पुरुष पावले परम सुख । हें न साधिती जे मूर्ख । त्यांसी देवो देख निंदित ॥ ६५ ॥

नृदेहमाद्यं सुलभं सुदुर्लभं प्लवं सुकल्पं गुरुकर्णधारम् ।
मयानुकूलेन नभस्वतेरितं पुमान् भवाब्धिं न तरेत्स आत्महा ॥ १७ ॥

चौऱ्यायशीं लक्ष जीवयोनी । त्यांत मनुष्यदेहावांचूनी । अधिकारी ब्रह्मज्ञानीं । आन कोणी असेना ॥ ६६ ॥ जेणें देहें होय माझी प्राप्ती । यालागीं आद्य देहो यातें म्हणती । याची दुर्लभ गा अवाप्ती । भाग्यें पावती नरदेहा ॥ ६७ ॥ सदृढ म्हणजे अव्यंग । अविकळ सकळ भोग । नव्हे बहिरे मुके अंध पंग । सर्वांगें सांग संपूर्ण ॥ ६८ ॥ भरतखंडीं नरदेह प्राप्ती । हे परम भाग्याची संपत्ती । तेथही विवेकू परमार्थी । त्याचा वशवर्ती मी परमात्मा ॥ ६९ ॥ मी परमात्मा जेथ वशवर्ती । तेथ सुरनरांचा केवा किती । परी हा देह न लभे पुढती । दुर्लभ प्राप्ती नरदेहा ॥ १७० ॥ जोखितां पुण्यपाप समान । तैं नरदेहाची प्राप्ती जाण । तें पुढती पावावया आपण । जोखूनि कर्माचरण कोणी न करी ॥ ७१ ॥ पुण्य झालिया अधिक । स्वर्ग भोगणें आवश्यक । पापाचें वाढल्या तुक । भोगावे नरक अनिवार ॥ ७२ ॥ ऐशी कर्माची गति गहन । एथ काकतालीयन्यायें जाण । अवचटें लाभे माणुसपण । भवाब्धितारण महातारूं ॥ ७३ ॥ सुलभ म्हणिजे अविकळ । सुकल्प म्हणिजे विवेकशीळ । यासी चालविता केवळ । नावाडा कुशळ गुरु कर्णधार ॥ ७४ ॥ कानीं निजगुज उपदेशिता । यालागीं गुरु कर्णधार म्हणती तत्त्वतां । कानीं धारितांचि उद्धरीं भक्तां । यालागीं सर्वथा गुरु कर्णधार ॥ ७५ ॥

प्रकारचें आत्मस्वरूप प्राप्त झालें असतां, प्रवृत्ति सहजच बाजूला सरते आणि तिचें अनायासानें निरसन होतें. त्यायोगें संसार आपणच शांत होतो. ६४ आजवर असे अनेक पुरुष मनुष्यजन्माला येऊन परम सुखाला प्राप्त झाले आहेत. जे मूर्खलोक हें साधीत नाहींत त्यांची देव पुढील श्लोकांत निंदा करीत आहे. १६५.

—आतां प्रयत्न न करणाऱ्या प्रमत्ताची निंदा करितात—

यः पुमान् आद्यं सुदुर्लभं सुलभं सुकल्पं गुरुकर्णधारं मया अनुकूलेन नभस्वता ईरितं नृदेहं प्लवं प्राप्य—जो पुरुष सर्व फळांचें मूळ कारण; या देहानें संपादन केलेल्या कर्मांनीं सर्वप्राप्ति होते, पण अनेक उद्यमानेंहि प्राप्त होण्यास अशक्य; तथापि यदृच्छेनें प्राप्त झालेलें असल्यामुळें सुलभ व अति पटु; गुरुचा केलेला आश्रय हाच ज्याचा नेता आहे व केवल स्मरणानें अनुकूल झालेला जो मी त्याच अनुकूल वायूकडून प्रेरित झालेला अशा या नरदेहरूप नौकेस प्राप्त होऊन, भवाब्धिं न तरेत् सः आत्महा—जो संसारसागरास तरून जात नाहीं, तो आत्मघाती होय. १७.

प्राण्यांच्या चौऱ्यांशीं लक्ष योनी आहेत. त्यांत मनुष्यावांचून दुसरा कोणताहि प्राणि ब्रह्मज्ञानाचा अधिकारी नाहीं. ६६ या देहांत माझी प्राप्ति होते, म्हणून त्याला श्रेष्ठ जन्म म्हणतात. याची प्राप्ति मोठी दुर्लभ आहे. मोठ्या भाग्यानें नरदेह लाभतो. ६७ सदृढ म्हणजे सर्व अवयवांनीं युक्त, अव्यंग, सर्व सुखांची अनुकूलता, आंधळा-बहिरा-मुका-पंगु नसलेला असा सर्वांगपूर्ण सुंदर मनुष्यजन्म ६८ व तोहि भरतखंडांत मिळणें हें मोठ्या भाग्याचें लक्षण आहे. त्यांतूनहि ज्याच्या अंतःकरणांत परमार्थाचा विचार असतो, त्याचा मी परमात्मा अंकित होऊन रहातों. ६९ जेथें मी परमात्माच आज्ञाधारक झालों तेथें देव-मानवांची काय प्रतिष्ठा ! पण हा मनुष्यदेह पुढें लाभत नाहीं. नरदेहाची प्राप्ति दुर्लभ आहे. १७० जेव्हां पुण्य-पापाचें माप सारखें भरतें, तेव्हां मनुष्यजन्म मिळतो. पुनः आपल्याला मनुष्यजन्मच मिळावा म्हणून कोणी माणूस कर्माचरण करीत नाहीं. ७१ पुण्य अधिक झालें तर स्वर्ग भोगणें अवश्य आहे. पापाचा भार वाढला तर अनिवार नरक भोगणेंच प्राप्त आहे. ७२ अशी कर्माची गति मोठी गहन आहे. काकतालीय न्यायानें (म्ह० झाडाच्या डहाळीवर कावळा बसतांच ती मोडावी त्याप्रमाणें) संसारसागरांतून तारणारी मोठी नौकाच; असा हा मनुष्यजन्म अकस्मात् एखाद्या वेळीं प्राप्त होतो. ७३ सुलभ म्हणजे अव्यंग व सुकल्प म्ह० विवेकी अशा भक्तांना परतीराला नेणारा चतुर नावाडी सद्गुरूच आहे. ७४ गुरु आपल्या शिष्याच्या कानांत स्वतःचें हितगुज सांगतो; म्हणून त्याला कर्णधार म्हणतात. तो कान धरून भक्तांचा उद्धार करितो. यास्तव गुरूच सर्वथा कर्णधार आहे. ७५

भवाब्धीमाजीं नरदेह तारूं । तेथ सद्गुरु तोचि कर्णधारू । त्यासी अनुकूल वायू मी श्रीधरू । भवाब्धिपरपारू पावावया ॥ ७६ ॥ कैसा गुरु कर्णधार कुशळ । आवर्त खळाळ आंदोळ । चुकवूनि विकल्पाचे कल्लोळ । साम्यें पाणिढाळ सवेग काढी ॥ ७७ ॥ लावूनि विवेकाचें आवलें । तोडिती कर्माकर्मांचीं जळें । भजनशिडाचेनि बळें । नाव चाले सवेग ॥ ७८ ॥ कामक्रोधादि महामासे । तळपती घ्यावया आमिषें । त्यां घालूनि शांतीचेनि पाशें । तारूं उल्हासें चालवी ॥ ७९ ॥ ठाकतां सारूप्यादि बंदरें । तारुवामाजीं अतिगजरें । लागलीं अनाहत तुरें । जयजयकारें गर्जती ॥ १८० ॥ नेतां सलोकतेचे पेठे । तारूं उलथेल अवचटें । लावितां समीपतेचे वाटे । तारूं दाटे दोहीं सवां ॥ ८१ ॥ करावें सरूपतेमाजीं स्थिरू । तंव तो दाटणीचा उतरू । ऐसा जाणोनियां निर्धारू । लोटिलें तारूं सायुज्यामाजीं ॥ ८२ ॥ ते धार्मिकाची धर्मपेठ । नाहीं सुसकारा खटपट । वस्तु अवघीच चोखट । घ्यावी एकवट संवसाटी ॥ ८३ ॥ ऐसें दुर्लभ नरदेहाचें तारूं । जेथ श्रीगुरुकृपें कर्णधारू । येणें न तरेच जो संसारू । तो जाणावा नरू आत्महंता ॥ ८४ ॥ नरदेह वेंचिलें विषयांसाठीं । पुढें नरक भोगावया कल्पकोटी । तरी आपुलेनि हातें निजपोटीं । शस्त्र दाटी स्वयें जेवीं ॥ ८५ ॥ परपारा अवश्य आहे जाणें । तेणें नाव फोडूनि भाजिजे चणे । कां पांघरुणें जाळूनि तापणें । हिंवाभेणें सुज्ञांनीं ॥ ८६ ॥ तैसें येथ झालें गा साचार । थित्या नरदेहाला नागवले नर । पुढां दुःखाचे डोंगर । अतिदुस्तर ओढवले ॥ ८७ ॥ सकळ योनीं विषयासक्ती । सर्वांसी आहे निश्चितीं । नरदेहीं तैशी विषयस्थिती । तैं तोंडीं माती पडली कीं ॥ ८८ ॥ पावोनि श्रेष्ठ नरशरीर । जो नुतरेचि संसारपार । तो आत्महत्यारा नर । सत्य साचार उद्धवा ॥ ८९ ॥ कोटी ब्रह्महत्या गोहत्यांसी । प्रायश्चित्त आहे शास्त्रार्थेसीं । परी आत्महत्या घडे ज्यासी ।

या भवसागरामध्यें मनुष्य देह हीच नौका आहे. त्याचा कर्णधार म्ह० नावाडी सद्गुरु आहे आणि त्या भवसागराच्या परतीरावर जाण्यासाठीं अनुकूल वायु मी श्रीधर आहें. ७६ हा कर्णधार सद्गुरु किती चतुर असतो, पहा ! भोंवरे, हेलकावे, विकल्पाच्या लाटा व पाण्याचा लोट चुकवून तो आपली नौका त्वरेनें ढकलितो. ७७ विवेकाचें वल्हें घेऊन तो कर्म-अकर्माचें पाणी कापितो व भजनरूपी शिडाच्या बळावर ती नौका मोठ्या वेगानें चालवितो. ७८ कामक्रोधादि मोठाले मासे आमिषाच्या आशेनें टपलेले असतात. त्यांस शांतीच्या पाशांत अडकवून तो आपलें तारूं मोठ्या उल्हासानें चालवितो. ७९ वाटेंत सारुप्यादि मुक्तीचीं बंदरें आलीं असतां नौकेंत मोठी गर्जना होते. अनाहत शब्दाची तुतारी वाजते. जयजयकाराचा गजर होतो. १८० सलोकतेच्या पेठेला नौका लागली तर ती कदाचित् उलथून पडेल किंवा समीपतेच्या मार्गानें गेल्यास दोहों बाजूंनीं दुसऱ्या नौकांची गर्दी होईल. ८१ म्हणून सरूपतेमध्येंच नांगर टाकावा. कारण तेथें खोल पाण्याचा उतार आहे. हें जाणून ते आपली नौका सायुज्यामध्येंच लोटून देतात. ८२ तेथें धार्मिक लोकांची धर्मपेठ असते. तेथें कसलेच श्रम पडत नाहींत. सगळे पदार्थ निर्मळ व शुद्ध मिळतात. हवी ती देव-घेव करावी. ८३ असें हें नरदेहाचें तारू मोठें दुर्लभ आहे. जो पुरुष कर्णधार सद्गुरूच्या कृपेनें या संसारांतून तरून जात नाहीं, तो आत्मघातकी समजावा. ८४ पुढें कोट्यवधि कल्प नरकयातना भोगण्यासाठीं हा मनुष्यजन्म जर विषयोपभोगांत घालविला तर तें आपल्या हातानें आपल्याच पोटांत शस्त्र खुपसण्यासारखें आहे. ८५ नौकेंत बसून परतीराला जाण्याची इच्छा करणारानें ती नौका मोडून त्यांवर जसे चणे भाजून खावेत किंवा थंडी वाजते म्हणून पांघरुणें जाळून जसें शेकत बसावें, ८६ त्याप्रमाणें त्यांची स्थिति होते. ते प्राप्त झालेल्या मनुष्यजन्माला मुकतात व पुढें दुस्तर दुःखाचे डोंगर त्याच्या पुढें ओढवतात. ८७ इतर सगळ्या योनीमध्यें विषयासक्ति पूर्णपणें भरलेली आहे, असें असतांना मनुष्यजन्मांतहि विषयलोलुप झाल्यास त्याच्या तोंडांत मातीच पडणार. ८८ उद्धवा ! श्रेष्ठ मनुष्यजन्म प्राप्त होऊन जो संसाराच्या परतीराला जात नाहीं तो मनुष्य खरोखर आत्मघातकी जाणावा. ८९ कोट्यवधि ब्रह्महत्या

प्रायश्चित्त त्यासी असेना ॥ १९० ॥ जो आत्महत्या करूनि निमाला । तो मरतांचि नरकासी गेला । प्रायश्चित्ता कोण आहे उरला । मा शास्त्रार्थें बोला बोलावें ॥ ९१ ॥ अमृत विकूनि कांजी प्याला । तैसा नरदेहीं भोगू भोगविला । हा थोर नाड जीवासी झाला । विसरोनि आपुला निजस्वार्थ ॥ ९२ ॥ लाहोनि उत्तम शरीर । व्यर्थ विषयासक्त नर । नरकीं बुडाले अपार । हें शारङ्धर बोलिला ॥ ९३ ॥ असोत या मूर्खांचिया गोठी । ऐक उत्तमाची हातवटी । जे वेदार्थपरिपाटीं । निजहितदृष्टी सावध ॥ ९४ ॥ अतिविरक्त जे स्वभावें । तिहीं काय कर्तव्य करावें । कोणा अर्थातें त्यजावें । तेंचि देवें सांगिजे ॥ ९५ ॥

यदारम्भेषु निर्विण्णो विरक्तः संयतेन्द्रियः । अभ्यासेनात्मनो योगी धारयेदचलं मनः ॥ १८ ॥

जो कर्मारंभींच विरक्त । फळाशे नातळे ज्याचें चित्त । मज निजमोक्ष व्हावा येथ । हेंही पोटांत स्मरेना ॥ ९६ ॥ खडतर वैराग्याची दृष्टी । इंद्रियांसी विषयांची गोष्टी । करूंचि नेदी महाहटी । धारणा नेहटी दृढ राहे ॥ ९७ ॥ करूनियां श्रवण मनन । माझ्या स्वरूपाचें अनुसंधान । अखंड करी निदिध्यासन । तिळभरी मन ढळों नेदी ॥ ९८ ॥ धरोनि धारणेचें बळ । स्वरूपीं मन अचंचळ । अणुभरी होऊं नेदी विकळ । राखे निश्चळ निजबोधें ॥ ९९ ॥ एकाकी मन पाहें । स्वरूपीं कैसें निश्चळ होये । त्या अभ्यासाचे उपायें । स्वयें सांगताहे श्रीकृष्ण ॥ २०० ॥

धार्यमाणं मनो यर्हि भ्राम्यदाश्वनवस्थितम् । अतन्द्रितोऽनुरोधेन मार्गेणात्मवशं नयेत् ॥ १९ ॥

किंवा गोहत्या केल्या असतांहि त्यास शास्त्रानें प्रायश्चित्त सांगितलें आहे; परंतु आत्महत्या करणाराला कसलेंहि प्रायश्चित्त नाहीं. १९० जो आत्महत्या करून मरण पावतो, तो मरतांक्षणीं नरकांत जातो; मग प्रायश्चित्त घेणारा कोण उरणार ! करितां शास्त्रार्थाला दोष लावूं नये. ९१ अमृत विकून ज्याप्रमाणें पेज प्यावी त्याप्रमाणें मनुष्यदेहांत विषयोपभोग घेण्यानें जीवाची मोठी हानि होते व तो आपला खरा स्वार्थ विसरतो. ९२ उत्तम जन्म लाभला असतां अनेक विषयासक्त पुरुष व्यर्थ नरकांत बुडाले आहेत, असें श्रीकृष्णानें सांगितलें. ९३ या मूर्खांच्या गोष्टी राहोत; आतां आपल्या खऱ्या स्वार्थाविषयीं सावध रहाणाऱ्या व वेदार्थाप्रमाणें आचरण करणाऱ्या उत्तम लोकांची पद्धति ऐक. ९४ ज्यांचा स्वभाव अतिशय विरक्त असतो, त्यांनीं कोणतें कर्तव्य करावें व कोणती संपत्ति टाकावी हेंच श्रीकृष्ण सांगत आहे. १९५.

—याप्रमाणें अविरक्ताला वैराग्याच्या द्वारा ज्ञान व भक्ति साधून देणारा कर्मयोग आतां पूर्ण विरक्ताला योग व ज्ञान प्राप्त होण्यापूर्वी त्याचें किंचित् कर्तव्य व वर्जनीय पुढील साडेनऊ श्लोकांनीं सांगतात—

यदा आरम्भेषु निर्विण्णः विरक्तः संयतेन्द्रियः योगी आत्मनः अभ्यासेन मनः अचलं धारयेत्—पण जेव्हां योगी कर्माविषयीं दुःखदर्शनानें उद्विग्न व त्यांच्या फलाविषयीं विरक्त होईल, तेव्हां त्यानें सर्व इंद्रियांचा संयम करून आत्म-विषयक वृत्तीच्या अविच्छिन्न प्रवाहानें आपलें मन अचल धारण करावें. १८.

जो कर्माच्या आरंभींच विरक्त असतो, ज्याचें चित्त फलाशेला स्पर्शहि करीत नाहीं, ' मला मोक्ष मिळावा ' असें ज्याच्या मनांतहि कधीं येत नाहीं, ९६ ज्याच्या दृष्टींत तीव्र वैराग्य भरलेलें असतें, जो इंद्रियांची विषयांबरोबर कधीं भेटहि होऊं देत नाहीं इतका जो महाहठी असतो तो धारणेला आपल्या पूर्ण ताब्यांत ठेवितो. ९७ श्रवण-मननानें माझ्या स्वरूपाचेंच नित्य चिंतन करितो. अखंड माझेंच निदिध्यासन करितो. मनाला तेथून तिळभरहि ढळूं देत नाहीं. धारणेच्या बलानें आत्मस्वरूपांत मन स्थिर करितो. त्यास यत्किंचित्‌हि अस्थिर होऊं देत नाहीं. ९८ आत्मबोधानें तें निश्चल ठेवितो. ९९ परंतु मन एकदम आत्मस्वरूपांत स्थिर कसें होतें, या अभ्यासाचा उपायहि श्रीकृष्ण आतां सांगत आहे. २००.

—पण आरंभींच ही धारणा साध्य होत नाहीं, म्हणून मनाच्या स्वभावानुसार त्याचें वशीकरण सांगतात—

धार्यमाणं मन यर्हि आशु भ्राम्यत् अनवस्थितं भवति—याप्रमाणें अचल धारण केलें जाणारें मन जेव्हां वेगानें परिभ्रमण करीत होत्सातें अस्थिर होतें, तेव्हां, **अतंद्रितः अनुरोधेन मार्गेण आत्मवशं नयेत्**—आळस सोडून त्याच्या इच्छेप्रमाणें त्याला तृप्त करणें या मार्गानें त्याला स्वात्मवश करावें. १९.

स्वरूपीं लावितां अनुसंधान । जरी निश्चळ नव्हे मन । न सांडी आपुले गुण । चंचळपण स्वभावें ॥ १ ॥ साधक आळसें विकळे । कां आठवी विषयसोहळे । तैं स्वरूपींहूनि मन पळे । निज चंचळें स्वभावें ॥ २ ॥ तेथें नेहटूनि आसन । स्वयें होऊनि सावधान । स्मरोनि सद्गुरूचे चरण । स्वरूपीं मन राखावें ॥ ३ ॥ नेदितां विषयदान । हाटवलें क्षोभे मन । तरी न सांडोनि अनुसंधान । द्यावें अन्नपान विधानोक्त ॥ ४ ॥ आशंका ॥ सर्पा पाजिलें पीयूष । तेंचि परतोनि होय विष । तेवीं मनासी देतां विषयसुख । अधिक देख खवळेल ॥ ५ ॥ ऐसें द्यावें विषयदान । जेणें आकळलें राहे मन । तेंचि अर्थाचें निरूपण । स्वयें नारायण सांगत ॥ ६ ॥

मनोगतिं न विसृजेज्जितप्राणो जितेन्द्रियः सत्त्वसंपन्नया बुद्ध्या मन आत्मवशं नयेत् ॥ २० ॥

मोकळें न सांडूनि मन । न सोडूनि अनुसंधान । करावें अन्नपानशयन । हें विषयदान निजहिता ॥ ७ ॥ साधकें साधूनि आपण । जरी जिंतिले इंद्रियप्राण । तरी मोकळें सोडूं नये मन । स्वरूपीं नेहटून राखावें ॥ ८ ॥ जो मनासी विश्वासला । तो कामक्रोधीं नागवला । संकल्पविकल्पीं लुटिला । विसंचिला महामोहें ॥ ९ ॥ जाणोनि मनाचें महाबळ । त्यासी विवेक द्यावा मोकळ । तो हालों नेदी केवळ । करी निश्चळ निजांगें ॥ २१० ॥ मनाविवेकाचे उभय संधीं । सत्वसंपन्न होय बुद्धी । ते विषयांचे कंद छेदी । तोडी उपाधी सविकार ॥ ११ ॥ मन जेथ जेथ पळोनि जाये । तेथ तेथ विवेक उभा राहे । मग सत्वबुद्धीचेनि साह्यें । मोडी पाये मनाचे ॥ १२ ॥ ऐसें मनाचें खुंटलिया बळ । मन स्वरूपीं होय निश्चळ । जेवीं जळगार केवळ । ठाके गंगाजळवस्तीसी ॥ १३ ॥ यापरी स्वरूपीं मन । स्वयें पावे समाधान ।

माझ्या स्वरूपाचें चिंतन करण्यांत मनाची एकाग्रता झाली नाहीं व तें मन आपल्या चंचल स्वभावाप्रमाणें स्थिर झालें नाहीं, १ तर साधक विह्वल होतो किंवा विषयांतील सुख आठवूं लागतो. त्यामुळें मन आपल्या चंचल स्वभावामुळें आत्मस्वरूपापासून पळूं लागतें. २ त्यावेळीं साधकानें आसन स्थिर करून, चित्त सावध ठेवून, सद्गुरुचरणाचें स्मरण करून, आत्मस्वरूपांत मन लावावें. ३ विषयोपभोग न मिळाल्यामुळें हट्टी मन जर क्षुब्ध झालें, तर आपलें चिंतन न सोडितां त्याला विधियुक्त अन्नजल द्यावें. ४ (आशंका) पण सर्पाला अमृत जरी पाजलें तरी तें जसें विष होतें, त्याप्रमाणें मनाला विषयसुख दिलें असतां तें जास्तच खवळेल ! ५ (उत्तर) मनाला अशाप्रकारचे विषय द्यावे कीं, त्यांतच तें गुंतून राहील. याच अर्थाचें निरूपण स्वतः नारायण आतां करीत आहे. २०६.

—'तर मग तें पूर्वींसारखेंच राहील' अशी आशंका घेऊन सांगतात—

मनोगतिं न विसृजेत्—पण मनाच्या स्वाभाविक गतीची उपेक्षा करूं नये. तर, **जितप्राणः जितेंद्रियः सत्त्वसंपन्नया बुद्ध्या मनः आत्मवशं नयेत्**—प्राण व इंद्रियें यांना स्वाधीन ठेवून म्ह० अप्रमत्त होऊन सत्त्वयुक्त बुद्धीनें मनाला आत्मवश करावें. २०.

मनाला मोकळें न सोडितां व अनुसंधान न टाकितां आहार, निद्रा इत्यादि व्यवहार करणें यालाच हितकर विषयदान म्हणतात. ७ साधकानें इंद्रियें व प्राण यांचें नियमन जरी साध्य केलें तरी त्यानें मनाला केव्हांहि मोकळें सोडूं नये. त्याचा निग्रह करावा. ८ जो मनावर विश्वास ठेवितो, त्यास काम-क्रोध खात्रीनें नागवितात, संकल्प-विकल्प लुटतात व महामोह त्यास नाडितो. ९ मनाचें हें सामर्थ्य जाणून त्याच्या जोडीला विवेकाला मोकळा सोडून द्यावा. म्हणजे तो मनाला मुळींच जागचें हलूं देत नाहीं. आपणच स्थिर करून ठेवितो. २१० मन आणि विवेक यांच्या संधींत बुद्धि सत्त्वगुणानें युक्त होते. ती विषयांचें मूळ छेदून टाकिते व विकारासह उपाधीला तोडून टाकिते. ११ मन जेथें जेथें पळून जातें, तेथें तेथें विवेक त्याच्या समोर जाऊन उभा रहातो आणि मग सत्त्वबुद्धीच्या साह्यानें मनाचे पायच मोडून टाकितो. १२ अशा रीतीनें मनाचें बळ खुंटलें कीं, मग पाण्यांतील गार जशी गंगेच्या पाण्यांतच रहाते त्याप्रमाणें तें मन स्वरूपांत स्थिर होतें. १३ अशा प्रकारें मन स्वरूपामध्यें स्वतःच समाधानानें राहूं लागलें कीं, तो

तोचि योग परम पावन । समाधान जीवशिवां ॥ १४ ॥ जीव परमात्म्यांची एकात्मता । तोच परम योग तत्त्वतां । येचिविखींची कथा । अश्वदृष्टांतां हरि सांगे ॥ १५ ॥

एष वै परमो योगो मनसः संग्रहः स्मृतः । हृदयज्ञत्वमन्विच्छन् दम्यस्येवार्वतो मुहुः ॥ २१ ॥

जैसा अश्वारूढ उपलाणी । वश्य करी अश्वसाहणी । मागें तरटां चाकर झणाणी । पुढें राखे नेहटूनि रागवागा ॥ १६ ॥ तेथ जें जें पाऊल वोजा करी । तेथ मान दे जीजीकारीं । जेथ फुटोनि पडे बाहेरी । तेथ तरट मारी सवर्मे ॥ १७ ॥ जेथ हटावला न सांडी खोडी । ते ठायीं दे मोकळी-वाडी । परी निःशेष पिडी ना सोडी । ऐसा पडिपाडी राखत ॥ १८ ॥ दमनीं देखोनि अत्यादरू । स्वामिहृदय जाणे वारू । आणि वारुवाचें अभ्यंतरू । कळे साचारू स्वामीसी ॥ १९ ॥ ऐसें उभयहृदय ऐक्ययोगें । वारू न धरितां रागवागें । अडणें उडणें सांडी वेगें । मग नाचों लागे मोकळा ॥ २२० ॥ ऐसें वश्य केलिया अश्वातें । मग कल्यांचिया मनोगतें । वारू नाचे काचेनि सुतें । यापरी मनातें दमावें ॥ २१ ॥ मनोजयो कीजे आपण । तोचि योग परम कारण । हेंचि मागिले श्लोकीं निरूपण । तुज म्यां संपूर्ण सांगीतलें ॥ २२ ॥ ' नृदेहमाद्यं ' या श्लोकाचे अंतीं । कर्मवैराग्यद्वारा मुक्ती । आतां सांगीतली हे स्थिती । उत्तमगती अभ्यास ॥ २३ ॥ मुख्य सांख्ययोगें माझी प्राप्ती । तें मी सांगेन तुजप्रती । मिथ्या संसाराची स्फूर्ती । ब्रह्मसंवित्तीं साचार ॥ २४ ॥ हें ज्ञानगहन निरूपण । तुज मी सांगेन गुह्य ज्ञान । जें असोनि त्रिगुणीं वर्तमान । अलिप्त जाण गुणकार्या ॥ २५ ॥ तुज मी

परम पवित्र योग समजावा. त्यानें जीव-शिवांचें ऐक्य होतें. १४ जीव-परमात्म्यांचें ऐक्य हाच खरोखर श्रेष्ठ योग होय. याविषयींची कथा घोड्याचा दृष्टान्त देऊन श्रीहरि आतां सांगत आहे. २१५.

एकोणिसाव्या श्लोकांत सांगितलेल्या अनुलोममार्गाची सदृष्टान्त स्तुति करितात—

एषः वै मनसः संग्रहः परमः योगः स्मृतः—हा अनुवृत्ति मार्गानें मनाचा संग्रहच परमयोग म्हटला आहे. कारण हा अनुवृत्तिमार्ग परम योगाचें साधन आहे. म्हणून उपचारानें त्याची परम योग या शब्दानें स्तुति केली आहे. [याविषयीं दृष्टान्त—] दम्यस्य अर्वतः मुहुः हृदयज्ञत्वं अन्विच्छन् इव—ज्याप्रमाणें अशिक्षित घोड्याला शिक्षण द्यावयाचें असतां त्याचा शिक्षक प्रथम त्याच्या इच्छेप्रमाणेंच त्याला जाऊं देतो त्याप्रमाणें योग्यानें मनाला प्रथम त्याच्या इच्छेप्रमाणें वागूं द्यावें. [अश्वाला शिकविणारा कांहीं वेळ लगाम हातांत धरूनच त्याच्या इच्छेप्रमाणें त्याला चालूं देतो व मग हळूहळू त्याला आपल्या इच्छेप्रमाणें चालावयास लावितो. मनाचाहि तसाच निरोध करावा, असा याचा भावार्थ.] २१.

उपलाणी म्ह० जिनावांचून घोड्यावर बसलेला स्वार जसा त्या घोड्याला आपल्या ताब्यांत ठेवितो, मागून त्याचा चाकर चाबूक चमकावीत असतो व तो स्वार घोड्याला चाल लावण्यासाठीं लगाम ओढून धरितो. १६ जेव्हां तो सरळ पाऊल टाकितो, तेव्हां त्याच्या मानेवर थोपटून त्याला शाबासकी देतो व जेव्हां त्याची चाल चुकते तेव्हां त्याच्या मर्मावर चाबकाचा फटकारा मारितो. १७ तो घोडा जेव्हां अडतो व आपली खोड टाकीत नाहीं तेव्हां त्याला मोकळा सोडितो; पण त्याचा मार अगदींच चुकत नाहीं. १८ अशा युक्ति-प्रयुक्तीनें तो घोड्याला आपल्या कह्यांत ठेवितो. आपल्याला ताब्यांत ठेविण्याचा धन्याचा प्रयत्न तो घोडा जाणत असतो व घोड्याचें मनहि त्याचा धनी जाणत असतो. १९ असें दोघांचें मन एक झाल्यावर घोडा तुफान न होतां धन्याच्या आज्ञेंत रहातो, अडेलपणा, हटेलपणा तो सोडून देतो व मग मोकळा सोडला तरी नाचूं लागतो. २२० अशाप्रकारें घोडा एकदां कह्यांत आला कीं, मग तो जसा कच्च्या सुतानेंहि धन्याच्या इच्छेप्रमाणें वागतो, त्याप्रमाणें मनाला ताब्यांत ठेवावें. २१ स्वतःच मनाला जिंकावें. हाच श्रेष्ठ योग आहे. याविषयीं सविस्तर निरूपण मागील श्लोकांत केलें आहे. २२ ' नृदेहमाद्यम् ' या पदानें सतराव्या श्लोकाच्या शेवटीं कर्म-वैराग्याच्या द्वारां मुक्ति मिळते, हें सांगितलें. उत्तम-स्थिति म्हणजे अभ्यास. याचेंहि आतांच वर्णन केलें. २३ मुख्य सांख्ययोगानेंच माझी प्राप्ति होते, तेंहि तुला सांगतों, ऐक. कारण ब्रह्मसाक्षात्कार झाला असतां संसाराची स्फूर्ति मिथ्याच ठरते. २४ हें गहनज्ञानाचें निरू-पण आहे. तरी मी तुला तें गुह्य ज्ञान सांगतों. तें ज्ञान त्रिगुणांत रहात असून गुणकार्यापासून अलिप्त आहे. २५

सांगेन गुह्य ज्ञान । हें ऐकोनि देवाचें वचन । उद्धव स्वयेंचि झाला कान । अतिसावधान श्रवणार्थी ।। २६ ।। देखोनि उद्धवाचा अत्यादरू । आर्तचित्तचकोरचंद्रू । निजज्ञानगुणसमुद्रू । काय यादवेंद्रू बोलिला ।। २७ ।।

सांख्येन सर्वभावानां प्रतिलोमानुलोमतः भवाप्ययावनुध्यायेन्मनो यावत्प्रसीदति ।। २२ ।।

जें सृष्टिपूर्वी अलिप्त । तेंचि सृष्टिउदयीं सृष्टीआंत । महत्तत्त्वादि देहपर्यंत । तत्त्वीं अनुगत तेंचि वस्तु ।। २८ ।। आणि सृष्टीच्या स्थितिविशेषीं । गुणकार्यातें तेंचि प्रकाशी । शेखीं गुणकार्यातें ग्रासी । उरे अवशेषीं तें वस्तू ।। २९ ।। नग न घडतां सोनेंचि साचें । नग घडवितां सोनेंपण न वंचे । नग मोडितां सोन्याचें । घडामोडीचें भय नाहीं ।। २३० ।। मेघापूर्वी शुद्ध गगन । मेघा सबाह्य गगन जाण । मेघ विराल्या गगनीं गगन । अलिप्त जाण संचलें ।। ३१ ।। तेवीं उत्पत्तिस्थितिप्रळयांतीं । वस्तु संचली अलिप्तस्थिती । तेही विखींची उपपत्ती । उद्धवा तुजप्रती सांगेन ।। ३२ ।। कुलाल जें जें भांडें घडित । त्यासी मृत्तिका नित्य व्याप्त । तेवीं जें जें तत्त्व उपजत । तें तें व्यापिजेत वस्तूनें ।। ३३ ।। सागरीं जे जे उपजे लहरी । तिसी जळ सबाह्यांतरीं । तेवीं-महत्तत्त्वादि देहवरीं । सबाह्याभ्यंतरीं चिन्मात्र ।। ३४ ।। हो कां जो जो पदार्थ निपजे । तो आकाशें व्यापिजे सहजें । तेवीं जें जें तत्त्व उपजे । तें तें व्यापिजे चैतन्यें ।। ३५ ।। अनुलोमें पाहतां यापरी । वस्तूवेगळें तिळभरी । कांहीं न दिसे गा बाहेरी । निजनिर्धारीं विचारितां ।। ३६ ।। पृथ्वीपासूनि प्रकृतीवरी । लयो पाहतां प्रतिलोमकरीं । जेवीं

तें 'गुह्य ज्ञान मी तुला सांगेन.' हें श्रीकृष्णाचें वचन ऐकून उद्धव श्रवणासाठीं अति उत्सुक असल्यामुळें एकाग्र चित्त करून ऐकूं लागला. २६ उद्धवाचा हा अत्यंत आदर पाहून आर्तचित्तरूपी चकोराला तृप्त करणारा चंद्रच किंवा आत्मज्ञानरूप गुणांचा सागरच असा यादवांतील श्रेष्ठ श्रीकृष्ण काय बोलला, तें ऐका. २२७.

—याप्रमाणें किंचित् वश करून घेतलेल्या मनाला अत्यंत निर्मल करून घेण्याचे उपाय पुढील तीन श्लोकांनीं सांगतात—

सांख्येन सर्वभावानां प्रतिलोमानुलोमतः यावत् मनः प्रसीदति तावत् भवाप्ययौ अनुध्यायेत्-तत्त्वविवेकानें महदादि देहांत सर्व भावांच्या उद्भवाचें, अनुलोमानें म्ह० प्रकृत्यादि क्रमानें व प्रतिलोमक्रमानें म्ह० पृथिव्यादि क्रमानें त्यांच्या प्रलयाचें, मन निश्चल होईपर्यंत, अनुचिंतन करावें. २२.

जें सृष्टीच्या पूर्वी अलिप्त असतें, तेंच सृष्टि उत्पन्न झाल्यावर सृष्टींत महत्तत्त्वापासून देहापर्यंत व्यापून रहाणारें परब्रह्म होय. २८ सृष्टीच्या विशेष स्थितींत गुणकार्यास व्यक्त करणारें आणि अंतीं त्या गुणकार्यांस ग्रासून उरणारें तें ब्रह्मच होय. २९ अलंकार घडविण्यापूर्वी जें सोनें असतें, तेंच अलंकारांत कायम रहातें व तें दागिने मोडले, तरी त्या घडामोडीपासून सोन्याला कांहीं भय नसतें, २३० किंवा मेघ येण्यापूर्वी आकाश स्वच्छ असतें, मेघाच्या आंत-बाहेरहि आकाशच व्यापून रहातें व ते मेघ गेल्यावरहि आकाश अलिप्तपणानें जसें कायमच असतें, ३१ त्याचप्रमाणें उत्पत्ति-स्थिति-लय यांच्या शेवटीं परब्रह्म अलिप्तपणानें कायम रहातें. उद्धवा ! त्याविषयींची उपपत्ति तुला सांगतों, ती ऐक. ३२ कुंभार जें जें भांडें बनवितो, तेवढें सगळें मातीनें जसें नित्य व्यापिलेलें असतें, त्याप्रमाणें जेवढें तत्त्व उत्पन्न होतें, तेवढें ब्रह्मानें व्यापिलेलें असतें. ३३ समुद्रांत जेवढ्या लाटा येतात तेवढ्या सगळ्या अंतर्बाह्य जलानें जशा युक्त असतात; त्याप्रमाणें महत्तत्त्वापासून देहापर्यंत सर्व आंतून बाहेरून केवळ चित्स्वरूप असतें. ३४ जेवढा पदार्थ उत्पन्न होतो, त्याला आकाश जसें स्वभावतः व्यापितें, त्याप्रमाणें जेवढें तत्त्व उत्पन्न होतें तेवढें चैतन्यानें व्यापिलेलें असतें. ३५ याप्रमाणें मूळकारणापासून शेवटच्या कार्यापर्यंत एकहि वस्तु चैतन्याला सोडून नाहीं. ही गोष्ट बाह्य स्थूल दृष्टीनें जरी न दिसली, तरी विवेकानें निश्चित होते. ३६ याच्या

जळगारा जळाभीतरीं । तेवीं लयो चिन्मात्रीं तत्त्वांचा ॥ ३७ ॥ प्रकृत्यादि तत्त्वें प्रबळलीं । विकरोनि लया गेलीं । वस्तू अलिप्तपणें संचली । नाहीं माखली अणुमात्र ॥ ३८ ॥ एवं उत्पत्तिस्थितिप्रळयांत । वस्तू अविनाशी अलिप्त । नित्य शुद्ध बुद्ध मुक्त । जाण निश्चित उद्धवा ॥ ३९ ॥ ऐशा वस्तूच्या ठायीं भवजल्प । तो जाण पां मिथ्या आरोप । जेवीं दोराअंगीं सर्प । वृथा भयकंप भ्रांतासी ॥ २४० ॥ सर्प दवडूनी दोर शुद्ध । करावा ऐसा नाहीं बोधू । एकला एक परमानन्दू । ऐसें गोविंदू बोलिला ॥ ४१ ॥ ऐशिये वस्तूच्या ठायीं जाण । मन विसरे मनपण । येणें साधनें पैं जाण । होय ब्रह्मपूर्ण साधकू ॥ ४२ ॥ हें परम अगाध साधन । ज्यासी नाटोपे गा जाण । त्याचें निश्चळ व्हावया मन । सुगम साधन देवो सांगे ॥ ४३ ॥

निर्विण्णस्य विरक्तस्य पुरुषस्योक्तवेदिनः । मनस्त्यजति दौरात्म्यं चिन्तितस्यानुचिन्तया ॥ २३ ॥

जन्ममरणांचे महाआवर्त । भोगितां वैराग्यें अतिसंतप्त । अतएव विषयीं विरक्त । जैसें विषययुक्त परमान्न ॥ ४४ ॥ मघमघीत अमृतफळ । त्यावरी सर्पें घातली गरळ । तेवीं विषयमात्र सकळ । देखे केवळ महाबाधा ॥ ४५ ॥ ऐसेनि विवेकें विवेकवंत । श्रद्धापूर्वक गुरुभक्त । गुरूनें सांगीतला जो अर्थ । तो हृदयांत विसरेना ॥ ४६ ॥ गुरूनें बोधिला जो अर्थ । सदा असे तो हृदयीं ध्यात । चित्तीं चिंतिला जो अर्थ । तोचि असे चिंतित पुनःपुनः ॥ ४७ ॥ करितां प्रत्यावृत्तीं चिंतन । संकल्प विकल्प सांडी

उलट क्रमानें पृथ्वीपासून प्रकृतीपर्यंत होणारा लय पाहूं गेलें असतां, ज्याप्रमाणें पाण्यापासून झालेल्या गारेचा लय पाण्यांतच होतो, त्याप्रमाणें सर्व तत्त्वांचा लय चिन्मात्रांत होतो. ३७ प्रकृतीपासून सर्व तत्त्वें प्रबल होतात व विकार पावून त्यांचा लय होतो; परंतु त्यांत असलेलें ब्रह्मतत्त्व मात्र अलिप्तपणें कायम रहातें. तें यत्किंचितहि लिप्त होत नाहीं. ३८ उद्धवा! याप्रमाणें ब्रह्मतत्त्व उत्पति-स्थिति-लयकालीं अविनाशी, अलिप्त, नित्य शुद्ध-बुद्ध-मुक्त असेंच रहातें, हें खात्रीनें जाण. ३९ अशा ब्रह्मस्वरूपावर संसाराचा मिथ्या आरोप झाला आहे. दोरीवर सर्पाचा आरोप करून भ्रांत मनुष्य व्यर्थ भीतीनें कांपत असतो. २४० कारण तो सर्प नसून ती दोरी आहे, हें जाणण्याइतकें त्याच्या अंगीं ज्ञान नसतें पण सर्वत्र एकच परमानंद भरलेला आहे, असें श्रीकृष्ण म्हणाला. ४१ अशा परब्रह्मांत मनहि आपला मनपणा विसरून जातें. याच साधनानें साधक पूर्णपणें ब्रह्मस्वरूप होतो. ४२ हें परम श्रेष्ठ, पण दुर्गम साधन आहे. तें ज्याला साध्य करितां येणार नाहीं, त्याचें मन स्थिर होण्याचा सोपा उपाय आतां श्रीहरि सांगत आहे. २४३.

—त्यानंतर उत्पत्ति विनाशशील अशा त्या सर्व अधिभूत भावांमध्यें आत्मदर्शनामुळें तद्रूपत्वास प्राप्त झालेल्या **संसाराविषयीं—**

निर्विण्णस्य विरक्तस्य उक्तवेदिनः पुरुषस्य मनः—दुःखदर्शनानें उद्विग्न झालेल्या व त्यामुळेंच त्याविषयीं विरक्त झालेल्या म्हणूनच गुरूनें उपदेशिलेल्या अर्थाचें आलोचन करणाऱ्या पुरुषाचें मन, **चिन्तितस्य अनुचिन्तया दौरात्म्यं त्यजति**—गुरूपदिष्ट अर्थाचेंच पुनः पुनः अनुचिंतन केल्यामुळें देहादि अभिमान टाकितें. २३.

जन्म-मरणाच्या भयंकर भोंवऱ्यांतील क्लेश भोगिल्यावर जीव वैराग्यानें संतप्त होतो. त्यामुळें तो विषयांविषयीं विरक्त होतो. त्याला विषय विषानें युक्त असलेल्या मिष्टान्नाप्रमाणें वाटतात. ४४ उत्तम पिकलेला पाडाचा आंबा असावा व त्यावर सर्पानें गरळ टाकावी, म्हणजे तें फळ जसें त्याज्य होतें, त्याप्रमाणें तो विषयांपासून भयंकर बाधा होईल असें समजतो. ४५ अशा विवेकानें युक्त असलेला विवेकवान गुरुभक्त गुरूनें सांगितलेला अर्थ कधींहि विसरत नाहीं. ४६ गुरूनें जो उपदेश केलेला असेल त्याचें हृदयांत ध्यान करितो व मनानें चिंतिलेल्या अर्थाचें पुनः पुनः चिंतन करितो. ४७ वारंवार चिंतन केल्यानें मन संकल्प-विकल्प सोडितें व देहाभिमान सोडून स्वतःच ब्रह्मरूप होतें.

मन । त्यजोनियां देहाभिमान । ब्रह्मसंपन्न स्वयें होय ॥ ४८ ॥ झालिया ब्रह्मसंपन्न । स्वरूपीं लीन होय मन । हाही एक उपावो जाण । न ठाके तरी आन अवधारीं ॥ ४९ ॥

यमादिभिर्योगपथैरान्वीक्षिक्या च विद्यया । ममार्चोपासनाभिर्वा नान्यैर्योगं स्मरेन्मनः ॥ २४ ॥

त्यजोनियां सकळ भोग । यमनियमेंसीं योगमार्ग । आसनस्थ होऊनि चांग । देऊनि मुद्रा सांग अवधारीं ॥ २५० ॥ तेव्हां अपान ऊर्ध्व मुखें वाढे । जो वरता स्वधिष्ठान चढे । प्राणायामीं अडे । तो मागुता मुरडे नाभिस्थाना ॥ ५१ ॥ सम होतां प्राणापान । पिंडब्रह्मांडशोधन । स्वयें वायु करी गा आपण । मलक्षालन शरीरीं ॥ ५२ ॥ कफ पित्त दोहीं खाये । नाडींतें शोधीत जाये । जुने संचित मल पाहें । तेही लवलाहें निर्दळी ॥ ५३ ॥ नवल वायूचें प्रबळ बळ । पिंडब्रह्मांडींचे सकळ मळ । धोऊनि करी गा निर्मळ । पवित्रता केवळ महायोगें ॥ ५४ ॥ तेथें प्रकटे रोगाची परवडी । महाविघ्नांची पडे उडी । धांवती विकल्पाच्या कोडी । सिद्धीची रोकडी नागवण पावे ॥ ५५ ॥ इतुकीं अंगीं आदळतां जाण । साधक न सांडी जैं आंगवण । तैं सम होती प्राणापान । सत्य जाण उद्धवा ॥ ५६ ॥ प्राणापानांच्या मिळणी । शक्ति चेतवे कुंडलिनी । ते प्राणापानांतें घेऊनि । सुषुम्नास्थानीं प्रवेश ॥ ५७ ॥ ते आद्यशक्ति अचाट । चढे पश्चिमेचा महाघाट । तेथें षट्चक्रांचा कडकडाट । पूर्वींच सपाट पवनें केला ॥ ५८ ॥ कुंडलिनी चालतां वाटा । चुकल्या आधिव्याधींच्या लाटा । बुजाल्या विकल्पांच्या वाटा । महाविघ्नांच्या झटा बाधूं न शकती ॥ ५९ ॥ साधितां उल्हाटशक्तीचे उलट । उघडे ब्रह्मरंध्रीचें कपाट । तंव लोटले सहस्रदळाचे पाट । अतिचोखट चंद्रामृत ॥ २६० ॥ तें प्राशूनि कुंडलिनी बाळा ।

---

४८ एकदां ब्रह्मसंपन्न झालें कीं, मन आत्मस्वरूपांतच लीन होतें. हाहि एक उपाय आहे. तो सुद्धां जर साध्यक रितां येत नसला तर आणखी एक उपाय ऐक. २४९.

यमादिभिः योगपथैः—यमादि योगमार्गांनीं, **आन्वीक्षिक्या च विद्यया**—पदार्थद्वयशोधनरूप वेदान्तविद्येनें, **ममअर्चोपासनाभिः वा**—किंवा अगदीं स्वतंत्र अशा माझ्या अर्चन-ध्यानादिकांनीं, **मनः योगं स्मरेत्**—मनानें परमात्म्याचें चिंतन करावें, **न अन्यैः**—याहून दुसऱ्या कोणत्याहि उपायानें परमार्थप्राप्तीची इच्छा करूं नये. (याहून दुसरें कांहींहि करूं नये, असा याचा भावार्थ.) २४.

सगळ्या सुखोपभोगांचा त्याग करून, यम-नियमांसह आसन घालून, मुद्रा लावून, योगमार्ग कसा साधावा, तें सविस्तर ऐक. २५० अपानवायु वर तोंड करून वाढूं लागतो आणि स्वाधिष्ठानापर्यंत चढून जातो, पण प्राणायामानें अडून तो नाभिस्थानाकडे पुनः परततो; ५१ प्राणापान समान झाले म्हणजे वायु आपण होऊनच पिंड आणि ब्रह्माण्ड हीं दोन्हीं शुद्ध करून शरीरांतील मळ धुवून टाकितो, ५२ कफ आणि पित्त यांना खाऊन टाकितो व मग नाड्या शुद्ध करितो. सांचलेले जुने मळ सत्वर धुवून टाकितो. ५३ वायूचें सामर्थ्य किती विलक्षण प्रबल आहे, पहा. तो पिंड-ब्रह्माण्डांतील मलिनता धुवून टाकून सर्व निर्मल करितो. जेव्हां इतका पवित्रपणा केवल एका योगानें येतो. ५४ त्या वेळीं रोगाच्या झुंडी येतात. महाविघ्नांच्या उड्या पडतात. असंख्य विकल्प धांवत येतात व सिद्धीला नागवितात. ५५ इतकीं सगळीं संकटें जरी अंगावर येऊन कोसळलीं तरी साधक जेव्हां धीर सोडीत नाहीं, तेव्हां प्राणापान समान होतात. उद्धवा ! हें अगदीं सत्य जाण. ५६ प्राणापान समान झाले कीं, कुंडलिनी नांवाची शक्ति जागी होते व ती प्राणापानास घेऊन सुषुम्ना नाडींत प्रवेश करिते. ५७ ती आद्यशक्ति मोठी प्रबल आहे. ती पश्चिमेचा अवघड घाट चढूं लागते. त्यावेळीं वायु अगोदरच तेथील षट्चक्रांचा कडकडाट मोडून तिचा मार्ग सपाट करून ठेवितो. ५८ त्या वाटेनें कुंडलिनी जात असतां आधि-व्याधींच्या उसळ्या बंद होतात. विकल्पाच्या वाटा बुजून जातात आणि महाविघ्नांची झड बाधत नाहीं. ५९ उल्हास शक्तीचें उलंघन केलें कीं, ब्रह्मरंध्राचें दार उघडतें आणि सहस्रदल कमलांतून चंद्रामृताचे मधुर झरे वाहूं लागतात. याचें सविस्तर वर्णन चौदाव्या व पंधराव्या अध्यायांत केलें आहे. २६० त्या प्राशन

संतोषें सांडी गरळा । तें शरीरीं वोतली कळा । तेणें पालटला देहभाव ।। ६१ ।। शरीराकारें वोतिली कळा । तेणें देहो दिसे अतिसोज्ज्वळा । ना तो ब्रह्मरसाचा पुतळा । कीं उमलला कळा शांतिसुखाचा ।। ६२ ।। जीवाचें जीवन मुसावलें । कीं ब्रह्मविद्येसी फळ आलें । ना तें चैतन्या कोंब निघालें । तैसे शोभले अवयव ।। ६३ ।। त्या देहाचेनि लाघवें । जगाच्या डोळां सामावे । जीवामाजीं वावरों पावे । निजस्वभावें सबाह्य ।। ६४ ।। तो पवनाची करोनि पायरी । सुखें चाले गगनावरी । या नांव परम खेचरी । सिद्धेश्वरीं बोलिजे ।। ६५ ।। त्याचिया अंगींचिया दीप्ती । खद्योतप्राय गभस्ती । त्याचें चरणामृत वांछिती । अमृतपानी इंद्रचंद्र ।। ६६ ।। क्रमूनि औटपीठ गोल्हाट । भ्रमरगुंफादि शेवट । भेदूनि सोहंहंसाचें पीठ । परमात्मा प्रकट होऊनि ठाके ।। ६७ ।। हा योगाभ्यासें योग गहन । अचवटें कोणा साधे जाण । हा मार्ग गा अतिकठिण । स्वयें श्रीकृष्ण बोलिला ।। ६८ ।। हेंचि मानतें श्रीकृष्णनाथा । तरी आन साधन न सांगता । हा मूळश्लोकार्थ पाहतां । कळेल तत्त्वतां साधूंसी ।। ६९ ।। हा ऐकतां अतिगोड वाटे । परी करितां काळीज फाटे । तरी न साधेचि महाहटें । येथ ठकले लाठे सुरनर ।। २७० ।। असो हें अत्यंत कठिण । तुज मी सांगेन गा आन । आन्वीक्षिकी विद्या जाण । त्वंपदशोधनविवेकू ।। ७१ ।। तत्पदाहूनि वेगळा । पांचभौतिक त्वंपदाचा गोळा । चुकोनि व्यापका सकळा । कोठें निपजला एकादेशीं ।। ७२ ।। अनादि मायाप्रवाहयोगें । तन्मात्राविषयसंगें । मनाचेनि संकल्पपांगें । वेगळें सवेगें मानलें ।। ७३ ।। मनें मानिला जो भेदू । त्यासी करावा अभेदबोधू । येंचि अर्थीं स्वयें गोविंदू । विवेक विशदू दाखवी ।। ७४ ।। पांचभौतिक शरीर खरें । तेथ पृथ्वी प्रत्यक्ष जळीं विरे । पृथ्वीचा गंध जळीं भरे । तैं पृथ्वी सरे निःशेष ।। ७५ ।। त्या जळाचा जळरसू । शोधूनि

करून कुंडलिनी बालिका संतुष्ट होऊन गरळ टाकिते. त्यामुळें शरीराची कांति चढते. देहभाव पालटतो. ६१ शरीराच्या आकारानें तेजच ओतल्याप्रमाणें त्याचा देह अति सोज्ज्वल दिसूं लागतो. जणुंकाय तो ब्रह्मरसाचा पुतळाच किंवा शांतिसुखाची उमललेली कळीच भासूं लागते. ६२ जीवाचें मुसमुसलेलें जीवनच किंवा ब्रह्मविद्येचें फल किंवा चैतन्याचा अंकुरच असे त्याचे अवयव शोभतात. ६३ त्याच्या देहाच्या लाघवामुळें तो पहाणारांच्या नजरेंत लगेच ठसतो. स्वस्वभावाप्रमाणें तो जीवामध्यें सबाह्य वावरूं लागतो. ६४ तो वायूची पायरी करून आकाशांतून चालतो. याला श्रेष्ठ खेचरीसिद्धि असें म्हटलें आहे. (अध्याय १५ पहा.) त्याच्या देहकांतीपुढें सूर्यहि काजव्यासारखा दिसूं लागतो. नित्य अमृताचें सेवन करणारे इंद्र-चंद्रहि त्याच्या चरणामृताची इच्छा करितात. ६६ त्या औटपीठ गोल्हाटाचें उल्लंघन करून भ्रमरगुंफादिकांच्या शेवटाला पोंचून सोहंहंसाचें पीठ भेदून परमात्मा प्रकट होतो. ६७ असा हा योगाभ्यासानें साध्य होणारा योग अतिशय अवघड आहे. क्वचित् एखाद्यालाच तो साधतो. हा मार्ग अति कठिण आहे, असें स्वतः श्रीकृष्णानें सांगितलें. ६८ हें साधन जर श्रीकृष्णनाथाला मान्य असतें, तर त्यानें दुसरीं साधनें सांगितलींच नसतीं. हें मूळ श्लोकार्थावरूनच साधूंच्या लक्षांत येईल. ६९ हा योग ऐकण्यास मोठा गोड वाटतो, पण तो आचरिते वेळीं मात्र छाती फाटून जाते. तो अति क्लिष्ट असल्यामुळें साध्य होत नाहीं. मोठे बलिष्ठ देव व मानव हा योग साध्य करण्यांत थकून गेले आहेत. २७० हें कठिण साधन राहो, आतां मी तुला दुसरा एक उपाय सांगतों, ऐक. ‘ तत् ’ व ‘ त्वं ’ या दोन पदांचें यथार्थ विवेचन करून देणारी जी अध्यात्मविद्या तिला ‘ अन्वीक्षिकी विद्या ’ म्हणतात. ७१ पंचभूतात्मक ‘त्वं-’ पदाचा गोळा ‘ तत्- ’ पदाहून भिन्न आहे. तो सर्वव्यापकाला चुकवून कोठें एक देशांत निपजला आहे. ७२ अनादि मायेच्या प्रवाहामुळें शब्द-स्पर्शादि विषयांच्या संगतीनें मनाच्या संकल्पानें त्याच्या अंगीं भिन्नत्व बाणलें आहे. ७३ मनानें जो भेद मानिला असेल, त्यालाच अभेदाचा उपदेश करावा. याचाच स्पष्ट विचार श्रीकृष्ण सांगत आहे. ७४ शरीर जरी पंचभूतात्मक आहे तरी पृथ्वी जलामध्यें विरून जात असलेली प्रत्यक्ष दिसते. पृथ्वीचा स्वाभाविक गुण जो सुगंध तो जलांत भरून रहातो व पृथ्वी निःशेष नाहींशी होते. ७५ त्या जलांतील रसाला जेव्हां अग्नि शोषून घेतो, तेव्हां जलहि तेजानें निःशेष आटून

जैं घे हुताशू । तैं जळाचा होय न्हासू । निजनिःशेषू तेजत्वें ।। ७६ ।। त्या तेजाचें कारणरूप । गिळी वायूचा पूर्ण प्रताप । तेव्हां तेजाचें मावळे स्वरूप । वायूची झडप लागतां ।। ७७ ।। त्या वायूचा स्पर्शगुण । नेतां गगनें हिरून । तेव्हां वायूचें नुरे भान । राहे मुसावोन गगनाचि ।। ७८ ।। केवळ गगना नुरे उरी । तें गुणकार्यें रिघे अहंकारीं । अहंकारू रिघे मायेमाझारीं । माया परमेश्वरीं मिथ्या होय ।। ७९ ।। रात्रि आपुलिया प्रौढीं । आंधारातें वाढवी वाढी । तेथ नक्षत्रें खद्योतकोडी । मिरवती गाढीं निजतेजें ।। २८० ।। ते रात्री येतां सूर्या पुढें । स्वकार्येंसीं सगळी उडे । पाहों जातां मागेंपुढें । कोणीकडे असेना ।। ८१ ।। तेवीं परमेश्वरीं माया । कार्यकरणेंसीं गेली वायां । मिथ्यात्वेंचि न ये आया । नुरेचि दिसावया मागमोसू ।। ८२ ।। मायाप्रतिबिंबित चैतन्या । आणी जीव या अभिधाना । ते माया गेलिया जाणा । जीवपणा न्हासू ।। ८३ ।। बुडालें जीवशिवांचें भान । उडालें मनाचें मनपण । कोंदलें चैतन्य घन । परम समाधान साधकां ।। ८४ ।। करितां त्वंपदाचें शोधन । होय तत्पदीं समाधान । हे आन्वीक्षिकी विद्या जाण । विवेकसंपन्न पावती ।।८५।। न करितां योगसाधन । न लगे त्वंपदाचें शोधन । याहोनि सुलभ साधन । तुज मी आन सांगेन ।। ८६ ।। जेथ कष्ट करितां तरी थोडे । परी योगाचें सकळ फळ जोडे । त्वंपदशोधन त्यापुढें । होय बापुडें लाजोनि ।। ८७ ।। ते माझी गा निजभक्ती । माझ्या रामकृष्णादि ज्या मूर्ती । पूजितां त्या अतिप्रीतीं । मी श्रीपति संतोषें ।। ८८ ।। तेथें माझें श्रवण कीर्तन । माझें नाम माझें स्मरण । माझें ध्यान माझें भजन । माझें चिंतन सर्वदा ।। ८९ ।। हृदयीं माझें सदा ध्यान । मुखीं माझें नाम माझें स्तवन । श्रवणीं माझी कथा माझें कीर्तन । करी माझें पूजन सर्वदा ।। २९० ।। चरणीं प्रदक्षिणा यात्रागमन । अष्टांगीं सर्वदा माझें नमन । ऐसें अनन्य माझें भजन । विनटलेपण मद्भक्तीं ।। ९१ ।। ऐसे विनटले जे माझे भजनीं । त्यांसी मी विकलों चक्रपाणी । त्यावेगळें पढियंतें

जातें. ७६ त्या तेजाचा स्वाभाविक गुण असें जें रूप त्याला वायूचा पूर्ण प्रभाव गिळून टाकितो. अशी वायूची झडप पडतांच तेजाचें प्रखर स्वरूप मावळून जातें. ७७ त्या वायूचा स्वाभाविक गुण जो स्पर्श त्याला आकाशानें हिरावून घेतांच वायूचें भान नाहींसें होतें व तो आकाशांतच लीन होतो. ७८ एकट्या आकाशाला कांहीं स्वरूपच नसतें. म्हणून तें गुणकार्यानें अहंकारांत प्रवेश करितें. तो अहंकार मायेंत शिरतो आणि ती माया परमेश्वरांत लीन झाली कीं, मिथ्या ठरते. ७९ रात्र आपल्याच प्रौढीनें गाढ अंधकार पसरीत असते व नक्षत्रें आणि असंख्य काजवे आपल्या प्रकाशानें मिरवीत असतात. २८० परंतु सूर्योदय होतांच रात्र, नक्षत्रें व काजवे हीं सगळीं आपापल्या कार्यासह नाहींशीं होतात. चोहों बाजूला जरी शोधलीं तरी तीं जशीं सांपडत नाहींत, ८१ त्याप्रमाणें परमेश्वरांत आपल्या कार्य-कारणासह ही माया लोपून जाते. ती मिथ्या असल्यामुळें तिच्या स्वरूपाचा कांहीं पत्ता लागत नाहीं. ८२ मायेमध्यें प्रतिबिंबित झालेल्या चैतन्याला 'जीव' हें नांव प्राप्त होतें. ती मायाच मुळीं नाहींशी झाली कीं, जीवपणा उडून जातो. ८३ जीवशिवांचें भान रहात नाहीं, मनाचा मनपणा जातो, सर्व चैतन्यघन भरून रहातें व साधकाला परम समाधान प्राप्त होतें. ८४ अशाप्रकारें 'त्वं-' पदाचें शोधन केलें असतां त्याचें 'तत्-' पदांत ऐक्य होतें. हिलाच अन्वीक्षिकी विद्या म्हणतात. ही विवेकी लोकांनाच साध्य होते. ८५ योगसाधनावांचून आणि 'त्वं' पदाचें शोधन केल्याशिवाय साध्य होणारें याहूनहि आणखी एक सोपें साधन मी तुला सांगतों. ८६ ज्यांत कष्ट फार थोडे, पण योगाचें फल मात्र मिळतें, त्याच्यापुढें 'त्वं-' पदाचें शोधन तर बापडें लाजून दीन होऊन बसतें. ८७ असें साधन म्हणजे माझी श्रेष्ठ भक्ति. माझ्या राम-कृष्णांच्या मूर्तींची परम प्रेमानें पूजा केली असतां मज श्रीपतीला अतिशय संतोष होतो. ८८ माझें श्रवण, कीर्तन, माझें नाम व स्मरण, माझें ध्यान, भजन व चिंतन सतत करीत असावें. ८९ हृदयांत निरंतर माझें ध्यान करावें; मुखानें सर्वदा माझें नांव घेऊन स्तवन करावें; कानांनीं माझीं कथा-कीर्तनें ऐकत असावीं; माझें सर्वदा पूजन करावें. २९० पायांनीं प्रदक्षिणा घालाव्या. तीर्थयात्रा कराव्या. दोन हात, दोन पाय, दोन गुडघे, हृदय व मस्तक मिळून आठ अंगांनीं मला नमन करावें. अशाप्रकारें एकनिष्ठेनें माझें भजन करून माझ्या भक्तींत रंगून जावें. ९१ असे जे भक्त माझ्या भजनांत रंगून जातात, त्यांस मी चक्रपाणि स्वतःला

कोणी । आन त्रिभुवनीं मज नाहीं ॥ ९२ ॥ यापरी करितां माझें भजन । न लगे योगादिकांचें स्मरण । मी भक्तिवेगळा श्रीकृष्ण । नातुडें जाण उद्धवा ॥ ९३ ॥ अवचटें दैवगतीं येथ । योगियासी जैं घडे दुरित । त्यासी न लगे कर्मप्रायश्चित्त । तेंचि सांगत श्रीकृष्ण ॥ ९४ ॥

यदि कुर्यात् प्रमादेन योगी कर्म विगर्हितम् । योगेनैव दहेदंहो नान्यत्तत्र कदाचन ॥ २५ ॥

भक्तासी निंद्य कर्म न घडे । त्यासी मी राखता मागेंपुढें । हें आलें गा योग्याकडे । तेथही घडे प्रमादें ॥ ९५ ॥ प्रमादें घडलें जें पाप । त्याचा तीव्र अनुताप । जेवीं दावाग्नीं पोळल्या सर्प । तैसा सकंप पापासी ॥ ९६ ॥ गोमाशी लागतां सिंहासी । तो जेवीं झाडी सर्वांगासी । तेवीं योगी देखोनि पापासी । जो अहर्निशीं अनुतापी ॥ ९७ ॥ तेणें होऊनि सावचित्त । योगबळें निजयोगयुक्त । पाप निर्दाळावें समस्त । हेंचि प्रायश्चित्त योगियासी ॥ ९८ ॥ हे सांडोनियां योगस्थिती । जैं लावूं धांवे शेणमाती । तैं नागवला गा निश्चितीं । नव्हेचि निष्कृती पापाची ॥ ९९ ॥ हृदयीं नाहीं अनुतापवृत्ती । वरिवरी गा शास्त्रोक्ती । लावूं जातां शेणमाती । नव्हे निवृत्ति पापाची ॥ ३०० ॥ माझें क्षणार्ध अनुसंधान । कोटिकल्मषां करी दहन । तेथ इतरांचा केवा कोण । हें स्वयें श्रीकृष्ण बोलिला ॥ १ ॥ ज्याचें अधिकारी माझें ध्यान । तें सांडोनियां जाण । प्रायश्चित्त सांगतां आन । लागे दूषण सांगत्यासी ॥ २ ॥ यालागीं मुख्यत्वें जाण । येथ अधिकारचि प्रमाण । येचिविखींचें निरूपण । श्रीनारायण सांगत ॥ ३ ॥

विकूनच घेतों. सगळ्या त्रिभुवनांत मला त्यांच्यावांचून दुसरे कोणीहि अधिक आवडत नाहींत. ९२ अशाप्रकारें माझें भजन केलें असतां योगादिकांची आठवणहि करावी लागत नाहीं. उद्धवा! मी श्रीकृष्ण भक्तीवांचून केव्हांहि प्राप्त होत नाहीं. ९३ योग्याच्या हातून दैवगतीनें जर एखाद्यावेळीं कांहीं पातक घडलें, तर त्याला कर्मप्रायश्चित्त घ्यावें लागत नाहीं. तेंच श्रीकृष्ण सांगत आहे. २९४.

—अहोपण, पाप घडल्यास प्रायश्चित्त केलेंच पाहिजे! उत्तर—

योगी यदि प्रमादेन विगर्हितं कर्म कुर्यात्—योग्यानें जर प्रामादानें कांहीं निंद्य कर्म केलें तर त्यानें, **योगेन एव अंहः दहेत्**—ज्ञानाभ्यासानेंच त्या पापाचा नाश करावा. [येथील ज्ञानयोगशब्दानें भक्ताच्या नामसंकीर्तनादिकांचेंहि ग्रहण करावें.] **तत्र अन्यत् न कदाचन्**—त्यावेळीं कृच्छ्रादि दुसरें कांहींहि प्रायश्चित्त केव्हांहि करूं नये. २५.

माझ्या भक्ताच्या हातून केव्हांहि निंद्यकर्म घडत नाहीं; कारण मी त्याच्या मागें-पुढें राखण असतों. परंतु योग्याकडून मात्र चुकून एखादे वेळीं पाप घडतें ९५ आणि चुकीनें घडलेल्या त्या पातकाबद्दल त्याला अतिशय पश्चात्ताप होतो. वणव्यानें पोळलेला साप जसा वणवा पाहून भितो, तसा पातक पाहतांच योग्याचा थरकांप होतो. ९६ सिंहाच्या अंगावर गोमाशी बसली असतां, तो जसा आपलें सगळें अंग झाडतो, त्याप्रमाणें योगी पातक पहातांच रात्रंदिवस पश्चात्ताप करितो. ९७ अशावेळीं त्यानें चित्त सावध ठेवून, योगबळानें युक्त होऊन, सगळ्या पातकांचें क्षालन करावें. हेंच योग्याचें प्रायश्चित्त आहे. ९८ ही योगस्थिति सोडून जो प्रायश्चित्तासाठीं अंगाला शेण, माती लावावयास धांवतो, तो खात्रीनें बुडाला असें समजावें. कारण त्यानें पापाचा नाश केव्हांहि होत नाहीं. ९९ हृदयांत पश्चात्ताप नसतांना शास्त्रवचनावरून वर-वर शेण-माती लावूं गेल्यास पापाची निवृत्ति होत नाहीं. ३०० एक अर्धा क्षण जरी माझें चिंतन केलें तरी तें असंख्य पापांचें जाळून भस्म करितें. तेथें इतरांचा काय पाड! असें श्रीकृष्णानें स्वतः सांगितलें. १ माझें ध्यान, हाच ज्याचा अधिकार आहे, त्याला तें सोडून दुसरें प्रायश्चित सांगणारालाच उलट दोष लागतो. २ यास्तव येथें अधिकारच मुख्यत्वें करून प्रमाण आहे. याचेंच निरूपण आतां नारायण करीत आहे. ३०३.

स्वे स्वेऽधिकारे या निष्ठा स गुणः परिकीर्तितः । कर्मणां जात्यशुद्धानामनेन नियमः कृतः ।
गुणदोषविधानेन सङ्गानां त्याजनेच्छया ॥ २६ ॥

न प्रेरितां शास्त्रें श्रुती । विषयीं स्वाभाविक प्रवृत्ती । तिची करावया निवृत्ती । माझी वेदोक्ती प्रवर्तली ॥ ४ ॥ एकाएकीं विषयत्याजन । करावया अशक्त जाण । त्यासी वेद दावी दोषगुण । त्यागावया जाण विषयांसी ॥ ५ ॥ हे माता हे सहोदर । येथ करूं नये व्यभिचार । हे वेद न बोलतां अधिकार । तैं यथेष्टाचार विषयांचा ॥ ६ ॥ जेथवरी स्त्रीपुरुषव्यक्ती । तेथवरी कामासक्ती । मी नेमितों ना वेदोक्ती । तैं व्यभिचारप्राप्ती अनिवार ॥ ७ ॥ सकळ स्त्रिया सांडून । त्यजूनियां इतर वर्ण । सवर्ण स्त्री वरावी आपण । अष्टवर्षा जाण नेमस्त ॥ ८ ॥ तिचें वेदोक्त पाणिग्रहण । तेथ साक्षी अग्नि आणि ब्राह्मण । इतर स्त्रियांची वाहूनि आण । स्वदारागमन विध्युक्त ॥ ९ ॥ यापरी म्यां सकळ लोक । स्त्रीकामें अतिकामुक । स्वदारागमन देख । केलें एकमुख वेदोक्तीं ॥ ११० ॥ याचिपरी म्यां अन्नसंपर्क । वेदवादें नेमिले लोक । येरवीं वर्णसंकर देख । होता आवश्यक वेदेंवीण ॥ ११ ॥ तो चुकवावया वर्णसंकर । वर्णाश्रमांचा प्रकार । वेद बोलिला साचार । विषयसंचार त्यागावया ॥ १२ ॥ विषयांची जे प्रवृत्ती । तेचि अविद्याबाधा निश्चितीं । जे विषयांची अतिनिवृत्ती । ती नांव 'मुक्ति' उद्धवा ॥ १३ ॥ करावया विषयनिवृत्ती । वेदें द्योतिली कर्मप्रवृत्ती । वर्णाश्रमाचारस्थिति । विषयासक्तिच्छेदकू ॥ १४ ॥ नित्य नैमित्तिक कर्मतंत्र । नाना गुणदोषप्रकार । वेदें द्योतिले स्वाधिकार । विरक्त नर

—अहोपण नित्य-नैमित्तिक कर्म चित्तशोधक असल्यामुळें गुण आहे, व हिंसादि निषिद्ध कर्मे अशुद्धीचें कारण असल्यामुळें दोष आहे. कृच्छ्रादि प्रायश्चित्त त्या दोषाची निवृत्ति करणारें असल्यामुळें तोहि गुण आहे असें विधिप्रतिषेधांनीं सांगितलें आहे. तेव्हां प्रायश्चित्तावांचून केवल योगानें पापाचा दाह कसा होईल ! याचें उत्तर पुढील दीड श्लोकांनीं सांगतात—

स्वे स्वे अधिकारे या निष्ठा सः गुणः परिकीर्तितः—आपापल्या अधिकारामध्यें जी निष्ठा तोच गुण सांगितलेला आहे. **गुणदोषविधानेन अनेन जात्यशुद्धानां कर्मणां संगानां त्याजनेच्छया नियमः कृतः**—कारण विधि व प्रतिषेध यांच्या द्वारां केलेल्या गुण-दोषविधानानें उत्पत्तितःच—अशुद्ध असलेल्या कर्मांच्या स्वाभाविक आसक्तीचा त्याग करविण्याच्या इच्छेनें संकोच केला आहे. [याचा भावार्थ असा—पुरुषाची अशुद्धि प्रवृत्तीहून दुसरी कोणतीहि नाहीं, स्वाभाविक प्रवृत्तीनें त्याला मलिनत्व आलें आहे. पण तो एकाएकीं सर्व प्रवृत्तीपासून निवृत्त होऊं शकत नाहीं, म्हणून ' हें करूं नये व हेंच करावें. ' इत्यादि प्रकारें स्वाभाविक प्रवृत्तीचा संकोच करून त्यांच्या द्वारां निवृत्तीच केली जाते. वेद निवृत्तिपर कसा आहे, हें आम्ही पुढील अध्यायांत सांगूं. योग्याच्या स्वाभाविक प्रवृत्तीचा अभाव असल्यामुळें तो प्रायश्चित्ताचा विषय होऊं शकत नाहीं.] २६.

वेदानें किंवा शास्त्रानें प्रेरणा केल्यावांचूनच मनुष्याची विषयांकडे प्रवृत्ति होते, त्या विषयप्रवृत्तीपासून त्यास निवृत्त करण्यासाठीं माझी वेदाज्ञा प्रकट झाली आहे. ४ जे लोक एकदम विषयांचा त्याग करण्यास असमर्थ असतात त्यांनीं विषय टाकावे, म्हणून वेद त्यांना विषयांतील गुण-दोष दाखवितो. ५ 'ही माता, ही भगिनी, त्यांच्याशीं व्यभिचार करूं नये.' अशी जर स्पष्ट आज्ञा वेदानें केली नसती, तर लोक विषयासक्तीनें मन मानेल तसें वागले असते. कारण जोंवर स्त्री व पुरुष या व्यक्ति आहेत, तोंवर कामासक्ति असणारच. म्हणून मीं जर वेदाज्ञा नेमून दिली नसती, तर अनिवार व्यभिचार झाला असता. ७ सर्व स्त्रिया सोडून, इतर वर्ण वर्ज्य करून, आपल्याच वर्णाची, आठ वर्षांची वधू निवडून, ८ अग्नि व ब्राह्मण यांच्या साक्षीनें तिच्याशीं वेदोक्त विवाह करावा. इतर स्त्रियांविषयीं शपथ वाहून स्वस्त्रीबरोबर विधियुक्त व्यवहार करावा. ९ अशा प्रकारें स्त्रीलंपट व कामासक्त असलेल्या सर्व लोकांना मीं विवाहविधीनें बांधून वेदाज्ञेनें स्वस्त्रीगमन नेमून दिलें. ११० याचप्रमाणें मीं अन्नसंपर्काविषयीं वेदमुखानें नियम घालून दिला; नाहींतर वेदाज्ञेच्या अभावीं सर्वत्र वर्णसंकर झाला असता. ११ तो वर्णसंकर चुकविण्यासाठीं व विषय प्रवृत्ति टाळण्यासाठीं वेदानें वर्णाश्रमाचा प्रकार सांगितला. १२ उद्धवा ! विषयांची प्रवृत्ति हीच खरोखर अविद्येची बाधा होय आणि विषयांची निःशेष निवृत्ति म्हणजेच मुक्ती. १३ मनुष्यानें विषयांपासून निवृत्त व्हावें म्हणून वेदानें विषयासक्तीचा छेद करणारी वर्णाश्रमस्थिति व कर्मप्रवृत्ति सांगितली आहे. १४ मनुष्याने विरक्त व्हावें. म्हणून वेदानें नित्य-नैमित्तिक

व्हावया ॥ १५ ॥ स्वकर्में होय चित्तशुद्धी । तेणें वैराग्य उपजे त्रिशुद्धी । वैराग्य विषयावस्था छेदी । गुणकार्यउपाधी रजतम हे ॥ १६ ॥ तेव्हां उरे शुद्ध सत्वगुण । तेथें प्रकटे गुरुभजन । गुरुभजनास्तव जाण । ज्ञानविज्ञान घर रिघे ॥ १७ ॥ पूर्ण करितां भगवद्भक्ती । तैं गुरुभजनीं अधिकारप्राप्ती । सद्गुरुमहिमा सांगों किती । मी आज्ञावर्ती गुरूचा ॥ १८ ॥ गुरु ज्यावरी अनुग्रहो करी । त्यासी मी भगवंत उद्धरीं । आदरें वाऊनियां शिरीं । निजऐश्वर्यावरी बैसवीं ॥ १९ ॥ गुरु परमात्मा परेशू । ऐसा जयाचा विश्वासू । त्याचा अंकिला मी हृषीकेशू । जो जगदीशू जगाचा ॥ ३२० ॥ जेथ मी अंकित झालों आपण । तेथ समाधीसीं ज्ञानविज्ञान । वोळंगे गुरुभक्ताचें अंगण । तेथ केवा कोण सिद्धींचा ॥ २१ ॥ त्या गुरूचें करूनि हेळण । जो करी माझें भजन । तेणें विखेंसीं मिष्टान्न । मज भोजन घातलें ॥ २२ ॥ तोंडीं घांस डोइये टोला । ऐसा भजनार्थ तो झाला । तो जाण सर्वस्वें नागवला । वैरी आपला आपणचि ॥ २३ ॥ येथवरी गुरूचें महिमान । माझेनि वेदें द्योतिलें जाण । करूनि विषयनिर्दळण । स्वाधिकारें जन तरावया ॥ २४ ॥ यालागीं ज्यासी जो अधिकार । तो तेणें नुल्लंघावा अणुमात्र । हा वेदें केला निजनिर्धार । स्वकर्में नर तरावया ॥ २५ ॥ जरी म्हणशी कर्मचि पावन । हेंही सर्वथा न घडे जाण । स्वाधिकारेंवीण कर्माचरण । तें अतिदारुण बाधक ॥ २६ ॥ संन्यासी करी गृहस्थधर्म । तें त्यासां वोढवलें अकर्म । गृहस्थ करी करपात्रकर्म । तोचि अधर्म तयासी ॥ २७ ॥ हितासी ओखद घेतां जाण । त्याचें चुकलिया अनुपान । तेंचि अन्यथा होय आपण । पीडी दारुण मरणान्त ॥ २८ ॥ तैसें अनधिकारें करितां कर्म । तेंचि बाधक होय परम । हें वेदें जाणोनियां वर्म । स्वधर्म सुगम नेमिले ॥ २९ ॥ स्वाधिकारें स्वधर्मनिष्ठा । हाचि पुरुषाचा गुण मोटा । तेणें फिटे गुणकर्ममळकटा । प्रिय वैकुंठा तो होय ॥ ३३० ॥ वेदें बोलिला जो गुण । तो अंगीकारावा आपण ।

कर्मतंत्र व गुण-दोषांचे अनेक प्रकार अधिकारपरत्वें सांगून ठेविले आहेत. १५ स्वकर्मानें चित्तशुद्धि होते, चित्तशुद्धि झाली कीं, वैराग्य उपजतें आणि वैराग्य विषयासक्तीचा छेद करून गुणकार्याचें निमित्त जें रज-तम त्यांसहि नाहींसें करितें. १६ तेव्हां शुद्ध सत्त्वगुण बाकी उरतो व गुरुभजन प्रकट होतें. १७ गुरुभजनानें ज्ञान-विज्ञान घरीं चालून येतें. १७ पूर्ण भगवद्भक्ति केली असतां गुरुभजनाचा अधिकार प्राप्त होतो. सद्गुरूचा महिमा किती वर्णन करावा ! मीच स्वतः सद्गुरूच्या आज्ञेंत रहातों. १८ गुरु ज्याच्यावर अनुग्रह करितो, त्याचा मी भगवंत उद्धार करितों. त्याला मोठ्या आदरानें मस्तकावर वाहून माझ्या ऐश्वर्यावर बसवितों. १९ सद्गुरूच परमात्मा, परेश आहे, असा ज्याचा दृढ विश्वास असतो, त्याचा मी सगळ्या विश्वाचा चालक हृषीकेश अंकित होऊन रहातों. ३२० मीच स्वतः जेथें अंकित झालों तेथें समाधीसह ज्ञान-विज्ञान गुरुभक्ताच्या अगंणांत तिष्ठत उभीं राहिलीं तर त्यांत काय नवल ? त्यांच्यापुढें सिद्धींचा काय पाड ! २१ पण अशा गुरूचा अपमान करून जो माझें भजन करितो, तो जणुंकाय विषयुक्त मिष्टान्नाचेंच मला भोजन घालितो. २२ तोंडांत पेढा व डोकीवर टोला, अशा प्रकारच्या त्याच्या भजनानें तो आपणच आपला वैरी होऊन सर्वस्वीं नागवला जातो, हें खात्रीनें जाण. २३ लोकांनीं विषय टाकून आपल्या अधिकारबळानेंच तरून जावें, म्हणून येथपर्यंत माझ्या वेदानें गुरूचा महिमा सांगितला. २४ यास्तव ज्याचा जसा अधिकार असेल त्यानें त्याचें रेसभरहि उल्लंघन करूं नये. लोकांना तरून जाण्यासाठीं वेदानें हाच निश्चय सांगितला आहे. २५ 'तर मग कर्मच पावन करणारें आहे,' असें जर म्हणशील तर तें मात्र बरोबर नाहीं. अधिकारावांचून कर्माचरण करणें अत्यंत बाधक होय. २६ संन्याशानें गृहस्थाश्रम स्वीकारिल्यास तें जसें पातक आहे, तसेंच गृहस्थानें भिक्षाचरण करण्यांत अधर्म आहे. २७ रोग हटण्यासाठीं औषध घेत असतां त्याचें पथ्यादि अनुपान चुकल्यास त्याचा विपरीत परिणाम घडतो व मरणान्त दारुण क्लेश भोगावे लागतात. २८ त्याप्रमाणें अधिकारावांचून कर्म केल्यास त्यापासून अत्यंत व्यथा होते. वेदानें हें वर्म जाणूनच सोपे स्वधर्म नेमून दिले. २९ आपल्या अधिकारानुरूप स्वधर्मनिष्ठ असणें हाच मनुष्याचा मोठा गुण आहे. त्यामुळें गुणकर्माचें किल्मिष धुवून जाऊन तो वैकुंठाधीशाला प्रिय

वेदें ठेविलें ज्यासी दूषण । तें सर्वथा जाण त्यजावें ॥ ३१ ॥ हेंचि गुणदोषलक्षण । करितां वेदविवंचन । गुंतले गा अतिसज्ञान । माझे कृपेवीण वेदार्थ न कळे ॥ ३२ ॥ निषेधमुखें करितां त्यागू । वेद त्यागवी विषयसंगू । हें वर्म जाणोनि जो चांगू । तो होय निःसंगू महायोगी ॥ ३३ ॥ उद्धवा हें वेदतत्त्वसार । तुज म्यां सांगीतलें साचार । ज्यालागीं शिणताती सुरनर । ऋषीश्वर तपस्वी ॥ ३४ ॥ परी माझे कृपेवीण सर्वथा । हें न ये कोणाचिये हाता । तें तुज म्यां सांगीतलें आतां । तुझे हितार्था निजगुह्य ॥ ३५ ॥ मागें म्यां केलें निरूपण । गुणदोष देखणें तो दोष जाण । त्याचेंही विशद विवेचन । तुज मीं संपूर्ण सांगीतलें ॥ ३६ ॥ पराचा देखावा दोषगुण । हें नाहीं नाहीं गा माझें वेदवचन । दोष त्यजूनियां आपण । घ्यावा गुण हा वेदार्थ ॥ ३७ ॥ त्यजोनि पराचे दोषगुण । स्वयें गुण घ्यावा आपण । हेंही माझे कृपेवीण । नव्हे जाण उद्धवा ॥ ३८ ॥ न देखोनि पराचे दोषगुण । स्वयें होइजे ब्रह्म आपण । म्हणशी ऐशी कृपा परिपूर्ण । केवीं आपण लाहिजे ॥ ३९ ॥ तेचिविखींचें निरूपण । कृपेनें सांगताहे श्रीकृष्ण । माझे कृपेचें आयतन । उद्धवा जाण मद्भक्ती ॥ ३४० ॥

जातश्रद्धो मत्कथासु निर्विण्णः सर्वकर्मसु । वेद दुःखात्मकान् कामान् परित्यागेऽप्यनीश्वरः ॥ २७ ॥
ततो भजेत मां प्रीतः श्रद्धालुर्दृढनिश्चयः । जुषमाणश्च तान्कामान्दुःखोदर्कांश्च गर्हयन् ॥ २८ ॥

होतो. ३३० वेदानें जो विहित धर्म सांगितला आहे, त्याचा स्वीकार करावा व वेदानें ज्याचा निषेध केला आहे, तें सर्वथा टाकावें. ३१ वेदाचा विचार केला असतां हेंच गुण-दोषांचें लक्षण दिसून येतें. परंतु सज्ञान पंडितहि याविषयीं संशयांत पडतात. माझ्या कृपेवांचून वेदाचा अर्थ कळत नाहीं, ३२ निषेधमुखानें त्याग सांगून वेद विषयांचा त्याग करवितो. हें वर्म ज्यांस यथार्थ कळलें तोच सर्वसंगपरित्याग करून महायोगी होतो. ३३ उद्धवा ! ज्याच्यासाठीं देव-दानव, तपस्वी, श्रेष्ठ ऋषि प्रयत्न करीत असतात, तें वेदांचें तात्पर्य मीं तुला सांगितलें. ३४ परंतु माझ्या कृपेवांचून तें कोणाच्याहि हातीं लागत नाहीं. असें हें माझें गुह्यज्ञान तुझ्या हितासाठीं मीं तुला सांगितलें. ३५ 'गुण-दोष पहाणें' हाहि दोष आहे, असें मीं मागेंच तुला स्पष्टपणें सांगितलें आहे. ३७ 'दुसऱ्याचे गुण-दोष पहावेत' असें माझें वेदवचन मुळींच सांगत नाहीं. तर 'दोष टाकून गुणांचें ग्रहण करावें' असा माझ्या वेदाचा अर्थ आहे. ३७ उद्धवा ! दुसऱ्यांच्या गुण-दोषांचा विचार न करितां आपण स्वतः गुण स्वीकारावे. हेंहि माझ्या कृपेवांचून घडत नाहीं. ३८ 'दुसऱ्याचे गुण-दोष न पहातां आपण स्वतःच ब्रह्मस्वरूप होण्यास तुझी पूर्ण कृपा कशी संपादन करावी' ३९ असें विचारशील तर त्याचेंहि निरूपण करितों, ऐक. उद्धवा ! माझ्या कृपेचें आश्रयस्थान माझी भक्तीच आहे. ३४०.

—आतां जे भक्तीचे अधिकारी आहेत, त्यांच्यासाठीं पुढील नऊ श्लोकांनीं भक्तियोग सांगतात—

मत्कथासु जातश्रद्धः—माझ्या कथांविषयीं ज्याच्या मनांत श्रद्धा उत्पन्न झाली आहे, सर्वकर्मसु निर्विण्णः— त्यामुळेंच इतर सर्व कर्मांविषयीं जो उद्विग्न झाला आहे, पण त्यांच्या फळविषयीं मात्र विरक्त झाला नाहीं, कामान् दुःखात्मकान् वेद—कारण जो सर्वकाम दुःखात्मक आहेत, असें जाणतो, परित्यागे अपि अनीश्वरः—तथापि त्यांचा परित्याग करण्यास मात्र असमर्थ आहे. २७. श्रद्धालुः दृढनिश्चयः प्रीतः ततः मां भजेत—अशाप्रकारचा जो श्रद्धालु, भक्तीनेंच सर्व होईल, असा ज्याचा दृढनिश्चय असतो, त्यानें संतुष्ट चित्तानें त्यानंतर माझी भक्ति करावी. [विषयांचें सेवन करीत असतांहि त्यानें त्यांमध्यें प्रीति करूं नये, असें सांगतात.] तान् दुःखोदर्कान् कामान् गर्हयन् च—आणि त्या दुःखफल देणाऱ्या कामांचें सेवन करीत असतांनाहि त्यानें त्यांची निंदा करावी, त्यांवर प्रीति करूं नये, असा याचा भावार्थ. २८.

माझे कथेचेनि श्रवणें । उठी संसाराचें धरणें । ऐसा विश्वासू धरिला ज्याणें । जीवेंप्राणें निश्चितीं ॥ ४१ ॥ म्हणे अर्धोदकीं प्राणांतीं । जैं हरिकथा आठवे चित्तीं । तैं उठे जन्ममरणपंक्ती । येथवरी भक्ती मत्कथेची ॥ ४२ ॥ ऐशिया भावार्थाचे स्थिती । अनिवार उपजे विरक्ती । नावडे कर्माची प्रवृत्ती । विषयासक्ती नावडे ॥ ४३ ॥ नावडे इतर कथावदंती । नावडे लौकिकाची प्रीती । परी निःशेष त्यागाप्रती । सामर्थ्यशक्ती ज्या नाहीं ॥ ४४ ॥ तेणें अनन्यभावें जाण । अत्यादरें करावें भजन । येचिविखींचें निरूपण । स्वमुखें श्रीकृष्ण सांगत ॥ ४५ ॥

त्यागावया नाहीं सामर्थ्य शक्ती । त्यासी विषयभोग जेव्हां येती । ते भोगी ऐशिया रीतीं । जेवीं श्रृंगारिती सुळीं द्यावया ॥ ४६ ॥ त्यासी केळें साखर चोखटीं । दूधतूप लावितां ओंठीं । शूळ भरलिया भोगापाठीं । तो धाक पोटीं धुकधुकी ॥ ४७ ॥ तेवीं विषय भोगितां जाण । पुढें निरय अतिदारुण । मज कां विसरला नारायण । मधुसूदन माधव ॥ ४८ ॥ मी पडिलों विषयबंदिखानीं । वेगीं पावें गरुड वळंघोनी । कृपाळुवा चक्रपाणी । मजलागोनी सोडवीं ॥ ४९ ॥ विषयमहाग्रहाचे तोंडीं । मी सांपडलों बडिशापिंडीं । गजेंद्राचे परी तांतडीं । घालीं उडी मजलागीं ॥ ३५० ॥ धांव पाव गा गोविंदा । निवारीं माझी विषयबाधा । उपेक्षू नको मुकुंदा । घेऊनि गदा धांव वेगीं ॥ ५१ ॥ तूं अडलियाचा सहाकारी । भक्तकाजकैवारी । मज बुडतां विषयसागरीं । वेगें उद्धरीं गोविंदा ॥ ५२ ॥ मी पडिलों विषयसागरीं । बुडालों कामक्रोधलहरीं । क्रोधें विसंचिलों भारी । अभिमानसुसरीं गिळिलों ॥ ५३ ॥ तूं दीनदयाळ श्रीहरी । हें आपुलें बिरुद साच करीं । मज दीनातें उद्धरीं । निजबोधकरीं धरोनियां ॥ ५४ ॥ हे विषयबाधा अतिगहन । कां पां न पवे जनार्दन । येणें अट्टहासें जाण । करी स्मरण हरीचें ॥ ५५ ॥ न

माझी कथा श्रवण केली असतां संसाराचें धरणें उठून जातें, असा ज्यानें मनांत दृढनिश्चय केलेला असतो, ४१ पाण्यांत अर्धा बुडून प्राण जाण्याचा प्रसंग आला असतांहि जो मनांत हरिकथेची आठवण करितो, ज्याची माझ्या कथेवर इतकी प्रीति आहे त्याची जन्म-मरणपरंपरा तुटते. ४२ अशी श्रद्धा असल्यावर त्याला तीव्र वैराग्य येतें व कर्मांची प्रवृत्ति आणि विषयासक्ति आवडत नाहीं. ४३ त्याला प्रपंचातील भाकडकथा आवडत नाहींत. त्याला लौकिकाची प्रीति नसते; परंतु ज्याच्या अंगीं सर्वथा त्याग करण्याचें सामर्थ्य नसतें, ४४ त्यानें अनन्यभावानें अत्यंत आदरपूर्वक माझें भजन करावें. आतां याचेंच निरूपण श्रीकृष्ण स्वतःच्या मुखानें करीत आहे. ३४५.

ज्याच्या अंगीं त्यागाचें सामर्थ्य नसतें, तो विषयोपभोगाच्या प्रसंगीं सुळावर चढविण्यासाठीं श्रृंगारलेल्या माणसा-सारखा वागतो. ४६ सुळावर चढविणाराला रुचकर केळीं व साखर आणून दिलीं, दुधा-तुपाच्या वाट्या त्याच्या ओंठाला लाविल्या, तरी त्याला खाण्याच्या पाठोपाठ सुळाचा धाक असल्यामुळें त्याचा जीव जसा खालीवर होत असतो, ४७ त्याप्रमाणें तो भक्त विषय भोगिते वेळीं पुढें येणारा भयंकर नरक पहात असतो. तो म्हणतो कीं, नारायण या वेळीं मला कसा विसरला ! हे मधुसूदना ! माधवा ! ४८ मी विषयरूपी कैदेंत पडलों आहें. गरुडावर बसून सत्वर ये. हे कृपाळु श्रीकृष्णा मला यांतून सोडीव. ४९ विषयरूपी बलाढ्य सुसरीच्या तोंडांत मी मांसाच्या गोळ्याप्रमाणें सांपडलों आहें. तरी गजेंद्राला जसें तूं नक्राच्या तोंडांतून सोडविलेंस, तशी आतां माझ्यासाठीं सत्वर उडी घाल. ३५० हे गोविंदा ! बाबा, धांव, पाव. माझ्या या विषयबाधेचें निवारण कर. हे मुकुंदा ! माझी उपेक्षा करूं नकोस. गदा घेऊन धांवत ये. ५१ संकटांत पडलेल्या जीवांचा तूं साह्यकर्ता आहेस. तूं भक्तांच्या कार्यासाठीं त्यांचा कैवारी आहेस. तरी विषयसमुद्रांत बुडणाऱ्या माझा सत्वर उद्धार कर. ५२ मी विषयरूपी समुद्रांत बुडालों आहें, काम-क्रोधांच्या लाटांनीं गुदमरून गेलों आहें, क्रोधानें मला अतिशय नाडलें आहे व अभिमानरूपी मगरानें मला ग्रासिलें आहे. ५३ हे श्रीहरे ! तूं दीनदयाळ आहेस. हें आपलें ब्रीद राख. आपल्या आत्मज्ञानरूपी हातानें धरून मज दीनाचा उद्धार कर. ५४ ही विषयांची बाधा मोठी दारुण आहे. हे जनार्दना ! कां बाबा, पावत नाहींस. असा आक्रोश करून तो हरीचें स्मरण करीत असतो. ५५ विषयांची मगरमिठी सुटत नाहीं. मी कामाच्या आक्राळविक्राळ दाढेंत सांपडलों

सुटे विषयवज्रमिठी । पडिलों कामदंष्ट्राचिये पोटीं । कांहीं केलिया न सुटे मिठी । आतां जगजेठी धांव वेगीं ॥ ५६ ॥ ऐसा निजभक्तांचा धांवा । क्षणही न साहवे उद्धवा । माझी कृपा होय तेव्हां । पूर्ण स्वभावा अनुतापें ॥ ५७ ॥ उद्धवा जेथ अनुताप नाहीं । तेथ माझी कृपा नव्हे कांहीं । कृपेचें वर्म हेंच पाहीं । जें अनुताप देहीं अनिवार ॥ ५८ ॥ माझे कृपेवीण निश्चितीं । कदा नुपजे माझी भक्ती । माझी झालिया कृपाप्राप्ती । अनन्यभक्ती तो करी ॥ ५९ ॥ माझें कृपेचें लक्षण । प्राप्त विषय भोगितां जाण । न तुटे माझें अनन्य भजन । पूर्ण कृपा जाण या नांव ॥ ३६० ॥ मग चढत्या वाढत्या प्रीतीं । नीच नवी करी भक्ती । देह गेह स्त्री पुत्र संपत्ती । वेंची माझे प्रीतीं धनधान्य ॥ ६१ ॥ माझे भक्तीलागीं आपण । सर्वस्व वेंची हें नवल कोण । स्वयें वेंचितां जीवप्राण । ऐसें अनन्यभजन सर्वदा ॥ ६२ ॥ माझ्या भजनाची अतिप्रीती । स्मरण विसर न सांडी अहोरातीं । माझा विसर न पडे चित्तीं । त्याची फळप्राप्ती हरि सांगे ॥ ६३ ॥

प्रोक्तेन भक्तियोगेन भजतो माऽसकृन्मुनेः । कामा हृदय्या नश्यन्ति सर्वे मयि हृदि स्थिते ॥ २९ ॥

माझी जे कां निजभक्ती । मागां सांगीतली तुजप्रती । त्या हातवटिया मी श्रीपती । यजिलों अतिप्रीतीं वारंवार ॥ ६४ ॥ पळपळ क्षणक्षण । माझें न विसरती स्मरण । करिती अनन्य भजन । मदर्पण ते मीचि ॥ ६५ ॥ दिवसदिवसां चढोवढी । अनिवार प्रीती वाढे गाढी । लागतां नीच नवी गोडी । भजे आवडीं पुनः पुनः ॥ ६६ ॥ केलीचि भक्ती करितां । उबगू न ये सर्वथा । अधिक हर्ष वाटे चित्ता । उल्हासता मद्भजनीं ॥ ६७ ॥ मज आकळूनि आपले मनीं । मनींहोनि प्रीति भजनीं । तेथ सकळ काम

आहे, कांहीं केल्या त्यांची मिठी सुटत नाहीं. तर आतां हे जगजेठी लवकर धांव. ५६ उद्धवा ! माझा भक्त असा धांवा करूं लागला कीं, मला तें क्षणभरहि सहन होत नाहीं. स्वभावतःच जेव्हां त्याला असा पश्चात्ताप होतो तेव्हां त्याच्यावर माझी कृपा होते. ५७ उद्धवा ! जेथें पश्चात्ताप नाहीं, तेथें माझी कृपाहि नाहीं; अनिवार पश्चात्ताप होणें हेंच माझ्या कृपेचें लक्षण आहे. ५८ माझ्या कृपेवांचून माझी भक्तीहि कदापि उत्पन्न होत नाहीं. जेव्हां माझी कृपा होते, तेव्हांच मनुष्य माझी अनन्यभक्ति करूं लागतो. ५९ प्राप्तविषयोपभोगांच्या वेळींहि ज्याच्या अनन्यभजनांत खंड पडत नाहीं, त्यालाच माझी पूर्ण कृपा म्हणतात. माझ्या कृपेचें हेंच मुख्य लक्षण आहे. ३६० मग तो वाढत्या प्रेमानें माझ्यावर नित्य नवी भक्ति करूं लागतो. माझ्या भक्तीसाठीं तो घर-दार, स्त्री-पुत्र, धन-धान्य, संपत्ति व प्रसंगीं स्वतःचा देहहि खर्चीं घालितो. ६१ माझ्या भक्तीसाठीं जो स्वतःचा जीव-प्राण वेंचण्यासहि कचरत नाहीं, त्यानें इतर सर्वस्व खर्च केल्यास त्यांत आश्चर्य कसलें ! असें त्याचें सतत अनन्यभजन चाललेलें असतें. ६२ माझ्या भजनावरील अत्यंत प्रेमामुळें तो रात्रंदिवस माझें स्मरण करीत असतो. त्याच्या चित्ताला माझा विसर पडत नाहीं. अशा भक्तीची फलप्राप्ति आतां श्रीहरि सांगत आहे. ३६३.

—आतां भजन कसें करावें व त्याच्या योगानें काय होतें, तें सांगतात—

मुने—हे भक्तिवान् उद्धवा ! प्रोक्तेन भक्तियोगेन मा असकृत् भजतः हृदि मयि स्थिते हृदय्याः सर्वे कामाः नश्यन्ति—वर सांगितलेल्या भक्तियोगानें माझें निरंतर भजन करणाऱ्या भक्ताच्या हृदयांत मी स्थित झालों असतां त्याच्या अंतःकरणांतील सर्व काम नाश पावतात. २९.

मीं मागें तुला माझी जी श्रेष्ठ भक्ति सांगितली त्याच पद्धतीनें माझे भक्त वाढत्या प्रीतीनें पुनःपुनः माझें पूजन करीत असतात. ६४ ते प्रत्येक क्षणाला व प्रत्येक पळाला न विसरतां माझें स्मरण करितात व अनन्यभक्तीनें स्वतःला मदर्पण करितात. प्रत्येक दिवशीं चढाओढीनें त्यांचें प्रेम अनिवार वाढतें व नित्य नव्या आवडीनें वारंवार माझें भजन करितात. ६६ वरचेवर तीच भक्ति करण्याचा त्यांना कंटाळा येत नाहीं. उलट अधिकच हर्ष वाढून त्यांना माझ्या भजनाचा उल्हास वाटतो. ६७ मला आपल्या हृदयांत सांठवून ठेवून माझ्या भजनावर मनःपूर्वक प्रेम असलें म्हणजे

जाती नासोनी । जेवीं कां तरणीं खद्योत ॥ ६८ ॥ जेवीं कां केसरि देखोनी । मदगजां होय भंगणी । तेवीं काम जाती हृदयींहूनि । मी चक्रपाणी प्रकटल्या ॥ ६९ ॥ मी प्रकटलों ऐसें म्हणतां । लाज लागेल या वचनार्था । मजवीण ठावो नाहीं रिता । प्रकटलों आतां म्हणे कोण ॥ ३७० ॥ उद्धवा जाण तत्त्वतां । मी सदा हृदयीं वसता । भक्तांची भ्रांती जातां । मी स्वभावतां प्रकटचि ॥ ७१ ॥ भक्तीं करूनि माझी भक्ती । नाशिली गा निजभ्रांती । तेथ स्वयंभ मी श्रीपती । सहजास्थितीं प्रकटचि ॥ ७२ ॥ मी हृदयीं प्रकटल्यापुढें । भक्तांसी अलभ्य लाभ जोडे । फिटे संसाराचें सांकडें । ऐक पां फाडावोडें सांगेन ॥ ७३ ॥

भिद्यते हृदयग्रन्थिश्छिद्यन्ते सर्वसंशयाः । क्षीयन्ते चास्य कर्माणि मयि दृष्टेऽखिलात्मनि ॥ ३० ॥

उद्धवा मीं ज्यासी हृदयीं भेटें । तो मी हृदयामाजीं न संटें । सर्वात्मा सर्वरूपें प्रकटें । नव्हे धाकुटें स्वरूप माझें ॥ ७४ ॥ ऐसा मी प्रकटलियापाठीं । संसारूचि न पडे दिठीं । मावळे गुणेंसीं भेदत्रिपुटी । पळे उठाउठीं भवभय ॥ ७५ ॥ लागतां सूर्याचे किरण । घृताचें नासे कठिणपण । तेवीं मी प्रकटल्या नारायण । न फोडितां जाण लिंगदेह नाशे ॥ ७६ ॥ धुई दाटली चहूंकडे । ते चंडवातें तत्काळ उडे । तेवीं माझ्या प्रकाशापुढें । वासनेचें उपडे समूळ जाळ ॥ ७७ ॥ समूळ उपडितां वासनेसी । संशय निमे जीवभावेंसीं । तेथ क्षयो झाला कर्मासी । जेवीं रवीपाशीं आंधारें ॥ ७८ ॥ तेवीं गुण नासती स्वकार्येंसीं । अविद्या नासे अज्ञानेंसीं । जीव नासे शिवपणेंसीं । चिदचिद्ग्रंथींसीं अहंकारू ॥ ७९ ॥ तेथ सोहंहंसाची बोळवण । न करितांचि जाहली जाण । भेणें पळालें जन्ममरण । पडलें शून्य संसारा ॥ ३८० ॥ यापरी भक्तियोगें गहन । माझें करूनियां भजन । भक्त पावले समाधान । ऐसेनि

सूर्यापुढें काजवा जसा निस्तेज होतो, त्याप्रमाणें भक्ताच्या सर्व इच्छा नाहींशा होतात. ६८ सिंहाला पाहून मत्त हत्ती जसा सैरा-वैरां पळत सुटतो त्याप्रमाणें मी हृदयस्थ परमात्मा प्रकट होतांच, सगळ्या विषयेच्छा दूर पळून जातात. ६९ परंतु ' मी प्रकट झालों, ' हें बोलणेंहि विरुद्धच आहे. कारण मजवांचून कोठेंहि रिकामी जागाच नाहीं. असें असतां ' मी प्रकटलों ' असें कोण म्हणणार ! ३७० उद्धवा ! मी निरंतर हृदयांतच असतों. (परंतु भक्तांना भ्रांतीनें दिसत नाहीं) त्यांची भ्रांति नाहींशी होतांच मी स्वभावतः प्रकट झालेला दिसतों. ७१ भक्तांनीं माझी भक्ति करून भ्रांतीचा नाश केला कीं, मी स्वयंभु श्रीपति सहजच प्रकट आहें. ७२ मी हृदयांत प्रकट होतांच भक्तांना अलभ्य लाभ होतो. संसाराचें संकट दूर होतें, मी तेंच आतां सविस्तर सांगतों, ऐक. ३७३.

मयि अखिलात्मनि दृष्टे सति–मज सर्वात्म्याचें साक्षात् दर्शन झालें असतां, **हृदयग्रन्थिः भिद्यते**–हृदय हीच ग्रंथि म्ह० अहंकार, त्याचा भेद होतो म्ह० अहंकार निवृत्त होतो. **सर्वसंशयाः छिद्यन्ते**–अहंकारपूर्वक उद्भवणारे जे असंभावनादि संशय ते निवृत्त होतात, **अस्य च कर्माणि क्षीयन्ते**–आणि संसाराला कारण होणारीं याचीं प्रारब्धेतर कर्में क्षय पावतात. ३०.

उद्धवा ! मी ज्याच्या हृदयांत व्यक्त होतों, त्याच्या हृदयांत मावत नाहीं. मी सर्वात्मा सर्वांच्या रूपानें प्रकट होतों. माझें रूप कांहीं लहान-सहान नाहीं. ७४ असा मी व्यक्त झाल्यानंतर प्रपंच दृष्टीस पडत नाहीं. भेद-त्रिपुटी गुणांसह मावळून जाते व संसाररूपी भय तत्काल पळत सुटतें. ७५ सूर्याचे किरण लागतांच तुपाचा कठिणपणा जसा नाहींसा होतो, तसा मी नारायण प्रकट होतांच लिंगदेहाचा न फोडितां नाश होतो. ७६ चोहों बाजूला पसरलेली धूळ जशी सोसाट्याच्या वाऱ्यानें उडून जाते, त्याप्रमाणें माझ्या प्रकाशापुढें वासनांचें सगळें जाळें मुळासह उपटून पडतें. ७७ वासनेला समूळ उपटून टाकितांच संशय जीवा-भावासह नाश पावतो. तेव्हां सूर्यापुढें जसा अंधकार नाहींसा होतो, तसा कर्मांचा क्षय होतो ७८ व आपल्या कार्यासह गुणांचा नाश होतो. अज्ञानासह अविद्येचा लय होतो. शिवपणासह जीव नाहींसा होतो व ज्ञान-अज्ञानाच्या ग्रंथीसह अहंकार नाश पावतो. ७९ तेव्हां ' सोहं-'हंसाची बोळवण न करितांच होते. जन्म-मरण भयानेंच पळून जातें. संसारावर पाणी पडतें. ३८० अशा गहन भक्तियोगानें माझें भजन करून, भक्त आत्मभजनानेंच समाधान पावले आहेत. ८१ याप्रमाणें

जाण निजभजनें ॥ ८१ ॥ एवं भक्ति ज्ञान कर्मयोग । या तिहीं योगांचा विभाग । तुज म्यां सांगीतला सांग । हें वर्म चांग मत्प्राप्ती ॥ ८२ ॥ येथ विशेषें माझी भक्ती । न पाहे आन सांगाती । नव्हे आणिकांची पंगिस्ती । साधी मत्प्राप्ती अंगोवांगीं ॥ ८३ ॥ न करितां माझें भजन । सर्वथा नुपजे माझें ज्ञान । कर्म न करितां मदर्पण । तेंचि जाण अकर्म ॥ ८४ ॥ यालागीं मुख्य जें निजज्ञान । तें अपेक्षी माझें भजन । तेथ कर्म बापुडें रंक जाण । भजनेंवीण सरेना ॥ ८५ ॥ एवं ज्ञानकर्में परमार्थीं । माझे भक्तीस्तव होती सरतीं । ते भक्तीची निजख्याती । ऐक तुजप्रती सांगेन ॥ ८६ ॥

तस्मान्मद्भक्तियुक्तस्य योगिनो वै मदात्मनः । न ज्ञानं न च वैराग्यं प्रायः श्रेयो भवेदिह ॥ ३१ ॥

करूं नेणे कर्माचरण । न साधितां वैराग्य ज्ञान । भावें करितां माझें भजन । माझ्या स्वरूपीं मन ठेवूनी ॥ ८७ ॥ तेथ ज्ञानकर्मादिकें जाण । मुख्य वैराग्यही आपण । मद्भक्तीसी येती लोटांगण । चरणां शरण पैं येती ॥ ८८ ॥ शरण येणें हे कायशी गोठी । केवळ जन्मती भक्तीच्या पोटीं । मग लडेवाळें घालूनि मिठी । स्वानंदाची गोमटी मागती गोडी ॥ ८९ ॥ एवं भक्ति आपुले अंकीं जाण । करी ज्ञानादिकांचें लालन । परमानंद पाजूनि पूर्ण । करी पालन निजांगें ॥ ३९० ॥ ते आतुडल्या माझी भक्ती । ज्ञानादिकें कामारी होती । तेचिविखींची उपपत्ती । स्वयें श्रीपती सांगत ॥ ९१ ॥

यत्कर्मभिर्यत्तपसा ज्ञानवैराग्यतश्च यत् । योगेन दानधर्मेण श्रेयोभिरितरैरपि ॥ ३२ ॥
सर्वं मद्भक्तियोगेन मद्भक्तो लभतेऽञ्जसा । स्वर्गापवर्गं मद्धाम कथंचिद्यदि वाञ्छति ॥ ३३ ॥

भक्ति, ज्ञान आणि कर्म या तीन्ही योगांतील हे भेद मीं तुला स्पष्ट करून सांगितले. माझ्या प्राप्तीचें हें खरें वर्म आहे. ८२ यांत विशेषेंकरून माझी भक्तीच श्रेष्ठ आहे. तिला दुसऱ्या कशाचीहि जोड नाहीं. दुसऱ्या कोणाची गरज लागत नाहीं. ती तत्काळ माझी प्राप्ति करून देते. ८३ माझें भजन केल्यावांचून माझें ज्ञान केव्हांहि प्राप्त होत नाहीं व कर्म मदर्पण जरी केलें तरी तें अकर्मच होतें. ८४ यास्तव मुख्य असलेलें जें आत्मज्ञान त्याला माझ्या भजनाची अपेक्षा असते. त्याच्यापुढें कर्म बिचारें कःपदार्थ. त्याला कोण विचारितो! माझ्या भजनावांचून गत्यंतरच नाहीं. ८५ सारांश परमार्थाचीं जेवढीं ज्ञानकर्में आहेत, तेवढीं माझ्या भक्तीनेंच सफल होतात. त्या भक्तीचें माहात्म्य तुला आतां सांगतों, ऐक. ३८६.

—याप्रमाणें व्यवस्थेनें अधिकारत्रय सांगितलें. त्यांतील भक्ति दुसऱ्या कोणाची अपेक्षा न करणारी आहे व इतर साधनें भक्तीची अपेक्षा करितात; म्हणून भक्तियोगच श्रेष्ठ आहे; असा तीन श्लोकांनीं उपसंहार करितात—

तस्मात् मद्भक्तियुक्तस्य मदात्मनः योगिनः वै इह प्रायः ज्ञानं न वैराग्यं च न श्रेयः भवेत्—असें असल्यामुळें माझ्या भक्तीनें युक्त असलेल्या व माझ्या ठिकाणींच ज्याचें चित्त आहे अशा योग्याचें येथें प्रायः ज्ञानहि श्रेयःसाधन नाहीं व वैराग्यहि श्रेयःसाधन होत नाहीं. ३१.

ज्याला कर्माचरण करावयाचें समजत नाहीं व ज्यानें वैराग्य-ज्ञान मिळविलेलें नाहीं, त्यानें माझ्या स्वरूपांत मन स्थिर करून भक्तीनें माझें भजन केलें असतां ८७ ज्ञान-कर्मादिकच नव्हे, तर स्वतः वैराग्यहि माझ्या भक्तीच्या पायांवर लोटांगणें घालीत शरण येतें. ८८ तीं तिला शरण येतात, इतकेंच नव्हे तर भक्तीच्या पोटीं जन्म घेतात व तीं लाडकीं लेकरें लडिवाळपणानें तिला मिठी मारून स्वानंदाचें मधुर चुंबन मागतात. ८९ याप्रमाणें भक्ति आपल्या मांडीवर ज्ञान-विज्ञान-वैराग्यदिकांना खेळविते आणि त्यांना पूर्ण परमानंद रस पाजून त्यांचें स्वतःपोषण करिते. ३९० अशी माझी भक्ति साध्य झाली कीं, ज्ञानदिक त्या भक्ताचे बंदे दास बनतात. त्याविषयींचेंच निरूपण श्रीकृष्ण आतां करीत आहेत. ३९१.

—त्याविषयीं हेतु—

यत् कर्मभिः—जें कर्मानें, **यत् तपसा**—जें तपानें, **यत् च ज्ञान-वैराग्यतः**—जें ज्ञान व वैराग्य यांनीं, **योगेन दानधर्मेण इतरैः अपि श्रेयोभिः**—जें योगानें, दान-धर्मानें व तीर्थयात्रादि इतरहि साधनांनीं चित्तशुद्ध्यादि प्राप्त व्हावयाचें, **तत् सर्वं**—तें सर्व, **मद्भक्तः मद्भक्तियोगेन अञ्जसा लभते**—माझ्या भक्ताला माझ्या भक्तियोगानें अनायासानें प्राप्त होतें. **यदि कथंचित् वाञ्छति तदा स्वर्गापवर्गं मद्धाम लभते**—माझ्या भक्ताला इच्छा नसते, हें तर सांगितलेंच आहे; तथापि त्याची जर इच्छा असेल तर स्वर्ग, मोक्ष किंवा माझें वैकुंठधाम त्याला प्राप्त होतेंच. ३२-३३.

जें पाविजे स्वधर्मकर्मादरें । जें पाविजे निर्बंध तपाचारें । जें सांख्यज्ञानविचारें । पाविजे निर्धारें जें वस्तु ॥ ९२ ॥ जे पाविजे विषयत्यागें जें पाविजे अष्टांगयोगें । वातांबुपर्णाशनभोगें । जें दानप्रसंगें पाविजे ॥ ९३ ॥ जें साधे वेदाध्ययनें । जें साधे सत्यवचनें । जें साधे अनेकीं साधनें । तें मद्भजनें पाविजे ॥ ९४ ॥ हें न साधितां साधन सांकडें । नुल्लंघितां गिरिकपाटकडे । हीं सकळ फळें येती दारापुढें । जैं माझी आतुडे निजभक्ती ॥ ९५ ॥ उद्धवा तूं म्हणसी जाण । ऐशी ते तुझी भक्ति कोण । ब्रह्मभावें जें गुरुभजन । ते भक्तीचा पूर्ण हा प्रतापू ॥ ९६ ॥ सद्गुरुभजनापरती । साधकांसी नाहीं प्राप्ती । मी भगवंत करीं गुरुभक्ती । इतरांचा किती पवाडू ॥ ९७ ॥ मीही सद्गुरूचेनि धर्मे । पावलों एवढिये महिमे । त्या सद्गुरूचे गरिमे । कोणे उपमे उपमावें ॥ ९८ ॥ जे गुरुब्रह्म अभेदभक्त । अवचटें अणुमात्र वांछित । तयां वैकुंठादि समस्त । मी त्यांसी देत स्वर्गापवर्ग ॥ ९९ ॥ हेंही बोलतां अत्यंत थोडें । मी त्यांच्या भजनसुरवाडें । भुललों गा बाडेंकोडें । त्यांमागेंपुढें सदा तिष्ठे ॥ ४०० ॥ मद्भक्त नैराश्यें अतिगाढे । ते मागतील हें कदा न घडे । तेंही लक्षण तुजपुढें । अतिनिवाडें सांगेन ॥ १ ॥

न किञ्चित्साधवो धीरा भक्ता ह्येकान्तिनो मम । वाञ्छन्त्यपि मया दत्तं कैवल्यमपुनर्भवम् ॥ ३४ ॥

ज्यासी नघेणेंपणाचा प्रबोधू । साचार झाला अतिविशदू । ऐसा निरपेक्ष जो शुद्धू । तो सत्य साधू मज मान्य ॥ २ ॥ ज्याच्या ठायीं निरपेक्षता । धैर्य त्याचे चरण वंदी माथां । ज्याच्या ठायीं अधीरता ।

स्वधर्मकर्म आदरानें आचरिलें असतां जें प्राप्त होतें; खडतर तपाचरणानें जें साध्य होतें; सांख्यज्ञानाच्य विचारानें जें ज्ञान हातीं येतें; ९२ विषयत्यागानें जें प्राप्त होतें; अष्टांगयोगानें जें लाभतें; वायु-जल-पर्ण यांच्या सेवनानें जें साध्य होतें; दानप्रसंगानें जें पावतें; ९३ वेदाध्ययनानें जें लाभतें; सत्य भाषणानें जें मिळतें आणि इतर अनेक प्रकारच्या साधनांनीं जें प्राप्त होतें तें सर्व माझ्या एका भजनानें मिळतें. ९४ इतक्या सगळ्या कष्टकर साधनांच्या मागें न लागतां व पर्वताच्या गुहा न शोधितां, माझी भक्ति जर साध्य केली तर, हीं सगळीं फळें माझ्या भक्ताच्या दारांत येऊन पडतात. ९५ उद्धवा ! यावर तूं म्हणशील कीं, अशी तुझी भक्ति तरी कोणती ! (तर ऐक–) 'सद्गुरूच साक्षात् परब्रह्म आहे' अशा भावनेनें गुरूची सेवा करणें, हेंच त्या श्रेष्ठ भक्तीचें सामर्थ्य आहे. ९६ सद्गुरूच्या भक्तीवांचून साधकाला माझी प्राप्ति होत नाहीं. मी स्वतः भगवंतहि जर गुरुभक्ति करितों तर तेथें इतरांचा काय पाड ! ९७ मी सुद्धां ज्या सद्गुरूच्या कृपेनें एवढ्या श्रेष्ठ पदाला पोंचलों त्या सद्गुरूच्या महिम्याला कसली उपमा द्यावी ! ९८ अभेदभावानें गुरूलाच परब्रह्म मानून त्याची भक्ति करणारांची मी क्षुल्लक इच्छाहि पूर्ण करितों. ते वैकुंठ, स्वर्ग, मोक्ष इत्यादि जें कांहीं मागतील तें देतों. ९९ हें कांहींच नाहीं, त्यांच्या भजनाला मी इतका भाळतों कीं, त्यांच्या मागें-पुढें निरंतर तिष्ठत उभा असतों. ४०० परंतु माझे भक्त इतके निरिच्छ असतात कीं, तें कांहीं मागतील असें घडतच नाहीं. त्याचेंहि निरूपण मी मोठ्या आनंदानें करितों, तें ऐक. ४०१.

—त्याविषयीं हेतु सांगतात—

साधवः धीरः मम एकान्तिनः भक्ताः किंचित् मया दत्तं अपि अपुनर्भवं कैवल्यं न वाञ्छन्ति–साधु बुद्धिमान् व माझे निरतिशय प्रीतियुक्त भक्त कशाचीहि इच्छा करीत नाहींत. मीं दिलेलें नित्य निरतिशय कैवल्यहि घेत नाहींत. [तेव्हां ते त्याची इच्छाच करीत नाहींत, हें काय सांगावें !] ३४.

कांहीं घ्यावयाचें नाहीं असें ज्ञान ज्याच्या मनावर ठसतें, जो असा निरपेक्ष व शुद्ध असतो तोच खरा साधु मला मान्य आहे. २ जो निरपेक्ष धैर्यवान् असतो, त्याच्या चरणांना मी शिरसा वंदन करितों. कारण ज्याच्या अंगीं धैर्य

तेथ निरपेक्षता असेना ॥ ३ ॥ कोटिजन्में बोधू जोडे । तैं हे निरपेक्षता आतुडे । निरपेक्षते वरुतें चढे । ऐसें नाहीं फुडें साधन॥ ४ ॥ ऐशिये निरपेक्षताप्राप्तीं । माझ्या भजनीं अतिप्रीती । तो लाभे माझी चौथी भक्ती । जीसी एकांती म्हणे वेदू ॥ ५ ॥ ऐक एकांतभक्तीची मातू । देवाभक्तांस होय एकांतू । भक्तू रिघे देवाआंतू । देव भक्तांतू सबाह्य ॥ ६ ॥ ऐसें अभेदें माझें भजन । या नांव एकांतभक्ति जाण । मजवेगळें कांहीं भिन्न । न देखे आन जगामाजीं ॥ ७ ॥ त्यासी चहूं पुरुषार्थेंसीं मुक्ती । मी स्वयें देताहें श्रीपती । ते दुरोनि दृष्टीं न पाहती । मा धरिती हातीं हें कदा न घडे ॥ ८ ॥ ते स्वमुखें कांहीं मागती । हें न घडे कदा कल्पांतीं । सांडूनि माझी एकांतभक्ती । कैवल्य न घेती ते निजभक्त ॥ ९ ॥ तो मोक्षही घ्यावया कोण भावो । त्याचाही मथित अभिप्रावो । स्वयें सांगे देवाधिदेवो । अगम्य पहावो श्रुतिशास्त्रां ॥ ४१० ॥

नैरपेक्ष्यं परं प्राहुर्निःश्रेयसमनल्पकम् । तस्मान्निराशिषो भक्तिर्निरपेक्ष्यस्य मे भवेत् ॥ ३५ ॥

जो निरपेक्ष निर्विशेष । तो मज पूज्य महापुरुष । मोक्ष त्याचे दृष्टीं भूस । धन्य नैराश्य तिहीं लोकीं ॥ ११ ॥ ऐक निरपेक्षतेचा उत्कर्ष । तेथ चारी पुरुषार्थ फळकट । वैकुंठकैलासादि श्रेष्ठ । ते पायवाट निरपेक्षा ॥ १२ ॥ निरपेक्षापाशीं जाण । वोळंगे येती सुरगण । तेथ ऋद्धिसिद्धींचा पाड कोण । वोळंगे अंगण कळिकाळ ॥ १३ ॥ स्वयें मदादेव आपण । सर्वस्वें करी निंबलोण । श्रियेसहित मी आपण । अंकित जाण तयाचा ॥ १४ ॥ निरपेक्ष जो माझा भक्त । तो मजसमान समर्थ । हेंही

नसतें, तो निरपेक्ष राहूं शकत नाहीं. ३ कोट्यवधि जन्मानंतरच हें ज्ञान प्राप्त होतें व मग निरपेक्षता अंगीं बाणते. निरपेक्षतेहून अधिक श्रेष्ठ दुसरें कोणतेंहि साधन नाहीं. ४ अशी निरपेक्षता प्राप्त झाली म्हणजे माझ्या भजनाची अत्यंत आवड उत्पन्न होते. वेदामध्यें जिला एकान्ती भक्ति म्हटलें आहे तीच ही माझी चौथी भक्ति होय. ५ त्या एकान्ती भक्तीचें कौतुक सांगतों, ऐक. देव आणि भक्त यांचा जेव्हां एकान्त होतो तेव्हां भक्त देवामध्यें प्रवेश करितो व देव भक्ताला अंतर्बाह्य व्यापितो. ६ असें जें अभेदपणानें माझें भजन त्याला एकान्त भक्ति म्हणतात. तो भक्त सगळ्या जगामध्यें माझ्यावांचून दुसरें कांहींहि पहात नाहीं. ७ मी श्रीपति स्वतः त्यास चारी पुरुषार्थांसह मुक्ति देत असतां तो तिच्याकडे दुरूनहि पहात नाहीं; मग तो तिला हातीं धरील, ही गोष्ट कशाला पाहिजे ! ८ असे माझे भक्त आपल्या तोंडानें कांहीं मागतील हें कल्पांतींहि घडत नाहीं. ते माझी भक्ति सोडून कैवल्य म्ह० मोक्षहि स्वीकारीत नाहींत. ९ श्रुति-स्मृतीलाहि अगम्य असलेलें मोक्ष न घेण्याचें कारण देवाधिदेव आतां तात्पर्यरूपानें सांगत आहे. ४१०.

—त्याचेंच उपपादन करितात—

नैरपेक्ष्यं परं अनल्पकं निःश्रेयसं प्राहुः—निरपेक्षता हेंच उत्कृष्ट व फार मोठें निःश्रेयस म्ह० फल व त्याचें साधन आहे, असें ते म्हणतात, **तस्मात् निरपेक्षस्य मे या भक्तिः सा निराशिषः भवेत्**—यास्तव निरपेक्ष असलेल्या माझी जी भक्ति ती सर्व कामनाशून्य पुरुषाच्या हातूनच होते किंवा, **मे भक्तिः निराशिषः निरपेक्षस्य भवेत्**—माझी भक्ति प्रार्थनाशून्य व त्या प्रार्थनेला कारण होणाऱ्या अपेक्षेनें रहित अशा पुरुषाच्या हातून होते. ३५.

निरपेक्ष आणि निर्विकार असलेला श्रेष्ठ पुरुष मला पूज्य वाटतो. ज्याच्या दृष्टीला मोक्ष केवळ भुसकटा-सारखा फोल दिसत असतो, त्याचा निरिच्छपणा त्रिभुवनांत धन्य होय. ११ आतां निरपेक्षतेचें माहात्म्य ऐक. निरपेक्ष पुरुषाला चारी पुरुषार्थ तुच्छ वाटत. तो वैकुंठ-कैलासादिक श्रेष्ठ लोकहि आपली पायवाट समजतो. १२ श्रेष्ठ देव त्याच्या पायांशीं चालत येततात. मग तेथें ऋद्धि-सिद्धींची काय कथा ! कळिकाळ तर त्याचें अंगण झाडतात. १३ शंकर स्वतः त्याच्यावरून लिंबलोण ओवाळून टाकितो आणि मी स्वतः लक्ष्मीसह त्याचा अंकित होऊन रहातों १४ माझा निरपेक्ष भक्त माझ्यासारखाच समर्थ होतो, हें बोलणेंहि औपचारिक आहे. कारण वास्तविक

बोलणें अहाच येथ । तो मीचि निश्चित चिद्रूपें ॥ १५ ॥ मी परमात्मा परमानंद । भक्त मद्भजनें शुद्ध स्वानंद । दोघे अभेद स्वानंदकंद । सच्चिदानंद निजरूपें ॥ १६ ॥ ऐसे मद्भावें भक्त संपन्न । ते न देखती दोषगुण । तेचिविखींचें निरूपण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ १७ ॥

न मय्येकान्तभक्तानां गुणदोषोद्भवा गुणाः । साधूनां समचित्तानां बुद्धेः परमुपेयुषाम् ॥ ३६ ॥

जो न देखे विषयभेदू । ज्यासी समत्वाचा निजबोधू । तोचि बोलिजे शुद्ध साधू । परमानंदू मद्भजनें ॥ १८ ॥ मी एक परमात्मा सर्व भूतीं । न देखे द्वैताची प्रतीती । ऐसी ज्यास भजनस्थिती । 'एकांतभक्ती' त्या नांव ॥ १९ ॥ सदा समभावें एकाग्र । माझ्या भजनीं अतितत्पर । ते प्रकृतीचे परपार । पावले साचार मद्रूपीं ॥४२०॥ ऐसे मद्भावें भक्त परिपूर्ण । ते न देखती दोषगुण । उद्धवा म्यां हे निजखूण । पूर्वीं तुज जाण सांगीतली ॥ २१ ॥ साकरेची साल फेडणें । कीं कापुरकोंडा काढणें । रत्नदीपीं काजळी फेडणें । तरी गुणदोष देखणें मद्भक्तां ॥ २२ ॥ ज्याचा घ्यावा अवगुण । मुख्य अगुणी मी आपण । ज्याचा घ्यावा उत्तम गुण । तेंही जाण मद्रूप ॥ २३ ॥ यापरी भक्तजगजेठी । मद्रूपें देखे सृष्टी । त्यासी गुणदोषांची गोष्टी । न पडे दृष्टीं सर्वथा ॥ २४ ॥ गुणदोष न देखावे जाण । हेंचि साधनीं मुख्य साधन । येचि अर्थीचें निरूपण । आदरें श्रीकृष्ण सांगत ॥ २५ ॥

एवमेतान्मयादिष्टाननुतिष्ठन्ति मे पथः । क्षेमं विन्दन्ति मत्स्थानं यद्ब्रह्म परमं विदुः ॥ ३७ ॥

तो मद्रूपच झालेला असतो. १५ मी परमात्मा परमानंद आहें. त्यामुळें माझा भक्त माझ्या भजनानें शुद्ध स्वानंद-रूप बनतो. तेव्हां आम्ही दोघेहि अभेदपणानें स्वानंदकंद, सच्चिदानंद आत्मरूपच होतों. १६ माझ्या भक्तीनें असे संपन्न झालेले माझे भक्त गुण-दोष पहात नाहींत. त्याचेंच निरूपण श्रीकृष्ण स्वतः आतां करीत आहे. ४१७.

—याप्रकारें सिद्धांना गुण-दोष नाहींत, या म्हणण्यांतील विरोधाचा परिहार करून त्याचा आतां उपसंहार करितात —

मयि एकान्तभक्तानां समचित्तानां बुद्धेः परं उपेयुषां साधूनां गुण-दोषोद्भवाः गुणाः न—माझ्या ठिकाणीं नित्य भक्तियुक्त सर्वत्र समचित्त, त्यामुळेंच बुद्धीच्याहि पलीकडे असलेल्या ईश्वराला प्राप्त झालेल्या राग-द्वेषरहित साधूंना विहित व प्रतिषिद्ध धर्मांपासून ज्यांचा उद्भव होतो, असे पुण्य-पापादि गुण नाहींत. ३६.

जो विषयांतील भेद पहात नाहीं, ज्याला समत्वानें आत्मज्ञान झालेलें असतें, ज्याला माझ्या भजनानें परमानंद होतो त्यालाच शुद्ध साधु असें म्हणतात. १८ सर्व भूतांत मी एक परमात्माच भरलेला आहें, अशी त्याची दृष्टि झाल्यामुळें त्याला कोठेंहि द्वैताची प्रतीति येत नाहीं. अशी जी भक्ति असते तिलाच एकान्तभक्ति असें म्हणतात. १९ निरंतर सर्व ठिकाणीं समभाव ठेवून जे एकाग्र मनानें माझ्या भजनांत तत्पर असतात, ते प्रकृतीच्या परतीराला पोंचून मद्रूप होतात. ४२० उद्धवा ! माझ्या परिपूर्ण भक्तीनें संपन्न झालेले असले माझे भक्त गुण-दोष पहात नाहींत. ही खूण मीं तुला पूर्वींच सांगितली आहे. २१ जर साखरेची सोलून साल काढितां येईल, किंवा कापुराचा कोंडा काढतां येईल किंवा रत्नांच्या ज्योतीला काजळी धरील, तर माझे भक्त गुण-दोष पहात बसतील २२ ज्याचा अवगुण घ्यावा, त्याच्यांतील मुख्य अवगुणहि मीच आहें व ज्याचा उत्तम घ्यावा तेंहि माझेंच स्वरूप आहे. २३ कारण माझा श्रेष्ठ भक्त सगळी सृष्टि मद्रूपानें पहात असतो. तो कधीं गुण-दोषांकडे पहातहि नाहीं. २४ गुण-दोष न पहाणें हेंच सगळ्या साधनांत मुख्य साधन आहे. या विषयींचें निरूपण श्रीकृष्ण मोठ्या आदरानें करीत आहे. ४२५.

—पुढें काम्य-कर्मनिष्ठेची निंदा करणारे भगवान् या मुक्तिमार्गाचा उपसंहार करितात—

एवं मया आदिष्टान् एतान् मे पथः ये अनुतिष्ठन्ति ते क्षेमं मत्स्थानं विन्दन्ति—याप्रमाणें मीं उपदेशिलेल्या या माझ्या प्राप्तीच्या उपायांचें अनुष्ठान जे करितात ते काल, माया इत्यादिकांनीं रहित अशा माझ्या लोकाला प्राप्त होतात, **यत् परमं ब्रह्म तत् च विदुः**—आणि जें परब्रह्म त्यालाहि जाणतात. ३७.

उद्धवा यापरी जाण । म्यां वेदवादें आपण । उपदेशिले गा जन । भक्तिज्ञानकर्मयोगें ॥ २६ ॥ कर्मीचि कर्म छेदिजेती । ऐशी कर्मयोगाची गती । स्वधर्मकर्में माझी प्राप्ती । ते म्यां तुजप्रती सांगीतली ॥ २७ ॥ नित्यानित्यविवेचन । करूनि अनित्यनिर्दळण । हें ज्ञानयोगाचें लक्षण । तुज म्यां संपूर्ण सांगीतलें ॥ २८ ॥ तैशीच करितां माझी भक्ती । सकळ फळें पायां लागती । भक्तांसी अनायासें माझी प्राप्ती । हेंही तुजप्रती सांगीतलें ॥ २९ ॥ अधिकारभेदेंसीं सांग । त्रिकांड त्रिविध वेदमार्ग । माझे प्राप्तीलागीं चांग । विशद विभाग म्यां केला ॥ ४३० ॥ म्यां सांगीतल्याऐसें जाण । जो वेदमार्गें करी अनुष्ठान । तो माझी प्राप्ती पावे संपूर्ण । सगुण निर्गुण यथारुचि ॥ ३१ ॥ सगुण साक्षात्कार जो येथ । तें पंचरात्रागममत । वैकुंठाचि मुख्य म्हणत । तें मत निश्चित तयाचें ॥ ३२ ॥ सप्तावरणांबाहेरी । मायावरणाभीतरीं । वैकुंठ रचिलें श्रीहरी । हें बोलिजेलें धीरीं वेदांतीं ॥ ३३ ॥ तेथ आगमाचें मनोगत । माया ते भगवल्लीला म्हणत । स्वलीला वैकुंठ रची भगवंत । क्षयो तेथ असेना ॥ ३४ ॥ जेथ लीलाविग्रही मेघश्याम । स्वयें वसे पुरुषोत्तम । तेथ नाहीं गुण काळकर्म । मायादि भ्रम रिघेना ॥ ३५ ॥ एवं जन्मक्षयातीत । वैकुंठ अक्षयी निज नित्य । तेथ पावले ते नित्यमुक्त । हें ‘ आगममत ’ उद्धवा ॥ ३६ ॥ मंत्रें आराध्यदैवतें प्रसन्नें । हें वेदार्थियाचें बोलणें । तें म्यां तुजप्रती अनुसंधानें । बोलिलों जाणें उद्धवा ॥ ३७ ॥ भावार्थभक्तीचें लक्षण । ते प्रसन्नतेची खूण । हें पूर्वीं केलें निरूपण । निरुतें जाण उद्धवा ॥ ३८ ॥ ये अर्थीं वेदांती म्हणत । अत्यंतप्रळयींचा जो आघात । तो वैकुंठकैलासादि समस्त । आकारवंत निर्दाळी ॥ ३९ ॥ ते काळींचे उर्वरित । केवळ जे गुणातीत । ते पूर्ण ब्रह्म सदोदित । जाण निश्चित उद्धवा ॥ ४४० ॥ जेथ काळ ना कर्म । जेथ गुण ना धर्म । जेथ माया पावे उपरम । तें परब्रह्म उद्धवा

हे उद्धवा ! अशाप्रकारें मीं वेदवाणीनें भक्ति-ज्ञान-कर्मयोगांचा लोकांना उपदेश केला. २६ कर्मानेंच कर्मांचा छेद करावा, असा कर्मयोगाचा प्रकार सांगून स्वधर्म-कर्मानेंच माझी प्राप्ति होते असें मीं तुला सांगितलें. २७ त्याचप्रमाणें नित्य-अनित्यवस्तूंचा विचार करून अनित्य वस्तूचा नाश करावा, हें ज्ञानयोगाचें लक्षण मीं तुला सविस्तर सांगितलें. २८ तसेंच माझी भक्ति केली असतां सगळ्या पुण्याचरणाचीं फळें पायांशीं येतात व भक्ताला अनायासें माझी प्राप्ति घडते, हेंहि मीं तुला सांगितलें. २९ कर्म-उपासना-ज्ञानरूप वेदाचे तीन मार्ग व त्यांचा अधिकार भेदासह विशद करून सांगितला. ४३० मीं सांगितलेल्या प्रकारांनीं जो आपल्या आवडीप्रमाणें वेद-मार्गानुसार सगुण किंवा निर्गुण उपासना करितो, त्याला माझी पूर्णपणें प्राप्ति होते. ३१ येथें जो सगुणसाक्षात्कार सांगितला आहे, तें पंचरात्रागममत होय. पंचरात्रागमवादी वैकुंठालाच मुख्य मानितात व तें त्यांचें निश्चित मत आहे. ३२ आवरणांच्या बाहेर व मायेच्या आवरणांच्या आंत श्रीहरीनें वैकुंठ रचिलें, असें वेदान्तांत म्हटलें आहे. ३३ त्यांत आगमाच्या मतानें मायेला भगवंताची लीला म्हटली आहे. भगवानानें आपल्या लीलेनें वैकुंठ रचिल्यामुळें, तेथें नाश संभवत नाहीं. ३४ त्या वैकुंठांत लीलेनें देह धारण करणारा घनश्याम पुरुषोत्तम रहात असल्यामुळें, तेथें काळ, कर्म, गुण, माया इत्यादि भ्रमाचें नांवहि नाहीं. ३५ याप्रमाणें उत्पत्ति-नाशरहित असें जें अक्षय व नित्य वैकुंठ तेथें जाणारे नित्य मुक्तच होत, असें आगम मत आहे. ३६ उद्धवा ! तेथें मंत्रसामर्थ्यानें आपली इष्ट देवता प्रसन्न करून घेतां येते, असे वेदवेत्ते म्हणतात. हें मीं तुला ओघानें सांगितलें. ३७ एकनिष्ठ भक्ति हीच त्यांच्या प्रसन्नतेची खूण आहे. याचेंहि स्पष्ट निरूपण मीं पूर्वीं केलें आहे. ३८ परंतु वेदान्ती याविषयीं असें म्हणतात कीं, कालाच्या आघातानें वैकुंठ-कैलासादि सर्व साकार लोकांचाहि लय होतो. ३९ त्यावेळीं जे गुणातीत म्ह० पूर्ण ज्ञानी असतात, तेच केवळ अवशिष्ट रहातात. तेंच खरोखर नित्य, अविनाशी पूर्ण ब्रह्म होय. ४४० उद्धवा ! जेथें काळ-कर्म, गुण-धर्म हीं नसतात व ज्यांत माया उपरम पावते, तेंच परब्रह्म जाणावें. ४१

॥ ४१ ॥ माझें स्थान वैकुंठ जाण । तेथील प्राप्ति सायुज्य सगुण । पूर्ण सायुज्यता जाण । ब्रह्म परिपूर्ण सदोदित ॥ ४२ ॥ पावावया पूर्ण परब्रह्म । साधकांसी कोणे मार्गीं क्षेम । वेदोक्त मद्भक्ती सुगम । उत्तमोत्तम हा मार्ग ॥ ४३ ॥ आणिके मार्गीं जातां जाण । कामलोभादि उठे विघ्न । कां बुडवी ज्ञानाभिमान । ये नागवण प्रत्यवायाची ॥ ४४ ॥ तैसें नाहीं भक्तिपंथीं । सवें नवविध सांगाती । चढतां पाउलीं अतिविश्रांती । भजनयुक्ति मद्भावें ॥ ४५ ॥ येथील मुख्यत्वें साधन । गेलियाही जीवप्राण । कदा न देखे दोषगुण । तैं ब्रह्म परिपूर्ण पाविजे ॥ ४६ ॥ जेथ नाहीं भवभयभ्रांती । जेथ नाहीं दिवसराती । जेथ नाहीं जीवशिवस्थिती । तें ब्रह्म पावती मद्भक्त ॥ ४७ ॥ जेथ नाहीं रूपनाम । जेथ नाहीं काळकर्म । जेथ नाहीं मरणजन्म । तें परब्रह्म पावती ॥ ४८ ॥ जेथ नाहीं ध्येयध्यान । जेथ नाहीं ज्ञेयज्ञान । जेथ नाहीं मीतूंपण । तें ब्रह्म पूर्ण पावती ॥ ४९ ॥ ज्यासी नाहीं मातापिता । जें नव्हे देवोदेवता । जे बहु ना एकुलता । ते ब्रह्म तत्त्वतां पावती ॥ ४५० ॥ जेथ नाहीं वर्णाश्रम । जेथ नाहीं क्रियाकर्म । जेथ नाहीं मायाभ्रम । ते परब्रह्म पावती ॥ ५१ ॥ जें गुणागुणीं अतीत । जें लक्षलक्षणा रहित । जें स्वानंदें सदोदित । तें ब्रह्म प्राप्त मद्भक्तां ॥ ५२ ॥ पूर्णकृपेचा हेलावा । न संटेचि देवा । तो हा एकादशींचा विसावा । तुज म्यां उद्धवा दीधला ॥ ५३ ॥ जेथ ठावो नाहीं देहभावा । जेथ सामरस्य जीवशिवां । तो हा एकादशींचा विसावा । तुज म्यां उद्धवा दीधला ॥ ५४ ॥ जेथ उगाणा होय अहंभावा । शून्य पडे मायेच्या नांवा । तो हा एकादशींचा विसावा । तुज म्यां उद्धवा दीधला ॥ ५५ ॥ जेथ देवभक्तांचा कालोवा । एकत्र होय आघवा । तो हा एकादशींचा विसावा । तुज म्यां उद्धवा दीधला ॥ ५६ ॥ कष्टीं स्वानंदें स्वयें जोडावा । त्या स्वानंदाचा आइता ठेवा । तो हा एकादशींचा विसावा । तुज म्यां उद्धवा दीधला ॥ ५७ ॥ करूनि भेदाचा नागोवा । होय अभेदाचा रिगावा । तो हा एकादशींचा विसावा । तुज म्यां उद्धवा दीधला ॥ ५८ ॥ काढोनि भावार्थाचा भावो । सोलींव सोलिवांचा सोलावो । गाळुनी गाळिवांचा भक्तिभावो । उद्धवासि देवो देतसे ॥ ५९ ॥ यापरि श्रीकृष्णनाथु । होऊनियां स्वानंदभरितू । विसाव्या अध्यायींची

माझें स्थान जें वैकुंठ, तेथें सगुण सायुज्याची प्राप्ति होते. निरंतर परिपूर्ण ब्रह्म हेंच पूर्ण सायुज्य समजावें. ४२ आतां साधकाला पूर्ण परब्रह्मरूप होण्यास सुलभ मार्ग कोणता, असें जर विचारशील तर माझी भक्ति हाच वेदोक्त सोपा व उत्तमोत्तम मार्ग आहे. ४३ इतर मार्गांत काम-लोभादि विघ्नें उद्भवतात, किंवा ज्ञानाभिमान लुबाडतो व वेदोक्तकर्म न केल्याचा दोष लागतो. ४४ माझ्या भक्तिमार्गांत तशा प्रकारची कांहीं भीति नाहीं. नवविधा भक्तिरूपी सोबत बरोबर असल्यामुळें पायांनीं चढत असतांहि माझ्या भक्तिप्रेमानें विसांवा मिळतो. ४५ यांतील मुख्य साधन हेंच आहे कीं, प्राण गेला तरी गुण-दोषांकडे पहावयाचें नाहीं तेव्हांच पूर्णब्रह्माची प्राप्ति होते. ४६ जेथें संसारभयाची भ्रांति नाहीं, जेथें दिवस-रात्र नाहीं. जेथें जीव-शिवभेद नाहीं, अशा ब्रह्माला माझे भक्त प्राप्त होतात. ४७ जेथें नाम रूप, काळ-कर्म, जन्म-मरण नाहीं, ४८ जेथें ध्येय-ध्यान, ज्ञेय-ज्ञान, मी-तूंपणा नाहीं अशा ब्रह्माला ते पोंचतात. ४९ ज्याला माता-पिता नाहीं; जें देव-देवता नाहीं; जें एक नाहीं व अनेक नाहीं; ४५० जेथें वर्णाश्रम, क्रिया-कर्म, मायाभ्रम नाहीं; ५१ जें गुणागुणाच्या पलीकडे आहे; जें लक्ष्य-लक्षणारहित आहे; जें सदोदित स्वानंदयुक्त असतें तें ब्रह्म माझ्या भक्तांना प्राप्त होतें. ५२ उद्धवा ! ज्यांतील पूर्ण कृपेचा पूर देवाला आंवरेना, तो हा एकादश स्कंधांतील विसावा (अध्याय व विश्रांति) मी तुला देत आहें. ५३ जेथें देहभाव उरत नाहीं; जीवा-शिवांचें साम्य होतें; ५४ जेथें अहंभावाचा नाश होतो; मायेचें नांव शून्य होतें; ५५ जेथें देव आणि भक्त या दोघांचें ऐक्य होतें; ५६ मोठ्या परिश्रमानें जो स्वानंद मिळवावयाचा त्या स्वानंदाचा जो अनायासें मिळालेला ठेवाच ५७ व भेदाचा नाश करून ज्यांत अभेदानें प्रवेश केला आहे, असा या एकादश स्कंधांतील हा विसावा अध्याय म्हणजे जणूंकाय विसांवाच मी तुला देत आहें. ५८ भक्तींतील भक्ति काढून, सोलीव वस्तूच्या गाभ्यांतील गाभा, गाळिवाचाहि गाळीव अर्क असा हा भक्तिभाव श्रीहरीनें उद्धवाला दिला. ५९

मातू । हरिखें सांगतू उद्धवा ।। ४६० ।। आतां विसाव्याचा विसावा । स्वानंदसुखाचा हेलावा । तो मी सांगेन एकविसावा । ऐक उद्धवा सादर ।। ६१ ।। वेदीं शुद्धाशुद्धलक्षण । हें पुढिले अध्यायीं निरूपण। एका विनवी जनार्दन । श्रोतां अवधान मज द्यावें ।। ४६२ ।। इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे भगवदुद्धवसंवादे एकाकारटीकायां वेदत्रयीविभागयोगो नाम विंशतितमोऽध्यायः ।। २० ।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कन्धे विंशतितमोऽध्यायः ।। २० ।।

अध्याय एकविसावा.

श्रीगणेशाय नमः ।। ॐ नमो सद्गुरु वैकुंठनाथा । स्वानंदवैकुंठीं सदा वसता । तुझें ऐश्वर्य स्वभावतां । न कळे अनंता अव्यया ।। १ ।। तुझ्या निजबोधाचा गरुड । कर जोडूनि उभा दृढ । त्याच्या पाखांचा झडाड । उन्मळी सुदृढ भववृक्षा ।। २ ।। तुझें स्वानुभवैकचक्र । लखलखित तेजाकार। द्वैतदळणीं सतेजधार । अतिदुर्धर महामारी ।। ३ ।। कैसा पांचजन्य अगाध । निःशब्दीं उठवी महाशब्द । वेदानुवादें गर्जे शुद्ध । तोचि प्रसिद्ध शंख तुझा ।। ४ ।। झळफळित सर्वदा । निजतेजें मिरवे सदा । करी मानाभिमानांचा चेंदा । ते तुझी गदा गंभीर ।। ५ ।। अतिमनोहर केवळ । देखतां उपजती सुखकल्लोळ । परमानन्दें आमोद बहळ । तें लीलाकमळ झेलिसी ।। ६ ।। जीव शिव समसमानी । जय

याप्रमाणें श्रीकृष्णनाथानें स्वानंदभरानें विसाव्या अध्यायांतील कथाभाग उद्धवाला मोठ्या आनंदानें सांगितला. ४६० आतां विसाव्या अध्यायाची विश्रांति व स्वानंदसुखाचे हेलकावे देणारा असा एकविसावा अध्याय सांगतों, तरी हे उद्धवा ! सादर चित्तानें ऐक. ६१ वेदांतील शुद्धाशुद्ध लक्षणांचें निरूपण पुढील अध्यायांत केलें आहे. तरी श्रोत्यांनीं मजकडे लक्ष द्यावें, असें एकनाथ जनार्दन विनवीत आहे. ४६२.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव-संवादांतील वेदत्रयीविभागयोग नांवाचा विसावा अध्याय समाप्त झाला.

सद्गुरु वैकुंठाधीशाला माझें वंदन असो. तूं निरंतर स्वानंदरूप वैकुंठांतच रहातोस. हे अनंता, अव्यया ! तुझ्या स्वाभाविक ऐश्वर्याचा कोणाला अंत लागत नाहीं. १ तुझ्यापुढें आत्मज्ञानरूपी गरुड हात जोडून उभा असतो. त्यानें पंख फडफडवितांच भवरूपी प्रचंड वृक्ष उन्मळून पडतो. २ तुझें स्वानुभव हेंच लखलखीत तेजोरूप चक्र आहे. भेदाचा नाश करण्यास त्याची धार सतेज आहे. त्यामुळें तें भयंकर आघात करितें. ३ तुझ्या हातांतील पांचजन्य शंख तर केवढा प्रचंड ध्वनि करितो. त्यानें निःशब्दांतहि शब्द उत्पन्न होतो. वेदवाणीनें शुद्ध गर्जना करणाराच तुझा प्रसिद्ध शंख होय. ४ आत्मतेजानें चकाकणारी तुझी गंभीर गदा मानापमानांचा चेंदा करून टाकिते. ५ अत्यंत मनोहर, पहातांक्षणीं आल्हाद देणारें, परमानंदरूपी सुगंध दरवळणारें लीलाकमल तूं हातांत झेलीत असतोस. ६ सम-समान असलेले जीव आणि शिव या दोघांना तूं जय-विजय हीं नांवें देऊन द्वारपाळ होण्याची